हा पूर्वपक्षहि हरीच हरील येथें, बोलेल केवळ पुढें निजतत्व जेथें; ।
हा 'भोक्तृतत्व' म्हणवोनि चतुर्थ केला अध्याय वामनमुखें प्रणिपात त्याला. ॥५४

---

## अध्याय पांचवा.

### आत्मतत्व.

(श्लोक.)

भोगप्रतीतिसमयांत कसा अभोक्ता? बोलेल हें हरिच आपण वेदवक्ता; ।
भोगीं असोनिहि अभोक्तृपणप्रतीती भोक्ता नव्हे म्हणुनि वर्णिल तत्वरीती. ॥ १

---

१. प्रत्यक्ष भोग होत असून आत्मा अभोक्ता असतो—असें कसें होतें याचें निरूपण पुढच्या अध्यायांत केलें आहे. २. श्लोक ५३ यांत दर्शविलेला पूर्वपक्ष. हा पूर्वपक्ष असा आहे:—भोगप्रतीतीच्या समयीं अभोक्तृता (भोग न होणें अशी अवस्था) असणें अशी गोष्ट योग्यासही संभवत नाहीं, मग (भोगीं अभोक्तृपणाची प्रतीति नसतां, आणि भोग भोगित असतां) योग्यास भोग होत नाहींत असें कसें म्हणतां येईल? ३. श्रीकृष्ण. ४. दूर करील. ५. या ग्रंथांतील आत्मतत्व नामक पुढील अध्यायांत. ६. आत्मतत्व. ७. 'इति कर्मतत्वें भोक्तृतत्वं नाम चतुर्थोऽध्यायः' असा समाप्तिलेख आहे. ८. नमस्कार. ९. हरीला, श्रीकृष्णाला. १०. ज्ञानी पुरुषाला अभोक्तृपणप्रतीति नसतां त्यास भोग कसे होत नाहींत अशी शंका (पूर्वपक्ष) चतुर्थ अध्यायाच्या शेवटच्या (५४) श्लोकांत दर्शविली आहे. त्या शंकेचें समाधान या पांचव्या अध्यायांत पंडितांनीं केलें आहे. आत्म्याचें शुद्ध स्वरूप कळलें असतां या शंकेची निवृत्ति होते. यासाठीं तें स्वरूप सांगण्याचा यत्न या अध्यायांत केला आहे. जागृति, स्वप्न आणि सुषुप्ती (निद्रा) या तीन अवस्थांचा अनुभव आपणा सर्वांस आहे. चौथी अवस्था 'निर्विकल्प समाधि' म्हणून आहे. हिलाच 'उन्मनी' 'तुर्या' 'योग' अशीं अन्य नांवें आहेत. या चतुर्थ अवस्थेचें आपणास ज्ञान नाहीं. परंतु त्या अवस्थेचें वर्णन ग्रंथकारांनीं केलें आहे. सुषुप्ति आणि निर्विकल्प समाधि या दोन्ही अवस्थेंत बिंबैक्य असतें, म्हणजे 'प्रतिबिंब' नसतें. यामुळें फक्त 'स्वसुख' असतें आणि त्या सुखांत आत्मा लीन असतो. या कारणास्तव सुषुप्ति आणि समाधि या अवस्था सारख्याच आहेत. मात्र सुषुप्तींतील सुखाचा अनुभव जागा झाल्यावर सांगतां येतो, पण त्याची प्रतीति सुषुप्ति अवस्थेमध्यें नसते आणि ती प्रतीति समाधींत असते. इतका या दोन अवस्थांमध्यें भेद आहे. जागृति आणि स्वप्न या अवस्थांत आपणा सर्वांचे प्रतीतिस येणारें जें आत्मत्व तें प्रतिबिंबस्वरूपी आहे, तें शाश्वत नाहीं व अखंडही नाहीं, समाधींत प्रतीतीस येणारें व सुषुप्तींतही ज्याचें अस्तित्व नष्ट होत नाहीं तें आत्मत्व शाश्वत आणि अखंड असें आहे. तेंच आत्मत्व शुद्ध आत्मा होय. त्या शुद्ध स्वरूपास भोक्तृत्व नाहीं. त्या आत्मस्वरूपाची अखंड प्रतीति ज्ञान्यास असल्यामुळें त्यास भोक्तृत्वपण नाहीं.

चैतन्य सर्वगत केवळ बिंबे जैसें, दैहीक मात्र भरलें प्रतिबिंब तैसें; ।
दोहींस सत्वगुणयोग तरि प्रतीती हे तों सुषुप्ति सरतां खुण सर्व चित्तीं. ॥ २
नाहीं सुषुप्तिसमयीं स्वपरप्रतीती आत्मा तथापि निज हाचि विचार चित्तीं; ।
भोगी अभोक्तृपण यद्यपिहि स्फुरेना बिंबात्मता निज तथापिहि अंतरेना. ॥ ३
भोगांत जे समयिं भोक्तृपणप्रतीती आत्मा जरि स्फुरतसे प्रतिबिंब चित्तीं; ।
आत्मा नव्हे न म्हणवे प्रतिबिंब जेव्हां भोक्तृत्वहि स्फुरतसे हृदयासि तेव्हां. ॥ ४
सत्वोदकांत तमकर्दम मिश्र जेव्हां तें बिंब जें न म्हणवे प्रतिबिंब तेव्हां ।
सत्वांत जागरिं तया प्रतिबिंब चिंती बिंबींच त्यांसहि निजात्मपणप्रतीती. ॥ ५
निद्रेंत जो बहुसुखें स्वसुखें निजेलों, तों प्रत्ययासहित जागृत मीच झालों; ।
हा प्रत्यय प्रतिमुखात्मपणें तथापी आत्मत्व आठवि सुषुप्तिगतस्वरूपीं. ॥ ६

---

ज्ञान्यासही प्रतिबिंबरूपानें (जीवरूपानें) भोगीं प्रतीति उपजते, तथापि तो आत्मसुखस्वरूपी जागृत असतो, बिंबात्मता विसरत नाहीं, आणि भोग होत असतां तो आपणास मानीत नाहीं—असें या अध्यायाचें तात्पर्य आहे. ११. तत्वज्ञ जनांच्या पद्धतीस अनुसरून.

१.परमात्मा. (अ० ४ श्लो०२ पहा.) २.सर्वव्यापी.३. सर्वगत चैतन्य बिंब होय आणि एकदेशीय दैहिक जीवस्वरूप चैतन्य प्रतिबिंब होय. ४. प्रतिदेहाचे ठिकाणीं प्रतिबिंबरूपानें भरून राहिलेलें.५. बिंबरूपी आणि प्रतिबिंबरूपी चैतन्यास.६.चैतन्य आणि सत्व यांचे संभोगावांचून वृत्ति अथवा प्रतीति नसते असें अ० ४ श्लो० २५ यांत आहे. [यथार्थदीपिका—अ० ४-८८२.] ७. प्रत्यय, अनुभव. आपण झोंपेंत असतां प्रतीति नसते आणि जागेपणीं प्रतीति असते. ८. हे खुण=ही गोष्ट. ही गोष्ट सर्वांस माहीत आहे कीं सुषुप्ति सरतां (झोंप सरली म्हणजे) प्रतीति असते, झोंपेंत प्रतीति नसते. ९. निद्रा. १०. झोंपेंत असतां. ११. आत्मप्रतीतिसहित सकळ प्रतीति. [श्लो०५५-६३.] १२. झोंपेंत असतां स्वपरप्रतीति नाहीं, तथापि चित्तीं 'निज' आत्मा हा विचार असतोच (श्लो० ६). १३. झोंपेच्या वेळीं घडलेल्या चंदनादि भोगांविषयीं. १४. ते भोग 'निज आत्म्यास' होत नसून 'निज आत्मा' स्वसुखांत आहे असें ज्ञान. १५. जरी. १६. कळत नाहीं. झोंपेंत अभोक्तृपण जरी स्फुरत नाहीं. १७. अंतरत नाहीं, नाहींशी होत नाहीं. 'निज बिंबात्मता' 'निज आत्मा' अशी स्फूर्ति झोंपेंतही असतेच. १८. जागृतावस्थेंत, ज्यावेळीं. १९. आपणास भोग होत आहेत असें ज्ञान. २०. जर चित्तीं प्रतिबिंब आत्मा (जीवात्मा) स्फुरतसे (स्फुरत असेल) तर भोक्तृपणप्रतीति असते. २१. सत्वगुणरूप उदकांत. [यथार्थदीपिका—अ० १५ ओंव्या ४३९-४४३.] २२. तमोगुणरूप चिखल. २३. सुषुप्तिसमयीं. २४. जागा झाल्यावर. [यथार्थदीपिका—अ० १३ ओं० ६४५.] २५. आठवितो. २६. सुषुप्तिगत आत्मस्वरूपींच. २७. प्रतिबिंबास. २८. आपल्या आत्मत्वाचा प्रत्यय. २९. प्रतीतियुक्त असा. ३०. प्रतिबिंबरूपानें. ३१. झोंपेच्या वेळचें.

जैसें सुषुप्तिसमयीं प्रतिबिंबबिंबीं ऐकत्व येरिति सैमाधिसुखानळेंबीं; ।
जागा सुषुप्तिसुख आठवि याच रीती भोगोनि भोगहि अभोक्तृपणप्रतीती. ॥ ७
बिंबैक्यही सैम-सैमाधिसुषुप्तिकाळीं भोगांमधें त्रिगुण हें प्रतिबिंब पोळी, ।
त्यांलाचि यद्यपिहि भोक्तृपणप्रतीती आहेचि बिंबहि अभोक्तृपणें स्वैचित्तीं. ॥ ८
आधार सैत्वसलिला क्षिति बिंब जेव्हां चिद्रूप त्यांत दरडी दिसतात तेव्हां; ।
बिंबात्मते करुनि सत्वजळ प्रकाशे तेव्हां तया उदकिं चित्प्रतिबिंब भासे. ॥ ९
चिद्बिंब जें लैय समाधिसुषुप्तिमांजी आत्मा न तो म्हणउनी म्हणवे कसा जी? ।
भोगासि जे सैमयिं तंत्प्रतिबिंब भोगी, बिंबीं अभोक्तृपण देखति आत्मयोगी. १०
बिंबीं कदापि न गुणत्रयरूप वृत्ती याळागिं तेथ न वसे किमपि प्रवृत्ती; ।
भोगीं प्रतीति उपजे प्रतिबिंबरूपीं सत्वें समाधिगत बिंब सुखस्वरूपीं. ॥ ११
तेथें प्रतीति न दिसे पडतां सुषुप्ती सत्वास जे समयिं तामस मूढ वृत्ती, ।

---

१. बिंबैक्य. २. याचप्रमाणें, सुषुप्तिप्रमाणेंच. ३. समाधि असतां तुर्यावस्थेंत; सुषुप्ति, स्वप्न आणि जागृति यांहून जी निराळी अवस्था ती तूर्यावस्था. [यथार्थदीपिका–अ० १५ ओं० ११६१.] ४. झोंपेंतून जागा झालेला. ५. समान, सारखें, तुल्य. ६. समाधि आणि सुषुप्ति या अवस्थांत. ७. 'भोगांत जे समयीं भोक्तृपण प्रतीति' असते त्या वेळीं. ८. जीवात्मा. ९. गृह्ण करी. [अ० ४ श्लो० ३०-३१.] त्रिगुणांनीं युक्त प्रतिबिंब असतें. १०. प्रतिबिंबाला. ११. अंतःकरणामध्यें, ज्ञान्याच्या अंतःकरणांत–असा अर्थ. १२. या श्लोकांत ज्या दृष्टांताचा उल्लेख केला आहे त्याजविषयी अध्याय ४ श्लोक २९-४४ पहा. १३. सत्वगुणरूप उदकास. (चित्तास अथवा बुद्धीस). [यथार्थदीपिका–अ० २ ओं० १५.] १४. पृथ्वी, धरणी. १५. चित्स्वरूप चैतन्य. १६. बिंबैक्यरूपानें. १७. निमग्न, समाधीमध्यें अथवा सुषुप्तीमध्यें निमग्न असणारें. १८. समाधीमध्यें किंवा सुषुप्तीमध्यें आठवणारा शुद्ध आत्मा. १९. जागृतींत. २०. त्या शुद्ध आत्म्याचें प्रतिबिंब=जीवात्मा. २१. शुद्ध आत्म्याच्या ठिकाणीं. २२. आत्मज्ञानी. २३. चैतन्यास वृत्ति नाहीं. सत्वाचे योगानें चैतन्यास वृत्ति येते. वृत्तीचे दोन भेद–१ प्रवृत्ति २ निवृत्ति. 'गुणत्रयरूप'. जी वृत्ति तिचें नांव 'प्रवृत्ति,' आणि शुद्ध सत्वगुणवृत्ती जी ती 'निवृत्ति.' या दोन्ही वृत्तींस चैतन्याच्या योगानें प्रतीति असते. निवृत्तिस्थितींत 'समाधिगत बिंबसुखस्वरूपीं प्रतीति' असते आणि प्रवृत्तिस्थितींत 'प्रतिबिंबरूपीं'–(जीवरूपानें) भोगीं (सुखदुःखभोगांविषयीं) प्रतीति उपजे (उत्पन्न होते). निवृत्तिस्थिति हेंच बिंबस्वरूप होय. २४. सुषुप्ति अवस्थेंत. २५. वृत्तीच्या दोन स्थिति (प्रवृत्ति आणि निवृत्ति) यांचा उल्लेख वरच्या टीपेंत केला आहे. वृत्तीची तिसरी स्थिति 'मूढवृत्ति' म्हणजे सुषुप्ति. पहिल्या दोन स्थितींत प्रतीति असते, पण तिसरींत म्हणजे सुषुप्तींत प्रतीति नसते.

[1]सर्वत्र तें [2]वोळखिलें निज सर्व [3]संतीं, [4]सत्वें [5]तयांतहि [6]समाधिसुखप्रतीती. ॥ १२
[7]साक्षी [8]सुषुप्तिसमयीं म्हणती [9]तयातें निर्धर्मकत्व बरवें नकळे [10]जयांतें, ।
[11]साक्षित्व [12]ईश्वरउपाधि करूनि जेव्हां [13]जीवात्मयासि [14]निरुपाधि [15]चिद्वैक्य तेव्हां.॥
[16]साक्षित्व केवळ घडे अगुणींच जेव्हां [17]सोपाधिधर्म निरुपाधिपणींच तेव्हां, ।
साक्षित्व [18]यास्तव [19]नें केवळ निर्गुणत्वीं तेथें चिद्वैक्य[20] तम ज्या समयांत सत्वीं. ॥ १४
सत्वोदकांत मिसळे [21]तमपंक [22]जेव्हां बिंबमधें [23]प्रतिमुखासि [24]चिद्वैक्य [25]तेव्हां, ।
साक्षित्व ईश्वरउपाधिस कां [26]असेना? [27]याला [28]प्रतीति [29]निरुपाधिपणें [30]दिसेना. ॥ १५

---

१. सर्व स्थितींत. श्लोक ११ आणि श्लोक १२ (पूर्वार्ध) यांत दर्शविलेल्या तीनही वृत्तींत, म्हणजे प्रवृत्तींत (गुणत्रयरूपवृत्तींत) निवृत्तींत (प्रवृत्त्यभावरूप वृत्तींत) आणि मूढवृत्तींत. २. जाणिलें. ३. ज्ञान्यांनीं, योगीजनांनीं. ४. सत्वगुणाचे योगानें. ५. आत्मतत्वांत, आत्मस्वरूपीं. ६. समाधिसुखाचा अनुभव चैतन्यास सत्वाचा योग नसेल तर 'प्रतीति असावयाची नाहीं– असें तात्पर्य. ७. द्रष्टा, पाहणारा. ८. या पदाचा संबंध 'म्हणती' या क्रियापदाकडे नाहीं. 'नकळे' या क्रियेकडे आहे. ९. श्लोक १२ चरण ३ यांत वर्णिलेलें जें 'निज' आत्मत्व त्यातें. चौथ्या चरणांत (श्लोक १२) वर्णिलेली 'समाधिसुख प्रतीति' असते त्याला 'साक्षी' म्हणतात– असा भावार्थ. १०. 'साक्षी' ज्यास म्हणतात त्याला 'सुषुप्तिसमयीं (झोंपेच्या वेळीं) आपलें बरवें 'निर्धर्मकत्व' नकळे (कळत नाहीं). ११. यथार्थदीपिका–अध्याय ७ ओंव्या २१, २२, ३१, ३३ पहा. १२. निर्गुण ब्रह्म व शुद्धसत्व यांचा जो संबंध तो ईश्वरोपाधि–त्या ईश्वरोपाधीच्या योगानें. १३. प्रतिबिंबस्वरूपाला. १४. उपाधिरहित, गुणत्रयरूप जी जीवोपाधि त्या उपाधिविरहित. १५. बिंबैक्य. १६. 'साक्षित्व' हा उपाधिधर्म आहे. तो धर्म जर (जेव्हां) अगुणींच घडेल (निर्गुण ब्रह्माचे ठायीं–उपाधिरहित वस्तूचे ठायीं संभवेल) तर (तेव्हां) सोपाधिधर्म निरुपाधिपणींच घडूं शकतील–असा भाव. १७. उपाधीचे धर्म. १८. पूर्वार्धांत सांगितलेल्या कारणास्तव. १९. नाहीं. केवळ निर्गुणत्वीं साक्षित्व नाहीं आणि सुषुप्तींत (ज्या समयांत सत्वीं तम तेथें) 'साक्षित्व' नाहीं. २०. निर्गुणत्वीं निरुपाधिगुणामुळें साक्षित्व नाहीं परंतु सुषुप्तींत उपाधि असूनही साक्षित्व कां नाहीं? या शंकेचें निराकरण श्लोक १५,१६,१७ व १८ (पूर्वार्ध) यांत केलें आहे. २१. तमोरूप पंक (चिखल). २२. सुषुप्तींत (श्लोक ५ प्रथम पाद पहा). २३. प्रतिबिंबास. २४. या श्लोकार्धांत वर्णिलेल्या स्थितींत–अर्थात् सुषुप्तींत. २५. 'तेव्हां प्रतीति दिसेना'–असा अन्वय. २६. सुषुप्तीमध्यें उपाधि नाश पावत नाहीं. जर उपाधि आहे तर साक्षित्व आहे. या न्यायानें सुषुप्तींत–ईश्वर उपाधीस साक्षित्व असेल. २७. निद्रेंत असणाराला. २८. प्रत्यय, अनुभव, जाणीव. २९. उपाधिरहित असल्याप्रमाणें. ३०. सुषुप्तींत प्रतीति नसते–असें तात्पर्य.

स्वप्रत्ययाविण उपाधि असोनि नाहीं साक्षित्व तेथ वदवे न तयासि कांहीं, ।
जीवात्मयासि न असे प्रळयीं प्रतीती [3]तैसी असोनिहि उपाधि पडे सुषुप्ती.॥ १६
अंधासि भास्कर दिसे न अशाच रीती झांकील नेत्रहि तई न रविप्रतीती, ।
ऐसें प्रतीति न असे प्रळयांत जैसी, नाहीं सुषुप्ति समयांतहि यासि तैसी.॥ १७
साक्षित्व यासि न घडे मतिमूढ जेव्हां बिंबैक्य पावत असे प्रतिबिंब तेव्हां, ।
सत्वांत जागरिं जरि [11]प्रतिबिंब [12]होतें आत्मत्व शाश्वत अखंडहि [13]तेंचि येतें. ॥ १८
तें नातळे रजतमा सुखदुःखभोगीं [18]तेथें अभोक्तृपण देखति आत्मयोगी, ।
सत्वांत जागरिं जरि प्रतिबिंब जेव्हां [21]पाहे सुषुप्तिसुख आपण [22]तेंचि [23]तेव्हां.॥ १९
आत्मप्रतीति सकळां प्रतिबिंबरूपें ज्ञाल्यास केवळ सुषुप्तिगतस्वरूपें, ।
होऊनि भोगित असे प्रतिबिंब [26]देहीं बिंबासि भोक्तृपण तों न दिसेचि कांहीं.॥ २०

---

१. वदवे न=बोलतां येत नाहीं. उपाधि असला तरी प्रत्यय नाहीं यास्तव तेथें साक्षित्व आहे असें म्हणतां येत नाहीं—असें तात्पर्य. २. यथार्थदीपिका—अध्याय ८ ओंवी ८२५ पहा. ३. जशी प्रळयीं प्रतीति नसे तशीच सुषुप्तींतही प्रतीति असत नाहीं—असा अर्थ. [यथार्थदीपिका—अध्याय १० ओंव्या ५४९-५५१ पहा.] ४. सुषुप्ती पडे=झोंप लागे. ५. पूर्वीच्या श्लोकांतील गोष्ट उदाहरणानें स्पष्ट केली आहे. जशी आंधळ्यास डोळे नसल्यामुळें रविप्रतीति नसते, तशीच डोळसास त्यानें डोळे मिटले तर रविप्रतीति नसते. आणि त्याप्रमाणेंच 'जीवोपाधि' नसल्यामुळें प्रळयांत आणि 'जीवोपाधि' असूनही तमोगुणांत मूढवृत्ति झाल्यामुळें सुषुप्तींत प्रतीति नसते. ६. सूर्य. ७. अशा प्रकारानें, येणेंकरून. ८. घडत नाहीं, प्राप्त होत नाहीं. ९. 'सुषुप्तींत तमीं गढुळ । तें सत्वजळ होतां नितळ । प्रतिबिंब केवळ । दिसे त्यामध्यें. ॥ ॥ ४७९ ॥' [यथार्थदीपिका—अध्याय १५]. १०. जागृतींत, जागा झाल्यावर. ११. जीवस्वरूप. १२. दिसूं लागतें. १३. यथार्थदीपिका—अध्याय १० ओंवी ५५० पहा. १४. प्रतिबिंबातें. १५. शाश्वत अखंड आत्मत्व. १६. प्राप्त होत नाहीं, स्पर्शत नाहीं. १७. रजोगुण, तमोगुण यांला. [यथार्थदीपिका—अध्याय १३ ओंव्या ११०७-११०८ पहाव्या.] १८. शाश्वत आणि अखंड असें जें आत्मत्व त्याचे ठायीं. १९. आपण अभोक्ता असें देखती (पाहतात) [यथार्थदीपिका—अध्याय १३ ओंवी ६५९ पहा.] २०. श्लोक १८ याचा उत्तरार्ध व श्लो० १९ याचा उत्तरार्ध हे दोन्ही बहुतेक समानार्थकच आहेत. २१. या क्रियेचा कर्ता 'प्रतिबिंब.' २२. सुषुप्तींतील. २३. जागृतींत. २४. ज्ञात्यावांचून इतरांस जी आत्मप्रतीति असते आणि ज्ञात्यांस जी आत्मप्रतीति असते ती बिंबरूपानें (सुषुप्तिगत स्वरूपानें) असते. २५. सर्वांला, ज्ञाते नाहींत अशांला सुद्धां. २६. 'अर्जुनास अर्जुनरथस्थ । स्पष्ट म्हणे पुरुष भोक्ता ॥ १०९० ॥ परी हा पुरुष प्रतिबिंब । देहमात्रचि ज्यास अवलंब ॥ ११९१॥ [यथार्थदीपिका—अ० १३]. २७. किंचितही, अणुमात्र, तिळप्राय. [यथार्थदीपिका—अ० १२ ओंव्या १४५१,१४५३ पहा.]

[1]बिंबीं अभोक्तृपण सिद्ध परि प्रतीती बिंबासि तों दिसतसे न असेच रीती, ।
त्याला अभोक्तृपण मानियलें तथापी नेणें अभोक्तृपण तें स्वसुखस्वरूपीं. ॥ २१
भोक्तृत्व जें समयि या प्रतिबिंबरूपीं तेव्हां अभोक्तृपण तें न गमे स्वरूपीं, ।
यालागिं भोगुनि अभोक्तृपणप्रतीती कैसी म्हणाल परिसा तरि येथ रीती.॥ २२
चैतन्य हें त्रिविधें वेदपुराणसंतीं मानूनियां उरविलें निर्जि एक अंतीं ।
बिंबार्क[10] ईश[11] दुसरें[12] प्रतिबिंब नीरीं[13] तो जीव त्यांतुनिहि तत्प्रतिभा शरीरीं. ॥ २३
चिद्बिंब तो [14]प्रतिफळे [15]रवि [16]कांस्यपात्रीं [17]जीवत्व तें सकळजीवउपाधिमात्रीं, ।

---

१. श्लो० २० यांत बिंबास भोक्तृत्व नाहीं असें सांगितलें, त्यावर शंका श्लो० २१।२२ यांत दर्शविली आहे ती अशीः–बिंबीं अभोक्तृपण सिद्ध [झालें] परि (परंतु) असेच रीती (अशा रीतीची) प्रतीति बिंबासी तों (तर) न दिसतसे (दिसत नाहीं) स्वसुखस्वरूपीं याला बिंबाला अभोक्तृपण मानियेलें तथापि तें अभोक्तृपण [आत्मा] नेणे ॥ २१ ॥ या प्रतिबिंबरूपी (रूपाला) जे समयीं भोक्तृत्व घडतें, तेव्हां (या समयीं) स्वरूपीं (बिंबस्वरूपाला) तें अभोक्तृत्व न गमे (आपणास भोग होतच नाहींत असा प्रत्यय नसतो) यालागिं (या कारणास्तव) भोगुनी (भोग होऊन) अभोक्तृपणप्रतीति म्हणतां ती कैशी? ॥ २२ ॥' २. श्लो० २१।२२ यांत म्हटल्याप्रमाणें शंका घ्याल. ३. ऐका. येथें श्लो० २३।३२ पर्यंत सांगितलेली रीति ऐका म्हणजे श्लो० २१।२२ यांत सांगितलेली शंका दूर होईल–असा भावार्थ. ४. यथार्थदीपिका–अध्याय १३ ओंव्या ११८-१२२ पहा. ५. तीन प्रकार. पहिला प्रकार या श्लोकाच्या दुसऱ्या चरणांत दुसरा तिसऱ्या व तिसरा चौथ्या चरणांत सांगितला आहे. ६. यथार्थदीपिका–अध्याय १३ ओंवी २२१ पहा. ७. यथार्थदीपिका–अध्याय १३ ओंवी २३७ पहा. ८. निजस्वरूप. शाश्वत आणि अखंड असें. ९. शेवटीं, परिणामीं. अर्थात् सृष्टिकाळाच्या आरंभीं व प्रळयकाळीं. १०. सूर्याचें प्रतिबिंब नीरीं (पाण्यांत) पडतें, तेथून तें दुसरे ठिकाणीं परावर्तन पावतें. तसेंच बिंबीच प्रतिबिंब जो जीव त्याची प्रतिभा शरीरावर परावृत्त होऊन त्यांत चैतन्य उत्पन्न करते. ११. हें चैतन्याचें विशेषण. प्रतिबिंबाचें नव्हे. त्रिविध चैतन्यांतून प्रतिबिंब दुसरें नसून तिसरें आहे. कूद्स्थ असें म्हणतात तें दुसरें चैतन्य होय. १२. प्रतिबिंब ज्या नीरीं असतें तें प्रतिबिंबनीर–त्या नीरीं (उदकांत). १३. देहामध्यें. शरीरीं (देहामध्यें) त्यांतुनि (पाण्यांतून) ही तत्प्रतिभा (बिंबार्क ईश–कूटस्थ जो; त्याचें जें प्रतिबिंब तें) तो जीव होय–असा अन्वय. १४. प्रतिबिंबित होतो. १५. चिद्बिंबरूपी सूर्य. १६. कांस्याच्या भांड्यांत सूर्याचें प्रतिबिंब पडून जसें त्याचें तेज भिंतीवर पडतें, तसें चिद्बिंब हें जीवाची उपाधि जें शरीर त्यांत प्रतिबिंबित होऊन त्याचें तेज स्थूल देहास चेतवितें. कांसें=धातूविशेष. पंडितांच्या तोंडून कांशाला 'अशोकवनिकान्याया'नें उल्लेख झाला एवढाच. मुद्दाम उल्लेख केलेला नसावा असें दिसतें. १७. प्रतिबिंबरूपी. १८. जीवोपाधींमध्यें. उपाधींचे ईशोपाधि व जीवोपाधि असे दोन भेद आहेत. याविषयी खुलासा अध्याय ४ यांत आहे.

भितीवरी प्रतिमुखांतिल तेज जैसें, स्थूलासि चेतवितसे प्रतिबिंब तैसें. ॥ २४
ऐशा तिहींवरि फिरे जनसत्ववृत्ती, सत्वेंकरोनिच तदन्यगुणप्रवृत्ती, ।
चिच्छक्ति, सत्वगुण त्याकरितां प्रतीती, सत्वैकमात्र न उरे पडतां सुषुप्ती. ॥ २५
तें सत्व शुभ्र अतिनिर्मळ नीर जैसें, काळें तयांत तम कर्दमरूप तैसें, ।
तें क्षोभतां उदक सत्व गढूळ जेव्हां, मोडे प्रतीति किमपि स्फुरतें न तेव्हां. ॥ २६
सत्वांत जागरिं घडे प्रथम प्रतीती, तत्प्रत्ययें मग रजस्तमरूप वृत्ती, ।
चैतन्य तों त्रिविध एकचि त्यांत जेथें सत्वें प्रतीति गमते तितुकीच तेथें. ॥ २७
सूर्य प्रभांतर तयांतहि दृष्टि जेथें पावे प्रकाश गमतो तितुकाचि तेथें, ।
दृष्टीस चंचल दिसे प्रतिबिंब जेव्हां बिंबार्क चंचळ नसे न दिसोनि तेव्हां. ॥ २८
भोगांत हो डळमळी रवि जेंवि नीरीं चिद्बिंब सूर्य न दिसोनि नसे विकारीं, ।
बिंबात्मतेकरुनि चंचळता न मानी भोगोनिभोग न मनीं तरि काय हानी ? ॥ २९

---

१. आरशांतील किंवा पाण्यांतील रूपाचें, प्रतिबिंबाचें २. जडाला, शवरूपी देहाला. ३. चैतन्ययुक्त करीत आहे, चलनवलनशक्ति देत आहे. ४. सृष्टीस कारण जी सत्ववृत्ति ती. ५. तत्+अन्य+गुण+प्रवृत्ति=त्या सत्वगुणाहून अन्य जे रजतमादि गुण त्यांची प्रवृत्ति (चलन) सत्वावांचून नाहीं—हें तात्पर्य. ६. माया. [यथार्थदीपिका—अध्याय १८।९८८ पहा.] ७. यथार्थदीपिका—अध्याय १३।२६८ पहा. ८. या शुद्ध सत्वगुणाकरितां. [यथार्थदीपिका—अ० १३ ओं० ३११-३१९ पहा.] ९. राहत नाहीं. सत्वाचे योगानें जिचें अस्तित्व ती प्रतीति सुषुप्ति पडतां उरत नाहीं. याचें कारण पुढें श्लोक २६ यांत सांगितलें आहे. १०. उदक, पाणी. ११. सत्वांत. १२. त्या कर्दम(चिखल)रूपी तमाचें प्राबल्य झालें असतां सत्वगुणरूप स्वच्छ उदक गढूळ होऊन त्यांत बिंबप्रतीति राहात नाहीं. १३. तम. १४. प्राबल्य होतां. १५. सत्वगुणवृत्तींत. १६. जागृतींत. ['जागृतीचें स्वशरीर। दिसे त्या नाव जागर ॥' यथार्थदीपिका—अ० १३ ओं० ६४५.] १७. प्रथमतः, प्रारंभीं, रजस्तमरूप वृत्तीपूर्वी. १८. प्रत्यय, अनुभव. १९. सत्वगुणाच्या प्रत्ययाच्या योगानें. मग रजोगुणाची व तमोगुणाची प्रवृत्ति होते. याविषयीं श्लो० २५ प्रथम, द्वितीय, तृतीय पाद पहा. आणि यथार्थदीपिका—अ० १३ ओं० ३११-३१९ पहा. २०. श्लोक २३ पहा. २१. त्रिविध चैतन्यांतून ज्या एका चैतन्याचे भेदाचे ठिकाणीं सत्वाचा योग घडतो तेथें तितकीच (त्या चैतन्य भेदानुरूप) प्रतीति गमते. याचें स्पष्टीकरण श्लोक २८ व २९ (पूर्वार्ध) यांत उदाहरणानें स्पष्ट करून दाखविलें आहे. २२. सूर्याचें प्रतिबिंब. श्लोक २३ यांतील 'तत्प्रतिभा'. २३. सूर्य आणि प्रभांतर या दोहोंतून एकाचे ठायीं. २४. सूर्याकडे दृष्टी पोहोंचली तर सूर्याचा व प्रतिबिंबाकडे दृष्टी पोहोंचली तर प्रतिबिंबाचा मात्र. २५. प्रतिबिंबस्वरूपी जीवात्मा. २६. हालें. २७. प्रतिबिंबरूपानें सूर्य. २८. बिंबस्वरूपी चैतन्य, शाश्वत व अखंड असें आत्मत्व. २९. भोगांत. ३०. सुखःदुखभोग. ३१. प्रतिबिंबास होणारें सुखदुःख. ३२. मानीत नाहीं.

भोगांतही जरि अभोक्तृपणासि पाहे बिंबात्मतास्मृति अखंड तयासि राहे, ।
भोगी सुखासुख तरी प्रतिबिंब त्याचें आत्मत्व बिंबगत शाश्वत जासि सांचें. ३०
भोक्तृत्व आणिक अभोक्तृपणप्रतीती सत्त्वेसि तों नसति दोनिहि बुद्धिवृत्ती, ।
बुद्धींत भोगित असे प्रतिबिंब जेव्हां बिंबीं अभोक्तृपण आठवि बुद्धि तेव्हां. ॥३१
बिंबीं अभोक्तृपण सत्य जरी कळेना हें ज्ञानहीनजनबुद्धिस आकळेना, ।
नेणें अभोक्तृपण बिंब जरी तथापी आत्मत्व होउनि न भोग तया स्वरूपीं. ३२
आत्माचि तो कसि तयासि नसे प्रतीती? ऐसें म्हणाल तरि कां न पहा सुषुप्ती?।
आत्मा प्रतीतिमय जो इतुकाचि जेव्हां, नाहीं सुषुप्तिसमयीं तरि काय तेव्हां? ॥
आत्मा सुषुप्तित असे, तरि याप्रतीती त्याचें स्वरूप नव्हती गुणबुद्धिवृत्ती ।
शंकानिवृत्ति इतुकी निजवैदिकांची शंके तथापिहि अवैदिकबुद्धि कांची. ॥३४
लोकीं द्विधा द्विविध निंदक लोकवेदीं बौद्ध प्रसिद्ध कपटें करि भेदवादी, ।

---

१. ज्ञात्यास. २. तथापि, बिंबात्मतास्मृति असूनही. ३. सत्य, खरें. ४. चैतन्यास. 'सत्ता नित्यता तत्वतां । सद्वस्तूसची.' [यथार्थदीपिका—अध्याय २ ओवी २९१.] ५. सत्व=बुद्धि, प्रवृत्ति=भोक्तृत्वपणप्रतीति, निवृत्ति=अभोक्तृपणप्रतीति, असें समजावें. श्लोक ११ यावरील टीप पहा. [यथार्थदीपिका—अध्याय ५ ओव्या १८७-१९६ पहा.] ६. यथार्थदीपिका—अध्याय ५ ओवी २०३ पहा. ७. यथार्थदीपिका—अध्याय ५ ओंवी २०८ पहा. ८. बिंबीं (आत्म्याचे शुद्ध स्वरूपास) अभोक्तृत्व जरी कळेना, [अध्याय ४ श्लोक १४ पूर्वार्धाप्रमाणें 'प्रारब्धवायु करि बुद्धिजळांत ऊर्मी । त्या मीपणीं गमतसे असुखी सुखी मी ॥' अशी गोष्ट आहे तरी] बिंबीं अभोक्तृपण [आहे, हीच गोष्ट] सत्य. [मात्र] ज्ञानहीन जनबुद्धीस (अज्ञानीजनाच्या बुद्धीला) हें अभोक्तृपण आकळेना (आकलन होत नाहीं, कळत नाहीं)—असा अन्वयार्थ. ९. बिंबस्वरूपाला, स्वस्वरूप चैतन्याला. प्रतिबिंबरूपाला भोग आहेत परंतु तया स्वरूपाला (बिंबस्वरूपाला) भोग नाहीत. १०. श्लोक ३३-३४ (पूर्वार्ध) यांचा अन्वय असाः—आत्माचि तो मग तयासि प्रतीति कैसी नसे? ऐसें म्हणाल (असें विचाराल) तरि सुषुप्ति कां न पहा? (सुषुप्तीअवस्थेचा, निद्रास्थितीचा विचार करा. म्हणजे कळेल) प्रतीतिमय जो इतुकाचि [मात्र] आत्मा जेव्हां (जर) तेव्हां (तर) तरी सुषुप्तीसमयीं आत्मा नाहीं काय? ॥ ३३ ॥ आत्मा सुषुप्तींत असे [यांत संशय नाहीं] तरि (वास्तव) [असें सिद्ध होतें कीं] या प्रतीति त्याचें (आत्म्याचें) स्वरूप नव्हती.—[या प्रतीति] गुणबुद्धिवृत्ति आहेत (प्रतीति हा धर्म आत्म्याचेठायीं नाहीं; तो धर्म सत्वगुणबुद्धिवृत्तीचा आहे). ११. प्रतीति हें आत्म्याचें स्वरूप नव्हे. प्रतीति—असणें ही गुणबुद्धिवृत्ति आहे—असा भावार्थ. १२. नास्तिकलोकांची बुद्धि. १३. कच्ची, अपक्व. १४. लोकीं=वेदांतशास्त्र मानणाऱ्यांस. आत्म्याचे स्वरूपाचें निरूपण पंडितांनीं या अध्यायांत श्लोक ३४ पर्यंत केलें आहे. परंतु अवैदिकांच्या शंका राहतात म्हणून त्यांस उत्तर देण्याचा येथून प्रयत्न केला आहे. वेदनिंदकांचे दोन वर्ग केले:—(१) बौद्ध हे प्रसिद्ध निंदक ज्यांस वेदांचें प्रामाण्य मुळींच कबूल नाहीं. (२)

बौद्धां प्रमाणचि न केवळ वेद जैसे पाखांडियासि[1] अवघे निगमार्थ[2] तैसे. ॥३९
त्यामाजि[3] बौद्ध म्हणती[4] पडतां सुषुप्ती, आत्मत्व शून्य उरतें नसतां प्रतीती, ।
येथेंच[5] यावरि[6] नवेंचुनि[7] वेदवाणी[8] संदेह[9] हा अनुभवें हरि[10] चक्रपाणी[11]. ॥ ३६
जें शून्य[12] तें सुख असें सहसा घडेना, तेव्हां सुषुप्तिसमयीं सुख सांपडेना[13]; ।
होतांचि जागृति सुख स्मरतो किमर्थ? स्वप्नांत जागरिं न जें सुख तें समर्थ[14]. ॥
चैतन्य[15] तेंचि सुख जागरिंही प्रयासीं आत्मस्वरूप गमतें सुख जें जयासीं, ।
जाणे सुखासुख तयाविण अन्य जेव्हां याला सुषुप्तिसुखही नघडेचि तेव्हां.॥३८
जाणे सुखासि सुख यासि जईं कळेना, नाहींच हा जरि सुषुप्तिस आढळेना; ।
ऐसें म्हणा[16] जरि म्हणाल[17] तरी घडेना[18], तें सौख्य[19] यासि मग जागरिं सांपडेना[20].॥

---

भेदवादी यांस वेदांचें प्रामाण्य कबूल आहे, परंतु हे त्यांचा खरा अर्थ सोडून खोटा अर्थ प्रतिपादितात म्हणून त्यांसही पंडितांनीं 'वेदानिंदक' म्हटलें आहे. [द्वारकाविजय—सर्ग ४ श्लोक २२-९१ पहा.] १५. दोन प्रकारचे. १६. बौद्ध जसे प्रसिद्ध वेदनिंदक तसे भेदवादी नव्हेत. हे वेदपालक असून निंदक पाहेत; असें 'कपटें' या शब्दानें दाखविलें आहे. [द्वारकाविजय—सर्ग ४ श्लोक ४९ पहा.] १७. यथार्थदीपिका—अ० २ ओ० ४३९-४४० पहा.

१. नास्तिकांस, भेदवाद्यांस. [द्वारकाविजय—सर्ग ४ श्लोक ५६ यांत भेदवाद्यास 'पाखंड' असेंच म्हटलें आहे.] २. वेदांचा अर्थ. ३. बौद्ध व भेदवादी या दोघांतून. ४. जसे वेदांतवादी लोक म्हणतात कीं ब्रह्मापासून सर्व जग निर्माण झालें आहे त्याप्रमाणें बौद्ध म्हणतात कीं सृष्टि शून्यापासून झाली आहे. ५. याच अध्यायांत. या अध्यायांत बौद्धांस उत्तर आहे व पुढील अध्यायांत भेदवाद्यांस उत्तर आहे. ६. यापुढें, याऊपर. ७. न खर्चितां, वेदवचनाचा आधार न घेतां. ८. वेदवचनें. ९. शंका, संशय. १०. हरण करील, संदेह दूर करील. ११. ग्रंथकर्ता ईश्वर (श्रीकृष्ण). १२. सुषुप्तीमध्यें जर आत्मत्व शून्य उरतें तर सुषुप्तींत सुख कोठून होणार? आणि सुखप्रतीति नाहीं झाली तर जागृतावस्थेंत सुखाचा अनुभव आढळतो तो कोठला? १३. सांपडूं नये, सुषुप्तीसमयीं सुखानुभव असूं नये. १४. श्रेष्ठ, अत्यंत सुख, स्वप्नांतील आणि जागृतींतील आणि सुखापेक्षांही समर्थ—असें सुख. १५. श्लोक ३८, ३९ (पूर्वार्ध) यांत बौद्धांच्या म्हणण्याचा अनुवाद केला आहे, तो असाः—'जागरीं (जागृतींत) सुखप्रयासीं (सुखदुःखप्रसंगीं)ही जयासि (ज्याला) सुख गमतें (सुखदुःख कळतें) [असें] जें चैतन्य तेंचि आत्मस्वरूप [होय]. याला (आत्मस्वरूपाला) सुषुप्तिसुखही जेव्हां (ज्यापेक्षां) न घडेचि तेव्हां (त्यापेक्षां) तयाविण (आत्म्याखेरीज) अन्य (दुसराच) [सुषुप्तींतील] सुखासुख जाणे. ॥ ३८ ॥ [सुषुप्तींतील] सुखासीं सुख[च] जाणे. यासि (आत्म्यासि) जयीं (ज्यापेक्षां) [तें] सुख कळेना (कळत नाहीं) [आणि] हा (आत्मा) सुषुप्तीस जरि आढळेना (आढळत नाहीं) [तरी] हा (आत्मा) नाहींच (सुषुप्तींत आत्मत्व शून्य उरतें.) १६. श्लोक ३८।३९ यांत सांगितलेला सिद्धांत मान्य करा. १७. आम्हां आस्तिकांस तुम्ही बौद्ध (नास्तिक) सांगाल. १८. ती गोष्ट आम्हांस

[1]होतीं सुखें किमपि जेथ म्हणे कळेना, [2]तें यासि तेथ [3]नसतां सुख आकळेना, ।
[4]आहे म्हणाल तरि तो सुखभोग याला, झाला कसा किमपिही नकळोनि बोला.॥४०
आतां [5]म्हणाल सुख तेथ तया स्फुरेना जों यासि जागृति न तोंवरि तें स्मरेना, ।
तेव्हां [6]तनूसि निजल्यावरि गंध लागे तें शैत्य जागरिं कळे सुख तेंचि सांगे. ॥
तेव्हां सुषुप्तिसमयीं सुखलेश नाहीं, स्रक्चंदनादि सुखलेश कळे न [10]कांहीं, ।
होती सुखें किमपि जेथ कळे न तेथें, [11]यीं [12]प्रत्ययासि तरि उत्तर [13,14]हें न [15]येथें. ॥
स्रक्चंदनादि घडले मज [16]भोग देहीं, निद्रेंत हें सुख मला कळलें न कांहीं, ।
ऐसें म्हणे परि सुषुप्तिसुखासि ऐसें निद्रेंत सौख्य नव्हतें म्हणवेल कैसें ? ॥४२
[17]तेथें प्रतीत नसतां सुख सिद्ध जेव्हां, भोगेंकरोनि सुखभोग न [18]तेथ तेव्हां, ।
जों भोग्य भोक्तृपण भोगेंज सौख्य ऐसा, नाहीं [19]विवेकें [20]सुखभोग वदाल कैसा ?
एवं असोनि नकळे सुख तेथ जेव्हां तें भोगजन्य सुख तों म्हणवे न तेव्हां. ।
[12]जो कां सुषुप्तिसमयीं सुखरूप तेथें, तो बुद्धिनें स्मरतसे सुख तेंचि येथें.॥४९
चैतन्य आणि सुख वास्तव [22]ऐक दोन्ही; आतां [23]म्हणाल जरि चेतनतेसि हानी ।

---

मान्य नाहीं, तो सिद्धांत सत्य नाहीं. [याचें कारण या श्लोकाचे चतुर्थ चरणांत सांगितलें आहे]. १९. सुषुप्तींतील. २०. जागृतास. २१. सांपडूं नये, मिळूं नये.

१. श्लोक ३९ चतुर्थ पादांतील अर्थ या पादांत फोड करून सांगितला आहे. २. सुषुप्तींतील (सुख). ३. त्या ठिकाणीं (सुषुप्तींत) हा नसता तर. ४. हा सुषुप्तींतही आहे. ५. या क्रियेचा 'बौद्ध' हा अध्याहृत कर्ता. ६. देहाला. ७. चंदनादिकांचा लेप. ८. 'सत्य' असा अन्य पाठ आहे. सत्य=खरा प्रकार. गंधादि लेपनांचा अनुभव. ९. हारचंदनादि. १०. श्लोक४१ व ४२ (पूर्वार्ध) यांत बौद्धांचें भाषण आहे. त्याचें तात्पर्य असें:—झोंपेंत असतां शरीरास चंदनादि लेप केले तर ते कळत नाहींत. ते जागा झाल्यावर समजण्यांत येतात, व सुखावह वाटतात. तसेंच झोंपेंतील सुख ही जागृत झाल्यावर स्मरतें—या दोहोंत फरक नाहीं. ११. या श्लोकाचे तिसऱ्या चरणांत वर्णिलेल्या. १२. 'होती सुखें किमपि जेथ कळे न तेथें' असा जो प्रत्यय त्या प्रत्ययानें. १३. श्लोक ४१।४२ (पूर्वार्ध) यांतील गोष्ट. १४. नाहीं. योग्य उत्तर नाहीं—असें तात्पर्य. १५. या समयीं, या प्रसंगीं. १६. उपचार. १७. निद्रेंत. १८. भोगजन्य. १९. विचार. अनुभवभोग्य=ज्या वस्तूचा उपभोग घ्यावयाचा ती वस्तु, भोक्तृपण=उपभोग घेणारा जो त्याचा भाव, भोगजसौख्य=उपभोगसंबंधीं सुख—ह्या तीन गोष्टी नाहींत. १९. भोगजन्य असें सुख. २०. सुषुप्तिसुख. सुषुप्तिसुख हें भोगजन्य नव्हे—असें तात्पर्य. २१. आत्मा. २२. यथार्थदीपिका—अध्याय १८ ओ० १२४९-१२५० पहा. २३. सुषुप्तीच्या वेळीं चेतनेशी हानि घडते (चैतन्याचा नाश होतो) असें म्हणाल—असा अर्थ.

चैतन्य कोठुनि वदा [1]उपजे [2]प्रबोधीं? बुद्धी स्मरे निज[3]अचेतन ते [4]समाधीं. ॥४६
काहींच जेथ नकळे सुख तेथ आहे, या प्रत्ययें निजजडत्वचि बुद्धि पाहे; ।
[6]तेथील जें सुख तयासिच आत्मता हे, चैतन्यहानि [7]म्हणणें न [8]तयासि [9]साहे. ॥
बुद्धीस [10]यास्तव [11]कळे [12]परि भोग [13]नाहीं, ज्यालागिं भोग जड तें म्हणवे न कांहीं ।
[14]त्यां चित्सुखेंकरुनि [15]हे [16]दिसते प्रतीति, बुद्धिप्रतीति [17]न उरे पडतां सुषुप्ती. ॥४८
[19]कांहींच जें न कळणें जडरूपता हे, आनंद मात्र [19]मतिवांचुनि [20]ह्यांचि राहे; ।
[21]भोक्ता [22]त्यांविण [23]दुजा तरि सांपडेना, बुद्धीस भोक्तृपण तों [24]सहसा घडेना. ॥४९
आत्मत्व [25]केवळ सुषुप्तिपुढें [26]ढळेना, [27]अन्यत्र [28]भोक्तृपण [29]त्यांविण आढळेना; ।

---

१. उत्पन्न होतें. २. जागृतींत, जागा होते वेळीं. ३. आपल्या जडत्वाला. ४. समाधि-अवस्थेतील सुषुप्तींत जर बुद्धि सचेतन असती तर त्यास समाधि म्हणतां आली असती. या अर्थानें समाधींतील 'निजअचेतनते'ला बुद्धि स्मरे असें म्हटलें असावें. सुषुप्तींतील बुद्धि अचेतन असते. आणि ती अचेतनता जागृतींत बुद्धि स्मरते--असें तात्पर्य. ५. यथार्थदीपिका--अध्याय ३ ओव्या ८३९-८४९ पहा. ६. सुषुप्तींतील. ७. सुषुप्तींत चैतन्य नसतें. आत्मत्व शून्य उरतें असें म्हणणें. ८. सुषुप्तींतील स्वरूपाला. ९. साहे न=सहन होत नाहीं, शोभत नाहीं, योग्य नाहीं. १०. या चैतन्याचे योगानें, चैतन्यामुळें. ११. प्रतीति असते. १२. परंतु. १३. बुद्धीस भोग नाहीं--असा अर्थ. [यथार्थदीपिका--अ० १२ ओ० ६३० व ६३२ पहा]. १४. बुद्धीस भोग नाहीं परि यास्तव (यामुळें, चैतन्यामुळें बुद्धीस भोग कळे. आणि ज्या लागिं (ज्याला--ज्या चैतन्याला) जड म्हणवे न (म्हणतां येत नाहीं) त्या चित्सुखें करुनि--असा अन्वय. १५. हे (प्रतीति). सुषुप्तींतील सुखाची प्रतीति दिसते--असा अर्थ. १६. 'दिसती' असा अन्य पाठ. १७. उरे न=उरत नाहीं. बुद्धिप्रतीति राहात नाहीं (नष्ट होते)--असा अर्थ. १८. यथार्थदीपिका--अध्याय ३ ओव्या ८५७-८५८ पहा. १९. मति=बुद्धि. बुद्धिविरहित ही सुषुप्तींत आनंद मात्र असतोच--असें तात्पर्य. २०. श्लोक ४६ प्रथम पादांत 'चैतन्य आणि सुख एक' असें ज्यास म्हटलें आहे तो, श्लोक ४८ द्वितीय पादांत ज्यास 'चित्सुख' म्हटलें आहे तो. २१. सुषुप्ति-सुखानुभव घेणारा. २२. द्वितीय पादांत 'ह्यांचि' असें ज्यास म्हटलें आहे त्यावांचून. २३. दुसरा, अन्य, परका. २४. निःसंशय, बुद्धि जड असल्यामुळें तिजला भोक्तृपण नाहीं यांत शंका नाहीं--असें तात्पर्य. २५. हें 'आत्मत्व' या पदाचें विशेषण. आत्मत्व द्विविध आहे:--(१) जीवस्वरूप (प्रतिबिंबस्वरूप). (२) कूटस्थ स्वरूप (बिंबस्वरूप). 'केवळ आत्मत्व' म्हणजे कूटस्थ ज्यास श्लोक १८ चौथ्या चरणांत 'शाश्वत अखंड' असें म्हटलें आहे. २६. चळत नाहीं, सुषुप्तींतही असतेंच. २७. दुसरे कोणास. २८. सुषुप्तीसुखसंबंधी भोक्तृपण. २९. 'केवळ आत्मत्व' जें त्याविण.

हें [1]वृत्तिरूप [2]कळणेंहि [3]तैया घडेना वृत्ती सचेतन सुषुप्ति [4]तई पैंडेना. ॥ ५०
[5]बाहेरही [6]पसरती बहु दूर [7]वृत्ती, देहाचि आत्मगत भोग तथापि [8]होती; ।
[9]ज्याला न भोग जडता [10]स्फुट सिद्ध त्याला, [11]चैतन्यसिद्धिसुख मात्र न केंवि बोला ? ५१
आतां म्हणाल तरि कां न [12]तैया प्रतीति ? हे आइका अनुभवेंचिकरूनि रीती; ।
आत्मा वदे परि जिभेविण बोलवेना, चाले स्वयें परि पदाविण चालवेना. ॥ ५२
[13]सत्तेकरोनिच [14]उठे स्वपरप्रतीति, [15]एवं तथापिहि [16]अपेक्षित तेथ वृत्ती; ।

---

१. प्रत्यय. प्रतीतिरूपी शुद्ध सत्वगुणयुक्त जें चैतन्य (निवृत्तिस्थिति) तेथें प्रतीति असते परंतु सुषुप्तींतील जें आत्मत्व तेथें तीही 'वृत्ति' नसते—असें तात्पर्य. २. कळणें हा धर्म सत्वधर्मवृत्तीचा आहे; चैतन्याचा नव्हे. [यथार्थदीपिका—अध्याय ११ ओवी २५ पहा.] ३. सत्वरहितही जें निर्गुण 'आत्मत्व' त्याला. ४. वृत्ति जर सचेतन असेल तर ती सुषुप्तीच नव्हे. वृत्ति अचेतन (चैतन्यविरहित) असते. त्या अवस्थेस 'सुषुप्ति' असें म्हणतात. वृत्तीला (सत्वाला) चेतना नाहीं. चेतनेला वृत्ति आहे. (अध्याय ४ श्लोक २५.) त्या दोहोंचा योग नाहीं, तर प्रतीति कळण्याला साधन नाहीं—हें तात्पर्य. ५. देहाचे बाहेर. ६. पसरण पावते, व्यापिते. ७. धारणा. ['प्रवृत्ति अथवा निवृत्ति । जे न विसरे गोष्टी । भळती चित्तवृत्ति । ते धारणा म्हणावी *** ॥ ९५७॥' यथार्थदीपिका—अ० १८.] ही धारणा देहाबाहेरही प्रसरण पावते, तेव्हां तिला बाहेरच्या वस्तूचें ज्ञान कळतें. यातिषयीं यथार्थदीपिका—अध्याय १८ गीता श्लोक ३३ वरील टीकेवरून चांगला बोध होतो. ८. वृत्तीस जर सुखदुःखभोग असता तर जेथपर्यंत वृत्तीचा प्रसार असेल, तेथपर्यंत सुखदुःखभोग कळला असता. जसें:—देहास ज्यांचा स्पर्श नाहीं अशा शीत, उष्ण वस्तू आपण पहातों. म्हणजे त्या वस्तु आमच्या बुद्धिवृत्तीस कळतात. परंतु सुखदुःखभोग होत नाहीं कारण जर बुद्धि सचेतन असती तर सुखदुःखभोग कळला असता. सारांश बुद्धि(वृत्ति) जड आहे—असें तात्पर्य. ९. वृत्तीला. १०. स्पष्ट, उघड, निःसंशय. ११. चैतन्याचे योगानें ज्याची सिद्धि (प्राप्ति) तें सुख—चैतन्य जेथें नाहीं तेथें सुखाचा अनुभव नाहीं—असा भावार्थ. १२. आत्म्याला. आत्म्यालाच मात्र सुखसिद्धि आहे. वृत्तीला सुखसिद्धि नाहीं. तर वृत्तिविरहित अशा सुषुप्तिअवस्थेंत त्या आत्म्याला प्रतीति कां नसावी ? या शंकेचा या पादांत उल्लेख करून तिचें निराकरण श्लोक ५२-५३-५४-५५ (पूर्वार्ध) यांत केलें आहे. १३. सत्तेच्या योगानें. सत्ता=चैतन्य आत्मा. [यथार्थदीपिका—अध्याय २ ओवी २९१], आत्मसत्ता. [यथार्थदीपिका— अ० ५।२०३]. १४. असते, उठते. वृत्तीला जी स्वपरप्रतीति असते ती चैतन्ययोगानें असते—असा अर्थ. १५. याप्रमाणें. आत्मा स्वतः बोलतो, चालतो पण त्यास बोलण्यास जिभेची व चालण्यास पायांची जरूरी असते त्याप्रमाणें. १६. अपेक्षा (जरूर) आहे. प्रतीति उत्पन्न होण्यास सत्तेला (चैतन्याला) वृत्तीची गरज आहे.

[1]आत्मा असे [2]नखशिखाग्र समग्र देहीं, वृत्तीविणें स्फुरतसे न [3]तयासि [4]तोही. ॥ ५३
[5]आत्मा [6]तनूंत भरला परि [7]वृत्ति [8]जेथें, [9]पोंचेल [10]अंग [11]तितुकेंचि [12]गमेलें तेथें; ।
पादादिकां अवयवां [13]मति जों [14]स्मरेना, [15]व्यापोनि ते [16]स्थळिं असोनिहि [17]तें [18]स्फुरेना. ॥ ५४
[19]येणेंरिती [20]स्वपरस्वरूपहि या प्रतीति, होती, [21]प्रकाशति जइं [22]निजचित्तवृत्ती; ।
वृत्ती प्रकाशति [23]म्हणाल [24]तुम्हीं जडाला, [25]तेन्हां सुषुप्तिसुख वृत्तिवरीच [26]बोलीं. ॥ ५५
अंगीकराल तरि [27]तेथें नसे [28]प्रतीति, [29]आतां प्रकाशक कशा जडरूप वृत्ती; ।
मानाल [30]वृत्तिकरितां जरि [31]यी प्रतीती, होती [32]सुषुप्तिसमयीं [33]जडमूढ वृत्ती. ॥ ५६
[34]ज्याला सुषुप्तिसुख घेउनि तोचि वृत्ती, वृत्तिप्रकाशक तयास करी प्रतीती; ।

---

१. या श्लोकाचे पूर्वार्धांत वर्णिलेली गोष्ट येथें पंडितांनीं स्पष्ट करून दाखविली आहे. २. नखापासून तों शेंडीच्या शेवटापर्यंत सर्व देहांत आत्मा असे (आहे.) ३. आत्म्यास. [यथार्थदीपिका—अध्याय १० ओवी ५३२ पहा.] ४. आत्माही. ५. श्लोक ५३ उत्तरार्धांत सांगितलेली गोष्ट या श्लोकांत अधिक स्पष्ट केली आहे. ६. शरीरांत. ७. बुद्धिवृत्ति, अंतःकरण, चित्त. बुद्धि (मति), अहंकार (मीपणा, गर्व), मन, प्राण, इंद्रियें, हीं सर्व वृत्तीचींच स्वरूपें आहेत. ८. शरीराचे ज्या ज्या भागांत. ९. पोंहोंचेल. १०. शरीराचा भाग. ११. शरीराचे ज्या भागांत बुद्धिवृत्ति मात्र पोंहोंचेल तेवढें अंग मात्र. १२. स्फुरेल. १३. बुद्धिवृत्ति. १४. स्मरत नाहीं, पावत नाहीं. १५. आत्मा तनूंत भरला असून. १६. ते स्थळिं (त्या अंगाचे ठिकाणीं) [आत्मा] असोनिही—असा अन्वय. १७. तें अंग, तें स्थळ. बुद्धिवृत्ति जेथें पावत नाहीं तें अंग. १८. स्फुरत नाहीं, गमत नाहीं, कळत नाहीं. १९. याप्रमाणें. श्लोक ५४ यांत वर्णिल्याप्रमाणें. २०. स्वस्वरूपाची प्रतीति व परप्रतीति या दोन्ही प्रतीति. २१. जइं (जेव्हां) निज (आपली) चित्तवृत्ति [चैतन्याचे योगानें] प्रकाशति (प्रकाशित होते) तेव्हां या प्रतीति होती (होतात, प्रतीति उठतात)—असा अर्थ. २२. अंतःकरण, चित्त, बुद्धि, अहंकार, मन, प्राण इत्यादि सर्व वृत्तीचीं लक्षणें होत. २३. जडाला (शवरूपी जो देह त्याला) प्रकाशित करणारें चैतन्य (सद्वस्तु) नसून, स्वतः वृत्तीच प्रकाशती (प्रकाशित होतात) असें म्हणाल. २४. वादी, बौद्ध. २५. तर. २६. म्हणा, सांगा. स्वतःच वृत्ती प्रकाशित होतात असें तुम्ही (बौद्ध) म्हणाल तर सुषुप्तिसुखाचा जो अनुभव तोही वृत्तीलाच असें तुमचें म्हणणें असलें पाहिजे. 'सुषुप्तिसुख वृत्तिवरीच' असें आपण म्हणतां परंतु त्या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें पुढें श्लोक ५६ यांत दाखविलें आहे. २७. सुषुप्तींत. २८. प्रत्यय, अनुभव. २९. तर मग. ३०. वृत्तीला, वृत्तीसाठीं. ३१. स्वपरप्रतीति. ३२. निद्रावस्थेंत. ३३. हें 'होती' ह्या क्रियेचें क्रियाविशेषण. सुषुप्तिसमयीं वृत्ती जडमूढ होती—असा अन्वय. ३४. या श्लोकाचा अन्वय असाः—ज्याला (ज्या आत्म्याला, चैतन्याला) सुषुप्तिसुख (सुषुप्तीतील सुख) [असतें] तोचि (आत्मा) वृत्तिप्रकाशक (अंतःकरण, चित्त, बुद्धि इत्यादि

वृत्ती नसोनिहि सुषुप्तित सौख्य जेव्हां, जो वृत्तिहीन सुख केवळ तोचि तेव्हां. ॥
[1]एवं [2]प्रतीति करणार [3]जडा तयांतें, सांगा, सुषुप्तिसुख केंवि जडासि होतें? ।
ज्याला सुषुप्तिसुख [4]जागरभोग त्याला तो [5]स्वप्रकाश [6]सुखरूप न केंवि? बोला.॥५८
[7]त्याला सुषुप्तिसमयीं न दिसे प्रतीति, तोचि स्मरे स्वसुख [8]तें [9]उठतांचि वृत्ती ।
वृत्तिप्रकाशपण त्यासि किमर्थ [10]तेथें नाहीं, निजोनि उरतो सुखमात्र जेथें. ॥ ५९
[11]ऐसें [12]म्हणाल तरि झांकति नेत्र जेव्हां, दीप प्रकाशित नसे नयनासि तेव्हां ।
दीपें प्रकाशित घटादिक [13]सर्व [14]गेहीं, आत्मा प्रकाशित समस्त [15]असेंचि [16]देहीं.॥६०
[17]निद्रामतींत मिसळे [18]तमपंक जेव्हां दृष्टीस जेंवि [19]पटलें तम [20]तीसें तेव्हां ।
दीपें प्रकाशित घरांत घटादिसृष्टी तैसीच ते [21]पटलयुक्तहि अंधदृष्टी. ॥ ६१
एवं तथापिहि दिसे नयनीं न कांहीं, ऐसी सुषुप्तिसमयांतहि बुद्धि देहीं; ।

---

वृत्तींला सचेतन करणारा) [कारण वृत्ति जड आहे ती आत्म्याचे योगानेंच सचेतन होते] वृत्ती घेउनि (वृत्तीचें ग्रहण करून) तयास (स्वतः आपणास–आत्म्यास) प्रतीति करी (प्रत्यय उत्पन्न करितो, वृत्तीवांचून त्याची त्याला सुद्धां प्रतीति अहं शकत नाहीं). जेव्हां (ज्यापेक्षां) [त्याला] सुषुप्तींत वृत्ती नसोनिही सौख्य [असतें]; तेव्हां (त्यापेक्षां असें सिद्ध होतें कीं) वृत्तीहीन जो (आत्मा) तोचि केवळ (अत्यंत) सुख (सुखस्वरूपी) [आहे]. यथार्थदीपिका–अ० १३ ओवी ५३४ पहा.

१. एवं (याप्रमाणें) जडा प्रतीति करणार [जो] तयातें सुषुप्तिसुख [होतें] [किंवा] जडासीच होतें? कैंवी (कोणती गोष्ट खरी)? [तें] सांगा. [तसेंच] ज्याला [सुषुप्तिसुख] [त्यालाच] जागरभोग [घडतो] तो स्वप्रकाश [आणि] सुखरूप कैंवी न? (कसा नव्हे)? बोला (सांगा). सारांशः—जडाला प्रतीति करणारा त्यालाच सुषुप्तिसुख होतें आणि तो स्वप्रकाश व सुखस्वरूप आहे–असा मथितार्थ. २. प्रतीति=प्रत्यय, जाणीव ती प्रतीति उत्पन्न करणारा (चैतन्य). ३. अचेतन वस्तूंना. ४. जागृती हाच जागरभोग. ५. स्वयमेव चैतन्यरूप. ६. सुखस्वरूप. [यथार्थदीपिका–अ० १३।५३४ पहा.] ७. या श्लोकांत एका शंकेचा उल्लेख आहे. ती शंका अशी कीं, वृत्तिप्रकाशक जर आत्मा आहे तर, तेथें सुषुप्तींत त्यास वृत्तिप्रकाशपणा कां नाहीं? या शंकेचें निराकरण श्लोक ६०।६१।६२।६३ (पूर्वार्ध) यांत केलें आहे. ८. सुषुप्तिसुख. ९. वृत्ति जागृत होतांच–उठतांच. १०. सुषुप्तींत. ११. श्लोक ५९ यांत दर्शविल्याप्रमाणें. १२. शंका घ्याल. १३. घरांतील मठादि सर्व वस्तु. १४. घरांत. १५. याप्रमाणें. 'दीपें प्रकाशित गेहीं' त्याप्रमाणेंच 'आत्माप्रकाशित गेहीं'–असा भाव. १६. शरीरांत, देहांत. १७. सुषुप्तिसमयींच्या बुद्धींत. १८. तमोगुणरूपी चिखल. १९. आच्छादनें. [दृष्टीचे आच्छादनास मात्र 'पटल' म्हणतात.] २०. मतीस, बुद्धीस. २१. 'पडळयुक्तहि' असा अन्य पाठ.

दीपप्रकाश गृहिं[1] आणि घटादि सृष्टी, दीपेंच[2] हे सकळ देखति जेंवि दृष्टी. ६२
आत्मप्रतीतिसहिता सकळा[3] प्रतीती, आत्मप्रभेकरुनि जाणति बुद्धिवृत्ती, ।
हें[4] श्रौतें[5]शुद्धमत यासि न बाध कांहीं, ऐसें अबाधित मतांतर[6] मात्र नाहीं.॥ ६३
भ्रांतें[7] मतें[8] सकळ आत्मपणासि जेथें, नेणोनि बोलति समस्त अयुक्त तेथें; ।
तो भ्रांत जो द्विज[9] निजद्विजता[10] न जाणे, तैसाचि लोक निजआत्मपणासि नेणे.॥
ऐसें असोनि करिती कुमतें तथापि, अंधासि अंधपथिं घालिति अंधकूपीं,[11] ।
जैसीं अवैदिकमतें[12] अतिवेदबाह्यें, वेदाश्रितें तसिंच जीं[13] कुमतें[14] असाह्यें. ॥ ६५
तीं उत्तरप्रकरणीं[15] अवघी सुरारी[16] दूषील,[17] आत्मपण बाधित ज्या विचारीं ।
वृत्तिप्रकाशक न वृत्तिमय प्रतीती, आत्मस्वरूप म्हणवोनि सुषुप्तिरीती.[18] ॥ ६६

---

१. दिव्याचा प्रकाश सर्व ठिकाणीं पडतो. २. श्लोक ६२ (उत्तरार्ध) व ६३ (पूर्वार्ध) यांचा अन्वयः—जेंवि दृष्टी दीपेंच गृहिं दीपप्रकाश आणि हे सकळ घटादि सृष्टी देखति. [तेंवि] बुद्धि वृत्ती आत्मप्रभेकरुनि [दिसे] आत्मप्रतीतिसहिता म्हणजे स्वस्वरूपसहिता सकळा प्रतीति जाणती—असा अन्वय. दृष्टी=बुद्धि, दीप=आत्मप्रभा, गृह=देह, दीपप्रकाश—आत्मप्रतीति, सकळ घटादि दृष्टी=परप्रतीति, देखति=जाणती अशी पंडितांनीं शब्दयोजना केली आहे. ३. हें प्रतीतीचें विशेषण. 'आत्मप्रतीति आणि परस प्रतीति' यास 'स्वपरप्रतीति' म्हटलें आहे ती 'आत्मप्रतीतिसहिता सकळा प्रतीति'—असा अर्थ. ४. या अध्यायांत सांगितलेलें. ५. वेदांतशास्त्राचें मत, श्रुतीस संमत असें मत. ६. अन्य मत, मतभेद. ७. वेदांत मताखेरीज इतर मतें. ८. सर्व. 'मतें' या शब्दाचें विशेषण. सकळ भ्रांति मतें नेणोनि (खरें तत्व न जाणतां) जेथें (ज्या ठिकाणीं, ज्या ज्या ग्रंथांत) आत्मपणासि (आत्मस्वरूपाशीं) बोलति (सांगतात) तेथें समस्त अयुक्त (तें सर्व असत्य होय)—असा भाव. ९. द्विजन्मा. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांस उपनयन (मौंजिबंधन) संस्कार असल्यामुळें ते द्विज होत, तथापि द्विज हा शब्द रूढींत ब्राह्मण या अर्थीच योजितात. 'जो आपण कोण हें जाणीत नाहीं' इतकेंच सांगण्याचा येथें उद्देश आहे तेव्हां येथें कोणताही अर्थ घेणें अयोग्य होणार नाहीं. १०. आपलें ब्राह्मणत्व, आपण ब्राह्मण आहों हें. ११. अंधकारयुक्त कूपांत (विहिरींत, खडुयांत). १२. वेदांचें प्रामाण्य न मानणारीं, चार्वाक, बौद्ध, जैन इत्यादिकांचीं. १३. वेदांत मताशिवाय बाकीचीं, मध्व मतें, भेदवादी (जीव व ईश्वर यांत भेद मानणारीं) मतें. १४. पाखांड, अत्यर्थ खोटा मानणारीं. १५. पुढील 'वेदतत्व' नामक अध्यायांत. १६. श्रीकृष्ण, ग्रंथकर्ता. अध्याय १ श्लोक ५ पहा. [मागें पृष्ठ १०९.] १७. खंडण करील. 'तीं अवघीं कुमतें दूषील'—असा अन्वय. १८. या श्लोकाचा भावार्थः—आत्मा वृत्तिप्रकाशक आहे. तो वृत्तिमय (वृत्तिरूपी) न (नाहीं) किंवा प्रतीति हें आत्मत्वाचें रूप नाहीं. त्याच्या योगानें स्वपर 'स्वपरप्रतीति उठे तथापि तेथें वृत्तीची अपेक्षा आहे. (श्लोक ४३ पहा.) म्हणवोनि (या कारणास्तव) सुषुप्तिरीति (सुषुप्तिमध्यें स्वसुखांत असणारें) आत्मस्वरूप होय.

सर्वानुभूत मत वैदिक सिद्ध होतां, आत्मा अबाधित कसा इतरांसि आतां [1] ।
जे कां [2] अवैदिकहि [3] वैदिक[4]वेषधारी, ते ये स्थळीं करिति तर्क कुतर्क भारी.॥६७
नाहीं सुषुप्तिसमयीं म्हणतां प्रतीती, अंगीकरा म्हणति नास्तिकशून्यरीती ।
त्यांचा कुतर्कमतभंग करावयाला, गूढार्थ हा अनुभवें [5]हरि बोलियेला. ॥ ६८
नाहींतरी श्रुतिविरुद्ध मतें प्रसिद्धें, केलीं [6]बृहस्पतिमुखें सहणें विरुद्धें ।
जे बाह्य वैदिक दिसोनिहि गुप्तबोध श्रुत्यर्थ मोडिति न जाणति तत्व शुद्ध.॥६९
आत्मत्वखंडन तयां मतिचें मुरारी, आतां करील निगमानुभवें विचारीं; ।
आत्मत्वखंडन करील [9]रथांगपाणी, त्याचें [10]नें जें अनुभवीं निगमीं पुराणीं.॥७०
तें [11]उत्तरप्रकरणीं सुजनीं पहावें आत्मत्व येथ कथिलें हरिनें स्वभावें ।
हा 'आत्मतत्व' म्हणवूनि यथार्थ नामें अध्याय हा रचियला [12]जगदेकधामें.॥७१

---

हें आत्मपण ज्या विचारीं (ज्याच्या मतीं) बाधित (दूषित आहे) तीं अवघीं कुमतें उत्तरप्रकरणीं हरि दूषील (खंडील).

१. वैदिक मत (वेदांत मत) सर्वानुभूत (सर्वांच्या अनुभवानें खरें ठरलेलें असें) सिद्ध होतां (सिद्ध झालें असें या अध्यायांत दाखविण्यांत आलें), [त्यापेक्षां] आतां इतरांसि आत्मा अबाधित कसा? (इतरांनी वर्णन केलेलें आत्म्याचें स्वरूप निर्दोष कसें?) अर्थात् इतर मतें खरीं नाहीत–असा इत्यर्थ. २. श्लोक ६७ (उत्तरार्ध) ६८।६९ (पूर्वार्ध) यांचा भावार्थ असाः–बृहस्पतिमुखें (चार्वाकादि) अनेक मतें प्रसिद्धें श्रुतिविरुद्ध आहेत. त्यांचें खंडण या ग्रंथांत केलें नाहीं कारण तीं सहजें (स्वाभाविकच) विरुद्धें (खोटीं, श्रुतिविरुद्ध–आस्तिकां अमान्य) आहेत याकरितां त्यांच्या खंडनाची गरज नाहीं, परंतु जे वैदिकवेषधारी म्हणतात कीं, 'सुषुप्तिसमयीं प्रतीति नाहीं, असें जर तुम्ही (वेदांती) म्हणतां तर नास्तिक शून्य रीति अंगीकरा' हा त्यांचा कुतर्क खंडण करण्यासाठीं नास्तिकशून्यरीतिखंडण या अध्यायांत केलें आहे. ३. वेदांचा खरा अर्थ ज्यांस अमान्य असे. ४. वेदप्रमाण मानणारे परंतु वेदाचा खरा अर्थ टाकणारे. ५. ग्रंथकर्ता भगवान् श्रीकृष्ण. ६. बृहस्पति ज्यांत मुख्य आहे अशीं. या मतास प्रत्यक्ष हेंच एक प्रमाण मान्य या कारणामुळें नास्तिकांत हें मत प्रमुख होय. बृहस्पति–हा नास्तिकांत प्रमुख होय. या मताविषयीं यथार्थदीपिका–अध्याय २ ओंव्या ४७८-५२२ पहा. ७. वेदबाह्याचें. श्लोक ६९ उत्तरार्ध यांत ज्याचा उल्लेख केला आहे, त्याचें आत्मत्व. ८. वेदप्रमाणांनीं, श्रुतीच्या आधारानें. ९. चक्रपाणी. १०. नाहीं जें आत्मत्व अनुभवीं नाहीं, निगमीं (वेदांत) नाहीं, आणि पुराणीं नाहीं, त्याचें त्या आत्मत्वाचें खंडन करील–असा अन्वय. ११. पुढील अध्यायांत. १२. सकळ जगास आश्रयभूत जो ईश्वर त्यानें.

# अध्याय सहावा.

## वेदतत्त्व.

(श्लोक.)

दिसति भेदमतें[1] निगमाश्रितें[2], परि समस्तहि नास्तिकमिश्रितें[3], ।
निगमदूषक[4] नास्तिक ते[5] जसे, श्रुतिगतार्थविदूषक[6] हे[7] तसे. ॥ १
अनधिगत[9] अबाधितार्थ[10] वेदीं[11], अधिगत[12] बाधित वर्णिताति भेदीं[13], ।
अधिगत[14] सकळांसि भेद जो हो[15], निवडिति[16] 'तत्त्वमसि[17]' श्रुतींत हो[18]! हों[19].॥ २

---

१. जीं मतें जीवात्मा व परमात्मा यांचें ऐक्य मानीत नाहींत तीं मतें. वेदांतमत जें शंकराचार्यांस मान्य आहे त्या मतानें जीव आणि ईश्वर यांचें ऐक्य मानलें आहे. दुसरीं मतें म्हणजे मध्व (याचा प्रवर्तक मध्वाचार्य) आणि रामानुजादि मतें ऐक्य मानीत नाहींत–तीं भेदमतें. सांख्य शास्त्र (कपिलकृत), पूर्वमीमांसा (जैमिनीकृत), व न्यायशास्त्र (गोतमकृत) हीं शास्त्रें भेदवादी नाहींत. परंतु वामनपंडितांचा त्या शास्त्रांवर कटाक्ष नाहीं. [यथार्थदीपिका–अ० १२ ओंव्या ८१-९१ व १०३,१०७,१०८,१०९ पहा]. २. वेदसंमत, वेदास मान्य. ३. नास्तिक=आस्तिक नव्हेत ते. वेद प्रमाण न मानणारे ते नास्तिक होत. आस्तिक= 'अर्थ आस्तिक्याचा ये रिती । कीं शास्त्रें जें जें बोलती । त्या गोष्टी जरी अनुभवा न येती । तरी विश्वास तेथें असावा. ॥ १४५२ ॥' [यथार्थदीपिका–अध्याय १८]. ४. वेद अप्रमाण मानणारे. ५. ते=नास्तिक, बौद्ध, जैनादि. ६. श्रुतीचा खरा अर्थ जो त्यास दोष लावणारा. ७. भेदवादी. [वामनपंडित–द्वारकाविजय–सर्ग ४ श्लो० ४९ पहा.] ८. नास्तिकच होत. [यथार्थदीपिका–अ० १८ ओंव्या १४५६-१४६२ पहा]. ९. अलौकिक, अप्राप्त. भेद हा सकळांस अधिगत (माहित) आहे. यास्तव तोच भेद सांगण्यासाठीं श्रुतीची आवश्यकता नाहीं. तेव्हां श्रुतीचा अर्थ 'अनधिगत'च असणें संभवनीय आहे. आणि वेदांचा अर्थ, 'अनधिगत' आणि 'अबाधित' आहे–असें तात्पर्य. १०. दोषरहित अर्थ, ज्या अर्थास दोष नाहीं असा अर्थ. ११. वेदांत, श्रुतींत. १२. लोकांस माहित असलेली गोष्ट सांगणारा. १३. भेदीं= भेददर्शक, भेदप्रतिपादक; जीव आणि ईश्वर भिन्न असा. १४. माहित. १५. दृष्टिगोचर, इंद्रियांस प्रत्यक्ष दिसणारा. १६. 'तत्वमसि' या श्रुतींतून भेददर्शक अर्थ काढूं पाहतात. १७. हें वाक्य 'छांदोग्य' उपनिषदांतील आहे. या श्रुतीला 'महावाक्य' म्हणतात. (१) प्रज्ञानं ब्रह्म, (२) अहंब्रह्मास्मि, (३) तत्वमसि, आणि (४) अयमात्मा ब्रह्म; अशीं वेदांतील चार महावाक्यें आहेत. [पंचदशी–प्रकरण ५ श्लोक५।६ पृष्ठ ७१ पहा]. १८. अहो. कांहीं श्रुति अभेदवादीच आहेत तथापि त्यांचे अर्थाविषयीं कोटी उढवुन अभेदसिद्धि करीत नाहींत. असें कदाचित् म्हणतां येईल. परंतु 'तत्वमसि' ह्या महावाक्याविषयीं तसें नाहीं–असें असतांही या श्रुतीचा भेदपर अर्थ करूं पाहतात हें आश्चर्य आहे. १९. भेद, द्वैत.

'[4]आहेसि तो तूं' म्हणऊनि साचा[1], जो अर्थ[2] हा 'तत्वमसि' श्रुतीचा, ।
श्रुत्यर्थ[3] हा अर्थ गुरूपदेशें[5], कळे[6] रमाकांतकटाक्षलेशें[7]. ॥ ३

सुधार्थ[8] हा उलंडुनी[9] अलौकिकार्थ[10] खंडुनी,
अदृष्ट[11] अर्थ [12]धुंडुनी प्रयत्नभेद[13] मांडुनी; ।
स्वयेंचि[14] जीवईश्वरा प्रसिद्ध भेद पामरा,
असेंचि तत्व तत्परा निरूपिती अहो! परी[15]. ॥ ४

नसोनि[16] नृप ठाउका पुसत, 'तो कसा भूपती?'
'नव्हेसि नृप तूं' असें वदति उत्तरें त्याप्रती; ।
तसेंचि निगमासि जें पुसति ईश सांगा कसा,
नव्हा तुम्हि परेश तो म्हणुनि वेद बोले ऐसा[17]. ॥ ५

---

१. खरा, खरोखर. २. 'तत्वमसि' ह्या श्रुतीचा 'तो तूं आहेस' हाच खरा अर्थ. ३. वेदांचा खरा अर्थ. ४. 'आहेसि तो तूं' असा. ५. गुरूच्या उपदेशानें. [नामसुधा–अध्याय ३ चरण २ श्लोक ३३-३४ पहा.] ६. कळतो, समजतो, माहित होतो. ७. भगवंताच्या कृपाकटाक्षानें. परमेश्वरानें कृपावलोकन केलें तरच हा खरा अर्थ कळावयाचा. पंडितांनी म्हटलें आहे:—'सिद्धांत कीं श्रीहरिभक्ति ज्यांला । अद्वैतता प्राप्ति घडे तयाला. ॥ ८० ॥' [ब्रह्मस्तुति–चरण १]. यथार्थदीपिका–अध्याय ९ ओव्या ९५८-९५९ पहा. ८. अमृततुल्य: मोक्षप्रद असा भेदबुद्धीनें प्राणी मुक्तीला पोंचत नाहीं. ब्रह्मस्तुति–चरण १ श्लोक १३४-१३८, व पंचदशी–चित्रदीपप्रकरण–श्लोक २१० पृ० ११० पहा]. ९. ओतून, त्यागून. १०. 'अनधिगत' असा अर्थ. ११. दृष्टोत्पत्तीस न येणारा. १२. प्रयत्नानें शोधून. १३. ईश्वर आणि जीव यांचा भेदच सिद्ध करण्याचा प्रयत्न करून. १४. उत्तरार्धाचा अन्वय अर्थ:— अहो! जीव ईश्वरा (जीव ईश्वराचा) भेद स्वयेंचि प्रसिद्ध आहे. तत्परा (त्या भेदाच्या ठिकाणीं ज्याची दृढता झाली आहे अशाला) परा (दुसऱ्या मनुष्याला) पामरा असेंचि तत्व निरूपिती (सांगतात). [यथार्थदीपिका–अ० १८ ओवी ६१० पहा]. १५. या पद्याचें वृत्त 'पंचचामर.' याचें लक्षण:–प्रमाणिकापदद्वयं वदंति पंचचामरम्.' किंवा 'जरौ जरौ ततो जगौ च पंचचामरं वदेत्.' याच्या प्रत्येक पादांत ज, र, ज, र, ज, ग, अशीं अक्षरें येतात. यांत प्रत्येक चवथ्या अथवा आठव्या अक्षरावर यति असतो. १६. या पद्याचें वृत्त 'पृथ्वी.' या वृत्ताचें लक्षण केदारभट्टविरचित 'वृत्तरत्नाकरां'त असें दिलें आहे:–'जसौ जसयला वसुग्रहयतिश्च पृथ्वी गुरुः' [तृतीय अध्याय ९४.] ज, स, ज, स, य, लघु, गुरु य हे यथानुक्रम गण व अक्षरें, आठव्या अक्षरावर यति व पुढें नवव्या अक्षरावर यति. चरणांत एकंदर अक्षरें १७ असतात. अशी या वृत्ताची रचना आहे. १७. भेदवाद्यांचें मत कसें चुकीचें आहे हें येथें सांगितलें आहे:—जीव व ईश्वर भेदयुक्त असेल तर वेदांस सांगावयास नकोच, तें सर्वांस कळतेंच आहे. पण ईश्वर व जीव एकच आहे हें समजण्यासारखें तत्व नाहीं म्हणून

[1]जो [2]सर्वेश्वर तूं नव्हेसि म्हणतो [3]प्रामाण्य त्याला कसें,
[4]प्रख्यातार्थ निरूपणें करुनियां [5]होतें कळेना असें; ।
वृक्षाग्रावरि बैसले परि अहो! [6]तन्मूळ हे [7]छेदिती,
जे कां 'तत्वमसि' श्रुतीसहि असें जाणोनि [8]शाखाणिती. ॥ ६
स्पष्ट [9]तत्वमसि वेद बोलतो, अर्थ [10]भेदपर [11]यांसि वाटतो; ।
रोगियांसी[12] [13]शशि जेंवि पींवळा, [14]तत्कळा न दिसती [15]समुज्वला. ॥ ७
[16]संध्या करा प्रतिदिनीं म्हणवोनि जैसा, वाक्यार्थ तत्वमसिचा न किमर्थ तैसा; ।
स्पष्टार्थ आणिक अलौकिक तत्व जेथें, व्याख्या बळेंचि करिती विपरीत तेथें. ८
[17]श्रुतिगत न दिसे जो अर्थ [18]तो [19]व्याकरीती,
[20]अधिगत सकळांतें साधिती द्वैतरीती; ।
श्रुतिगत दिसतो जो अर्थ तो आवडेना,
[21]गुरुविण नकळे जें बोलती तें घडेना. ॥ ९

---

तें सांगितलें पाहिजे. 'राजा कसा आहे?' या प्रश्नाचें उत्तर 'तूं राजा नव्हेस' हें जसें असंबद्ध आहे तसेंच 'ईश कसा आहे तें सांगा' या प्रश्नाचें उत्तर 'तूं परेश नव्हेस' असें वेद उत्तर करितो अशी कल्पना करणेंही असंबद्ध होय.

१. भेदमतवादी. 'तत्वमसि' या श्रुतीचा अर्थ--'तें तूं नव्हेस' असा सांगणारा. २. परमात्मा. ३. सत्य, खरेपणा. ४. अधिगत, लौकिक--असा अर्थ. ५. या क्रियापदाचा कर्ता 'प्रामाण्य.' 'प्रामाण्य कसें होतें?' असा अन्वय. 'या अर्थास खरेपणा कसा येतो' हा भावार्थ 'तें तूं नव्हेस' हा श्रुतीचा अर्थ नव्हे--हा इत्यर्थ. ६. त्या झाडाचें मूळ, पाळ. ७. कापती, तोडती. ८. वाणिती, व्याख्या करितात. ९. 'तें तूं आहेस' असें. १०. 'तें तूं नव्हेस' असा. ११. भेदवाद्यास. १२. काविळ झालेल्या रोग्यास. १३. चंद्र. १४. चंद्राच्या कळा. १५. स्वच्छ, तेजायमान. १६. 'संध्या करा' असें वेदवचन आहे. संध्या प्रथमतः लोकांस माहित नव्हती; व ती करण्याची प्रवृत्तीही नव्हती. [यथार्थदीपिका--अध्याय १८ ओव्या ८६२।६२ पहा.] यास्तव ती गोष्ट वेदांनीं सांगितली. त्याप्रमाणेंच भेद हा सर्व लोकांस माहित आहेच. अभेद माहित नाहीं तें अलौकिक तत्व सांगण्यासाठीं 'तत्वमसि' ही श्रुति प्रवृत्त झाली. तो स्पष्टार्थ टाकून विपरीत अर्थ करणें वाजवी नाहीं--असें तात्पर्य. पूर्वार्धांत भेदवाद्यांस प्रश्न आहे व उत्तरार्धांत भेदवादी श्रुतीचा अर्थ करितात तो विपरीत होय असा सिद्धांत सांगितला आहे. १७. श्रुतीला मान्य, श्रुतिसंमत. १८. जीव व ईश्वर एक नाहीं--असा अर्थ. १९. सांगती. २०. माहित, प्राप्त. २१. 'गुरुविण नकळे' असें जें म्हणतात त्या म्हणण्यास सत्यता नाहीं असें म्हणावें लागतें--असा अर्थ. जीव व ईश्वर यांत भेद आहे याचा अनुभव दाखविण्यास गुरूची आवश्यकता नाहीं. भेदाचा अनुभव सर्वांस आहेच. भेदमत ग्रहण केलें तर 'गुरुविण न कळे' या

[1]विरुद्धस्वभावें [2]नये [3]ऐक्य लक्षा, स्वयें जीव तो ईश या [4]पूर्वपक्षा, ।
अहो! टाकिलें [5]श्रौतें [6]दूषोनि [7]शास्त्रीं, [8]तिहीं [9]घेतलें [10]त्यांस [11]सिद्धांतपात्रीं.॥ १०
जसा टाकिला कांडुनी धान्य कोंडा, [12]समर्थीं दरिद्र्यास तो होय [13]मांडा, ।
[14]विरुद्धस्वभावत्व हें [15]तों उपाधी, [16]स्वरूपींच तें मानिती [17]स्थूलबुद्धी. ॥ ११
[18]सकळांविषयीं [19]अनीशत्व [20]देहीं, [21]जगदीशत्व घडे [22]तया न कांहीं, ।
म्हणतां तरि [23]तोहि [24]अनीश [25]ज्याला, न घडे [26]ऐक्य [27]तुम्हीं [28]तयासि [29]बोलों.॥१२
[30]असो ईश आतां अनीशत्व [31]ज्याला, [32]तुम्हीं [33]तोचि कीं आपुलें [34]रूप [35]बोलों, ।

---

वाक्यास व्यर्थता येते. ऐक्य मात्र गुरूवांचून कळणारें नव्हे. अर्थात् अभेद अर्थच श्रुतिगत (श्रुतिसंमत) दिसतो.

१. जीवस्वभाव व ईशस्वभाव भिन्न पडले, एकसारखे नाहींत म्हणून. २. लक्षा (ध्यानांत लक्ष्यांत) नये (येत नाहीं.) ३. जीवेश्वरैक्य. ४. 'जो जीव तोच ईश' हा पूर्वपक्ष लक्ष्यांत येत नाहीं. ५. वेदांतमत, श्रुतीचें मत. ६. खंडन करून. [यथार्थदीपिका—अ० ९ ओ० ९०. सांख्य, पूर्वमीमांसा व न्याय या तीन शास्त्रांनीं (अनुक्रमें कपिल, जैमिनी व गौतम यांनीं पतंजलीकृत—योगशास्त्राचा सांख्यशास्त्रांत आणि कणादकृत वैशेषिक शास्त्राचा न्यायशास्त्रांत सामावेश होतो. ७. हीं पांच शास्त्रें भेदवादास अनुकूल आहेत. ८. त्या भेदवाद्यांनीं ९. मानिलें. जैमिनी व गौतम यांचें सांगणें हाच खरा सिद्धांत असें भेदवाद्यांनीं चुकीनें मानिलें. १०. मीमांसा आणि न्याय या शास्त्रांचे सांगण्यास. ११. सिद्धांतस्थानीं. शास्त्रें भेद सांगतात तोच खरा सिद्धांत असें तिहीं मानलें—असा अर्थ. १२. श्रीमंतांनीं. 'टाकिला' या क्रियापदाचा कर्ता. १३. पक्वान्नविशेष. १४. ईश व जीव यांचा विरुद्ध भाव असल्यामुळें ऐक्य नाहीं असें म्हणतात पण विरुद्ध स्वभाव (ईशत्व अनीशत्व) हा उपाधि आहे म्हणून जीव व ईश यांच्या रूपांत फरक नाहीं. १५. तोंपर्यंत, उपाधि आहे तोंपर्यंत. १६. उपाधिरहित जें शुद्ध आत्मस्वरूप त्याला. १७. सूक्ष्म विचार ज्यांस करण्याची संवय नाहीं ते. १८. सर्व गोष्टींत. १९. असमर्थता. २०. देहांत, देहधारी जीवाला. २१. परब्रह्मस्वरूप. २२. जीवाला. २३. जगदीशही, ईश्वरही. २४. असमर्थ. जीवाप्रमाणें ईश्वरही असमर्थच [आहे] कारण ईश्वरासही 'ऐक्य न घडे' (व्यापकपणा नाहीं.) असें तुम्ही (भेदवादी) बोला (सांगतां म्हणता) आणखी कारण द्वारकाविजय—सर्ग ४ श्लो० ५८-६२ पहा. २५. ईश्वराला. २६. व्यापकता. २७. भेदमतवादी. २८. ईश्वराला. २९. म्हणता, सांगता (वर्तमानकाळ, स्वार्थरूप. ३०. तुम्ही भेदवादी ईश्वराविषयीं जें कांहीं सांगता त्यावरून ईश्वरही अनीशच ठरतो [ही गोष्ट] असो (एकीकडे ठेवूं) आतां जीवाचे रूपाविषयींच तुमचें म्हणणें काय तें सांगा—असा अर्थ. ३१. जीवाला. ३२. मनुष्यदेही. ३३. तो जीवच. ३४. जीवाचें रूप. ३५. सांगा. [आज्ञार्थ—स्वार्थ नव्हे.]

तुम्हां[1] भ्रांत[2] जो सांगवेनाच जेव्हां, स्वयें[3] कोण नेणेंच तो भ्रांत तेव्हां. ॥ १३
अहंप्रत्ययस्फूर्ति[4] ते वृत्ति जेथें, तुम्हीं मानितां शुद्ध आत्मत्व तेथें; ।
अहंवृत्ति हे स्फूर्ति ज्याच्या प्रकाशें[5], विचारोनि सांगा तया सावकाशें. ॥ १४
तुम्हि[6] अहंस्फुरणात्मक[7] जेधवां, तरि चिदात्मक[8] मीपण[9] तेधवां, ।
जरि जडत्व[10] म्हणाल[11] अहंपणा, तरि वदा[12] जड टाकुनि आपणा[13]. ॥ १५
न वदवेच तई उगले[14] असा, तुम्हि अनीश्वर[15] तो म्हणतां कसा? ।
तरि अनीश्वररूप उपाधि हा[16], मग परेशउपाधिहि तो पहा[17]. ॥ १६

---

१. भेदमतवाद्यांना. 'सांगवेना' या क्रियेचा कर्ता. २. भ्रांत असे जे तुम्ही त्याला. भ्रांत हें 'तुम्हा' या सर्वनामाचें विशेषण. [भ्रांत शब्दाचें लक्षण यथार्थदीपिका-अध्याय १० ओवी ७७६ यांत आहे तें पहावें.] ३. स्वयें कोण? हेंच जो नेणे तो भ्रांत (भ्रमी) हेंच सत्य-असा अर्थ. ४. अहंप्रत्यय म्हणजे मीपणाची स्फूर्ति हाच जीवात्मा. याच्या पलीकडे आत्मत्व नाहीं, असें भेदमतवाद्यांचें मत आहे. तें खरें नसून अहंस्फूर्ति केवलात्मा नव्हे. (श्लो० २१ पहा.) अहंप्रत्ययापलीकडे बुद्धि आणि बुद्धिपलीकडे आत्मा असें वेदांतमत म्हणजे या ग्रंथकाराचें (वामनपंडिताचें) मत आहे. तें प्रतिपादन करण्यास येथून आरंभ केला आहे. असाच प्रसंग यथार्थदीपिका-अध्याय २ गीता श्लोक १९ वरील टीकेंत वर्णिला आहे. आणि ४७१ व्या ओवींत 'कर्मतत्त्वग्रंथीं हें तत्त्व विशद असे' असें सांगितलें आहे. आणखी यथार्थदीपिका-अ० १२ ओव्या १४२६-१४४१ पहा. जीवात्मा बुद्धिपलीकडे याविषयीं गीता अध्याय ३ श्लो० ४२ व त्यावरील यथार्थदीपिकेंतील टीका पहावी. आकाशादि तत्त्वें ५, शब्दादि गुण ५, इंद्रियें १० व मन एक मिळून २१ तत्त्वें. त्यापलीकडे २२ वें तत्त्व अहंप्रत्ययस्फूर्ति त्यासच 'अहंवृत्ति, अहंस्फुरण, अहंपणा, मीपण, अहंप्रत्यय असें या अध्यायांत म्हटलें आहे. तो जीवात्मा असें भेदवादी म्हणतात. असें त्याच्या जीवात्म्याविषयींच्या व्याख्यानावरून ठरतें. २३ वें तत्त्व बुद्धि, २४ वें चित्त; हीं सर्व जड असून २५ वा जीवात्मा प्रतिबिंब आणि २६ वा परमात्मा बिंब असें या ग्रंथकाराचें मत आहे. ५. जडवस्तु चैतन्याच्या योगानें प्रकाशते. जड म्हणजे अचेतन अहंवृत्ति जड (अचेतन) होय. ती सचेतन (प्रकाशवंत) कशानें होते तें सांगा-असा अर्थ. [यथार्थदीपिका-अ० १० ओवी ४२८ पहा] वृत्ति हा बुद्धीचा भाग असून अहंप्रत्ययस्फूर्तिहून भिन्न आहे. ६. तुमचा जीव. ७. जीवात्मा व अहंस्फुरण हीं दोन्ही एकच होतील तेव्हां. ८. चैतन्यरूपी. ९. अहंवृत्ति, गर्व. १०. अचेतन. ११. अहंपणा अचेतन (जड) [आहे] असें म्हणाल (मान्य कराल). १२. सांगा. [हाच प्रश्न-यथार्थदीपिका-अध्याय २ ओव्या ४७२-७५ यांत पंडितांनीं केला आहे.] १३. आपल्या चैतन्यस्वरूपाला. जड असा जो अहंकार त्यास टाकून स्वतःच्या चैतन्यरूपाचें लक्षण सांगा-असा भावार्थ. १४. स्वस्थ, चूप. १५. जीव. १६. जीवोपाधि. १७. हा (जीवोपाधि) अनीश्वर आणि तो (ईशोपाधि) परेश (श्रेष्ठ) [असा] पहा. (करो

जड अहंपण तें जरि वेगळें, अजड मीपण घ्याल जरी बळें, ।
स्वचिदहंपण यासि न सांडितां, तुम्हि वदा जड मीपण तत्वतां. ॥ १७

अहंस्फूर्ति ते मानितां आपणासी, नये सांगतां त्या जडा मीपणासी, ।
यथापूर्व 'मी मी' तुम्हीं बोलतां हा, दिसेना जडा मीपणा ठाव पाहा. ॥ १८

अहं देह बोलाल त्या मीपणातें, न पाहाल तेव्हां तुम्हीं आपणातें, ।
अहं देह जेव्हां स्फुरे वृत्ति देहीं, चिदात्मत्व आहे अहंस्फूर्ति नाहीं. ॥ १९

जडाहंकृतीनें अहंदेह वाटे, न तेव्हां दुजी ते अहंस्फूर्ति भेटे, ।
अहंस्फूर्ति चिद्रूप आत्मत्व जेव्हां, दिसेना अहं देह हे स्फूर्ति तेव्हां. ॥ २०

अहं एक दूजी अहं देह ऐसी, द्विधा स्फूर्ति हे एककाळींच कैसी? ।
अहंस्फूर्ति काळद्वयीं तुल्य जेव्हां, अहंस्फूर्ति हे केवळात्मा न तेव्हां. ॥ २१

जसा देह मी मानितों देहयोगें, अहंस्फूर्ति तैसी अहंस्फूर्तिसंगें ।
अहंप्रत्यया टाकितां बुद्धि आहे, तियेहीपुढें आत्मभा चित्त पाहे. ॥ २२

---

समजा, गृहित धरा). उपाधी दोन प्रकारच्या आहेः–(१) ईशोपाधि, व (२) अनीशोपाधि; परंतु आत्मत्व जें तेथें भेद नाहीं–असें तात्पर्य.

१. अचेतन. २. हें बेविसावें तत्व. ३. सचेतन, ज्यास चलनवलनादि क्रिया आहेत असा. ४. ग्रहण कराल, समजाल. अहंपण दोन प्रकारचें (१) जड, (२) अजड असें जर म्हणाल तर. ५. आग्रहानें. ६. सांगा. अहंपण दोन प्रकारचें त्यांतून चिदहंपण एकीकडे ठेवून जड अहंपणाचें तत्वतः लक्षण काय तें सांगा–असा अर्थ. अहंपणाचे दोन प्रकारः–(१) जड (२२वें तत्व), (२) चैतन्य (२५ वें तत्व) असे दाखवितां येणार नाहींत–असा भावार्थ. ७. पूर्वीप्रमाणेंच. जड अहंपण बोधक असा 'मी' शब्द उच्चारिता तसाच जीवस्वरूपींही 'मी' शब्द उच्चारिता. यासाठीं मीपण हा आत्मा मानून आणखी दुसरें जड मीपण मानण्यास जागा (ठाव) नाहीं–असा भावार्थ. ८. अवकाश, स्थळ, जागा. ९. विचार करा. १०. 'अहं देह जेव्हां तुम्हा स्फूर्ति देहीं' असा अन्य पाठ आहे. ११. दुसरी, अन्य. १२. श्लो० १९-२० यांचा भावार्थः–अहं देह (देहच आत्मा) असें जेव्हां कोणी अज्ञानामुळें मानितो तेव्हां त्यास दुजी अहंस्फूर्ति म्हणजे अहंआत्मा अशी स्फूर्ति–जिला भेदमतवादी 'शुद्ध आत्मत्व' म्हणतात–असत नाहीं. म्हणजे 'जीवत्व' त्याकाळीं अस्तित्वांत असूनही एका जडाहंकृतीनें (देहात्मबुद्धीमुळें) दुसरी अहंस्फूर्ति त्याला असूं शकत नाहीं. त्याप्रमाणेंच अहं आत्मा अशी स्फूर्ति जेव्हां असते तेव्हां अहंदेह अशी स्फूर्ति नसते–असा भावार्थ. १३. श्लो० २१।२२ यांचा भावार्थः–[श्लो० १९-२० यांवरून] असें सिद्ध होतें कीं (१) एका काळींच बुद्धीला दोन स्फूर्ति असावयाच्या नाहींत. (२) आणि स्फूर्ति आहे, तैंच शुद्ध आत्मत्व असेंही म्हणतां येत नाहीं. देह हाच आत्मा वाटतो त्या वेळीं आणि अहं हाही आत्मा वाटतो त्या प्रसंगीं म्हणजे दोन्ही प्रसंगीं (काळद्वयीं) अहंस्फूर्ति जर एक सारखीच (तुल्य) असते, तर अहंस्फूर्ति हा के-

अहंरूप हे [1]वृत्ति आत्मा नव्हे हा, [2]स्वशास्त्राभिमानासि टाकोनि पाहा, ।
जसी [3]मीपणीं [4]त्वंपणस्फूर्ति नाहीं, नसे [5]त्वंपणींही अहंवृत्ति कांहीं. ॥ २३
[6]अरे! तूं म्हणोनी [7]पराव्यासि जेव्हां, [8]म्हणे मी [9]म्हणोनी नसे स्फूर्ति तेव्हां, ।
दिसेना घटस्फूर्ति जेव्हां पटाची, पटामाजिही स्फूर्ति नाहीं घटाची. ॥२४
तसें तूं स्फुरे तेधवां मी स्फुरेना, [10]असेंही जरी मीपणातें स्मरेना, ।
म्हणा ना घडी एक 'मी मी' म्हणोनी, घडीमाजि त्या तूमची काय [11]हानी ?॥२५
आतां [12]म्हणाल न म्हणे जरि मी म्हणोनी, [13]रूपीं प्रतीति तरि वर्तत मी म्हणोनी ।
ते मी असें न म्हणतांहि असे प्रतीती, मी वृत्ति तों जसिच तूं म्हणऊनि [14]वृत्ती.॥

---

वलात्मा (शुद्ध आत्मत्व) नव्हे असें सिद्ध होतें. ॥ २१ ॥ सारांश–देहयोगें 'मी' देह असें आम्ही मानितों तसेंच अहंस्फूर्तिसंगें (अहंकाराचे योगानें)अहंस्फूर्ति (मीपण हेंच आमचें शुद्ध स्वरूप असें आम्हास वाटतें) परंतु अहंप्रलयापलिकडे बुद्धि आहे आणि त्या बुद्धीचेही पुढें चित्त आत्म्याला पाहतें. ॥ २२ ॥'

१. बुद्धीची 'अहं' अशी जी बुद्धि ती. २. भेदमतवादी शास्त्रेंच खरीं–अशा आग्रहाला. ३. मी (अहं) अशी बुद्धीची वृत्ति असतें तेव्हां. [यथार्थदीपिका–अध्याय २ ओंव्या ४६१-४६५ पहा.] ४. 'तूं' अशी स्फूर्ति. ५. दुसऱ्यास 'तूं' असें जेव्हां म्हणतो तेव्हां. ६. तूं या सर्वनामाचें संबोधन. ७. परक्यास, दुसऱ्यास. ८. म्हणतो. पराव्यासि तूं म्हणोनी जेव्हां म्हणे (म्हणतो)–असा अन्वय. ९. मी अशी, अहंवृत्तीची. 'मी' आणि 'तूं' होतें–असा भावार्थ. १०. असूनही. तूं स्फुरे तेधवां (तूंपणाकडे बुद्धिवृत्ति ज्या काळीं असते त्या काळीं) आत्मत्व असूनही मीपणातें स्मरेना (स्मरत नाहीं)–असा अन्वय. ११. नाश. एक घडी मी मी म्हणोनि तुम्ही ना म्हणा (घटकाभर मी मी (अहं) असें न म्हटलें, अहंवृत्तीची स्फूर्ति तुमचे बुद्धीस घटकाभर नसली) म्हणोनी (तथापि) त्या घडिमाजी (त्या वेळीं) तुमची (तुमच्या शुद्ध आत्मत्वाची) हानी काय? अर्थात् अहंवृत्तीची स्फूर्ति हें आत्मत्व नव्हे. १२. अशी शंका घ्याल. १३. 'आहे प्रतीति तरि आपण यावरूनी' असाही एक पाठ आहे. १४. त्वंपणस्फूर्तिकाळीं मीपणाची स्फूर्ति नसते असें श्लोक २३ (उत्तरार्ध), २४,२५ (पूर्वार्ध) यांत सांगितलें आहे, परंतु त्याविषयीं भेदवाद्यांची शंका 'जरि मी म्हणोनी न म्हणे तरि रूपीं (जीवात्म्याचे ठिकाणीं) मी म्हणोनी वृत्ति वर्तत असलेली. मी असें न म्हणतांही ते (मीपणाची) प्रतीति जरी असे (असते) तों (तरमग) जसिच मी वृत्ति तशीच तूं म्हणवोनी वृत्ति. यांत शंका नाहीं. अर्थात् 'ज्या काळीं मी स्फुरे त्या काळीं तूं स्फुरे' हेंच म्हणणें खरें नाहीं–या शंकेचा येथें उल्लेख आहे. या श्लोकाचें तात्पर्य:–तूं वृत्ति आगम अपायपणांत (तूं वृत्तीच्या वेळीं) मी हे प्रतीति असते. तदनुरूपच हे मी वृत्ति दीसताहे (मी वृत्तीच्या आगम अपायपणांतही–मी वृत्तीच्या वेळींही मी हे प्रतीति असते) तें मीपण स्फुरणरूप होय.

तूं [1]वृत्ति [2]आगम [3]अपायपणांत मी हे, मी वृत्ति हे तदनुरूपचि दीसताहे, ।
तें मीपण स्फुरणरूपचि होय जेव्हां, [5]स्वस्फूर्तिमाजि तरि काय नसेल तेव्हां? २७
[4]जैसा अहं म्हणुनि वृत्तिविणेंचि पाहे, मी वृत्तियुक्तहि तसाच किं दीसताहे, ।
वृत्तींत [6]केवळपणांतहि तुल्य जेव्हां, वाटे तुम्हांसि तरि [7]केवळ हानि तेव्हां?॥ २८
साळीस जो तांदुळ मानिताहे, साळीसही त्याच समान [8]पाहे, ।
तेव्हां त्वचायुक्तचि धान्य मानी, [10]तुम्हीं न मानाचि मताभिमानी. ॥ २९
[11]सहज मीपण टाकुनिही [12]स्फुरे, तरि [13]न [14]केवळें होउनियां उरे? ।
स्फुरण [15]मीपणेंवर्जित जेधवां, स्फुरतसे [16]स्वमतींतचि [17]तेधवां. ॥ ३०

---

१. वृत्तीरूप नव्हे. मी वृत्ति असो कीं तूं वृत्ति असो. त्या दोनही वृत्तींत जेव्हां जें स्फुरण असावयाचेंच तेव्हां स्वस्फूर्तिमाजी (त्वंवृत्तीच्या वेळीं) ते मीपण (स्फुरण) तरी नसेल काय? सारांश श्लोक २३।२४।२५ यांत सांगितलेली 'अहंवृत्ति' वेगळी आणि श्लोक २६ यांत सांगितलेली 'अहंप्रतीति' वेगळी. या दोहोंत भेद आहे. अहंप्रतीति म्हणजे अध्याय ५ श्लो० ३३ उत्तरार्धं यांत वर्णिलेली 'आत्मप्रतीति' होय आणि 'अहंवृत्ति' म्हणजे अध्याय ५ श्लो० ३४ पूर्वार्ध यांत वर्णिलेली 'बुद्धिवृत्ति' होय. २. आरंभ. ३. अखेरीस. ४. श्लोक २८।२९ यांचा भावार्थ असाः—मी वृत्तियुक्त अहंपणा आणि वृत्तिविरहित असा अहंपणा हा तुमच्या (भेदवाद्यांच्या) मतें जेव्हां सारखाच (तुल्य) तेव्हां वृत्तींतच म्हणजे वृत्तियुक्त जें स्वरूप तेंच शुद्ध आत्मत्व असें आणि केवळपणाची हानि म्हणजे वृत्तिविरहित शुद्ध आत्मत्वास अर्थात् केवळपणास (शुद्ध आत्मत्वास) अस्तित्वच नाहीं—असें तुम्हाला वाटतें. ॥ २९ ॥ साळीस (टरफलयुक्त तांदुळास, भातास) जो तांदूळच मानितो व साळी व तांदूळ यांत अभेद मानतो तो त्वचायुक्त धान्य मात्र जाणतो. (मानी) ही गोष्ट मताभिमानामुळें तुमच्या लक्ष्यांत येत नाहीं. ॥ २९ ॥ येथें साळी=अहंकार [वृत्ति] युक्त अहंपणा आणि तांदुळ म्हणजे केवळ शुद्ध आत्म्याचें स्फुरण. हा भेद तुमच्या ध्यानांत येत नाहीं—असा भावार्थ. ५. अहंवृत्तीच्या वेळीं. ६. वृत्तिविरहित स्थितींत. ७. वृत्तिविरहित, शुद्धरूपच नाहीं असें. वाटे या क्रियापदाचें कर्म. ८. 'त्वक्‌मिश्र तो तंदुळ हे न पाहे' असाही एक पाठ आहे. ९. भातास व तांदुळास एकच पाहे (मानितो). अहंकारयुक्त आत्मत्व आणि शुद्ध आत्मत्व यांतील भेद ज्याला कळत नाहीं. १०. भेदमतवादी. ११. स्वाभाविक. हें शुद्ध आत्मत्वाचें विशेषण. १२. चेतनायुक्त असतें. अहंवृत्तिव्यतिरिक्तही आत्मत्व स्फुरतें—असा भावार्थ. १३. 'न' हें 'उरे' या क्रियेचें क्रियाविशेषण. न उरे?=उरत नाहीं काय?—असा प्रश्न. मीपण टाकुनीही जें सहज स्फुरे तरि (तरमग) तें केवळ (शुद्धस्वरूपी) होउनियां न उरे काय?—असा प्रथमार्धाचा अन्वय. अर्थात् मीपणापलिकडे शुद्ध आत्मत्व आहे—असें तात्पर्य. १४. शुद्ध, स्वतंत्र, पूर्ण, वृत्तिरहित. १५. अहंवृत्तिव्यतिरिक्त. १६. आपल्या बुद्धींत. मीपण वर्जित असें स्फुरण स्वमतींतची स्फुरतसे, तेंचि शुद्ध आत्मत्व—असा अर्थ. १७. श्लोक ३०।३१।३२।३३ (पूर्वार्ध) यांत वेदांतमतानुरूप आत्म्याचें स्वरूप सांगितलें आहे. त्याचें तात्पर्यः—मीपणरहित केवळ सहज स्वमतींत (बुद्धींत) स्फुरण

सहज केवळ तें[1] न तुम्हां कळे, बहुत तर्कबळेंहि न आकळे,[2] ।
गुरुमुखाविण ते नकळे गती, म्हणुनि बोलति ये[3]चि रिती श्रुती. ॥ ३१
गुरुविणें[4] म्हणती नकळे असें, श्रुति तयास[5] तुम्हीं वदतां कसें? ।
गुरुकृपेंचि[6] करीं[7] वदतां[8] जरी, गुरु[9] मुखें[10][11] श्रुत[12] तत्व नव्हे[13] तरी. ॥ ३२
‘वेदांत’[14]ही वाचिलिया कळेना, तें[15] श्रीगुरुवांचुनि[16] आकळेना, ।

---

पावतें तें आत्मतत्व होय ॥ ३० ॥ तें सहज कळणारें नसून गुरुमुखानेंच कळावयाचें आहे. असें श्रुति सांगतात. ॥ ३१ ॥ गुरूवांचून कळावयाचें नाहीं असें जर श्रुति सांगतात तर त्याचें स्वरूप तुम्ही (भेदवादी) शब्दानें कसें सांगूं शकाल? गुरूच्या कृपेनेंच तें तत्व कळावयाचें (करीं यावयाचें, हस्तगत व्हावयाचें) असें जर तुम्ही (भेदवादी) म्हणतां तर तें गुरु तत्व (श्रेष्ठ असें आत्मतत्व) तोंडानें केवळ शब्दानें सांगतां येणारें नव्हे (मुखें श्रुत नव्हे) ही गोष्ट उघड होते. ॥ ३२ ॥ श्रीगुरुकृपेवांचून केवळ वेदांत वाचला तथापि तें कळणारें नव्हे—हीच गोष्ट सत्य. ॥ ३३ ॥

१. शुद्ध आत्मतत्व. २. समजे, कळे. ३. ह्याच रीतीनें. ४. शुद्ध आत्मतत्वाचा बोध होणें फार कठीण हें श्रुतीच सांगते:—‘श्रुतिः दुर्बोधत्वमात्मनो दर्शयति । श्रवणायापि बहुभिर्यो न लभ्यः । श्रृण्वन्तोऽपि बहवो यन्न विदुः । आश्चर्यो वक्ता कुशलस्य लब्धा । आश्चर्यो ज्ञाता कुशलानुशिष्टः॥’ [शांकर—शारीरभाष्य—अध्याय ३, पाद ४, सूत्र ५१]. आत्मबोध होण्यास ईश्वराची तशीच गुरूची कृपा पाहिजे:—यस्य देवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिता ह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः॥’ इति. ह्या श्रुतिवचनाचा अर्थ पंडितांनीं यथार्थदीपिकेंत दिला आहे. [अध्याय १ ओंव्या ९६-१११, काव्यसंग्रहग्रंथमाला—पृष्ठें ७-८.] ५. या क्रियेचा कर्ता ‘श्रुति’. ६. त्या शुद्ध आत्मस्वरूपास. ७. गुरूच्या कृपेनेंच. ८. हातीं येतें, प्राप्त होतें—असा अर्थ. ९. कबूल करितां. या क्रियेचा कर्ता ‘तुम्ही’. १०. हें ‘तत्व’ या शब्दाचें विशेषण. गुरु तत्व=श्रेष्ठ असें आत्मतत्व. ११. तोंडानें, केवळ शब्दांनीं. १२. अवगत, ज्ञात. हें ‘नव्हे’ या क्रियापदाचें क्रियाविशेषण. १३. न होई. न कळे, कळत नाहीं—असें तात्पर्य. १४. हा व्यासकृत वेदांतमतप्रतिपादक उपनिषद्ग्रंथ. वेदांतसूत्रें या ग्रंथावर शांकर शारीरिक भाष्य हा मुख्य ग्रंथ असून, विद्यारण्यकृत ‘पंचदशी’ हा ग्रंथही लोकांत प्रसिद्ध आहे. सदरहू सूत्रें, भाष्य व पंचदशी या ग्रंथांतील मतांस उपनिषदांचा आधार आहे, असें त्या त्या ग्रंथांचे कर्ते म्हणतात. याकरितां त्या मतास ‘वेदांत’ असें नांव आहे आणि त्या मतवाद्यांस ‘सिद्धांती’ असें नांव आहे. आणि त्यांनी सांगितलेल्या गोष्टीस ‘सिद्धांत’ असें म्हणतात. वेदांतमत म्हणजे अद्वैत. द्वैतमतवादी मध्व, रामानुजादि हे आपल्या मतास उपनिषदें विरुद्ध नाहींत असें म्हणतात आणि ते उपनिषदें आपल्या ग्रंथांस आधारभूत धरितात, तथापि त्या मतांस वेदांतमत म्हणत नाहींत. मध्व, रामानुजादि भेदवादी उपनिषदें (वेदांत) वाचीत असतांही त्यांस अद्वैत कां कळत नाहीं; याचें कारण या ओंवीत सांगितलें आहे. १५. शुद्ध आत्मतत्व. १६. गुरूकृपेवांचून कोणतीही गोष्ट कळत नाहीं. गुरूचें माहात्म्य असें आहे:—‘गुरुविणें न कळे

आत्मा[1] अहंस्फूर्ति म्हणोनि शास्त्रें[2], भेदात्मकें बोलति भेदमात्रें. ॥ ३३
जो कां अहंप्रत्ययरूप आत्मा, तो बोलतां हा निजतत्ववर्त्मा[3], ।
हा शास्त्रमात्रें कळेणार याला, कां पाहिजे? हो! गुरुराज बोला. ॥ ३४
शास्त्रासही[4] तों गुरु पाहिजे तो, म्हणाल[5] ऐसा[6] तरि हा नव्हे तो[7], ।
श्रुत्यर्थ सांगे परि तत्व नेणे[8], तत्वज्ञ जो केवळ तत्व जाणे. ॥ ३५
गुरुविणें[10] नकळे हरिची[11] गती, जरि म्हणाल असें वदती श्रुती, ।
तरि न जीव कळे सकळांसि कां, तुम्हि तुम्हांस कसें न वदों शका.॥ ३६
शास्त्रें अनेक तुम्हि वाचियलीं तथापी, जीवत्व केवळ[12] तुम्हां न कळे स्वरूपीं[13], ।

---

परमा गती गति शुकादि गुरूसचि मागती ॥,' 'गुरुविन ग्यान मिलेना पुरा' [देवनाथ], 'विदलयति कुबोधं बोधयत्यागमार्थं सुगतिकुगतिमार्गौ पुण्यपापे व्यनक्ति । अवगमयति कृत्याकृत्यभेदं गुरुर्यो भवजलनिधिपोतस्तं विना नास्ति कश्चित् ॥ १४ ॥ पिता माता भ्राता प्रियसहचरी सूनुनिवहः सुहृत्स्वामी माद्यत्करिभटरथाश्वः परिकरः । निमज्जन्तं जन्तुं नरककुहरे रक्षितुमलं गुरोर्धर्माधर्मप्रकटनपरात्कोऽपि न परः ॥ १५ ॥ [सोमप्रभाचार्यविरचिता सूक्तिमुक्तावली–गुरुप्रक्रम–काव्यमाला–गुच्छ ७, पृ०३७.]

१. श्लोक ३३ (उत्तरार्ध) व ३४ यांचा भावार्थः–भेदमात्रें (भेदवादी) भेदात्मकें (ईश्वर व जीवात्मा यांत भेद मानणारी) शास्त्रें (न्याय इत्यादि) अहंस्फूर्ति हाच आत्मा असें बोलती तो अहंप्रत्ययरूप आत्मा जो कीं तुम्ही भेदवादी बोलतां; हा निजतत्ववर्त्मा (शुद्धि जें आत्मत्व त्या स्वरूपाचे प्राप्तीचा अरुंधतिदर्शनन्यायानें एक मार्ग होय. हें शुद्ध आत्मस्वरूप नव्हे. अहंस्फूर्ति हाच जर आत्मा तर तो शास्त्रें वाचून कळणारा आहे. मग तो कळण्यास अवश्य गुरु पाहिजे असें सांगणारीं जीं वेदवाक्यें त्यांस वैयर्थता येते. तो कळण्यास गुरुराज कां पाहिजे? २. वेदांतमतप्रतिपादक शास्त्रांवाचून इतर शास्त्रें. ३. आत्मतत्वाचा मार्ग आत्मतत्वदर्शक तो आत्मा नसून आत्म्याचा दर्शक आहे–असा अर्थ. ४. शास्त्रग्रंथ शिकविण्यास. ५. या क्रियेचा कर्ता तुम्ही (भेदवादी) अध्याहृत. ६. अशा प्रकारचा शास्त्रें पढविणारा किंवा त्याचा अर्थ सांगणारा. ७. वेदांनी सांगितलेला, शुद्ध आत्म्याची ओळख करून देणारा. श्लोक ३५ चरण ४ यांत सांगितलेला गुरु. ८. शास्त्र पढविणारा. या श्लोकाचे प्रथम व तृतीय पादांत वर्णिलेला गुरु. ९. समजत नाहीं, कळत नाहीं. १०. श्रुतींनीं जी गुरूची आवश्यकता सांगितली ती जीवात्म्याचें स्वरूप कळण्यास्तव नसून ईश्वरप्राप्तीसाठीं किंवा ईश्वराचे स्वरूपाचा बोध होण्यासाठीं आहे–असें भेदवादी म्हणतील. असें या श्लोकाचे प्रथमार्धांत ग्रहण करून या श्लोकाचे उत्तरार्धांत व श्लोक ३७ प्रथमार्धांत जीवत्व कळण्यासाठीं गुरूची आवश्यकता आहे असें दाखविलें आहे. म्हणून ज्या गुरूला आपण कोण हें माहीत नाहीं आणि जो चिदहंपणा (चैतन्य आणि अहंवृत्ति) एकच असें मानितो त्यास तत्वमस्यादि श्रुतीचा खरा अर्थ कळणार नाहीं–असें श्लोक ३७ उत्तरार्ध व श्लोक ३८ यांत सांगितलें आहे. ११. ईशस्वरूपाचें ज्ञान. १२. शुद्ध. हें जीवत्वाचें विशेषण. १३. शुद्धस्वरूपी असें जीवत्व.

आतां म्हणा द्विविधही[1] गुरुगम्य[2] तत्त्वें[3], तेव्हां गुरू[4] न तुमच्या मिरवे गुरुत्वें. ३७
न वळखे गुरु आपण आपणा, तरिच मानितसे चिदहंपणा[5], ।
कवण आपण हें नकळे जया, श्रुतिगतार्थ[6] कळेल कसा? तया. ॥ ३८
असो ईश तो तों तुम्हां आकळेना, जयाला अनीशत्व तोही[7] कळेना, ।
म्हणूनी तुम्हां 'तत्त्वमस्या'दि वाक्यें[8], बहू दुर्घटें व्याकराया[9] अशक्यें. ॥ ३९
अनीशत्व[10] ईशत्व दोहींस तेथें, नसे ठाव[11] निद्रीं[12] पडे गाढ जेथें, ।
अनीशत्व ईशत्व दोन्ही उपाधी[13], स्वरूपींच ते मानिती स्थूलबुद्धी[14]. ॥ ४०
अहंप्रत्ययस्फूर्ति[15] आत्मत्व जेव्हां, सुषुप्तीमधें नाशतो[16] काय तेव्हां? ।
अहंप्रत्ययस्फूर्ति जेव्हां दिसेना, सुषुप्तींत मूर्छेत तेव्हां असेना[17]? ॥ ४१

---

१. हें तत्त्वाचें विशेषण. २. गुरूच्या द्वारें कळणारीं. ३. द्विविधतत्त्वें. जीवत्व आणि ईशस्वरूपाचें ज्ञान (श्लोक ३६ यांत म्हटलेली हरिची गती). ४. भेदमतवादी गुरु, अहंवृत्तिच आत्मा असें मानणारा. 'तुमच्या गुरुत्वें न मिरवे' तुमच्याहून अधिक विद्वान् नाहीं. तुम्हीं अज्ञान तसाच तोही अज्ञान—असा अर्थ. याचें कारण श्लोक ३८ यांत सांगितलें आहे. ५. चित्+अहंपणा=चैतन्य हीच अहंवृत्ति असें. ६. श्रुतीचा खरा अर्थ. ७. ज्याला तुम्हीं (भेदवादी) अनीश असें म्हणतां तो जीवही. त्या जीवाचें स्वरूप काय तेंही. ८. वेदांतवाक्यें. ९. स्पष्टीकरण करण्यास. १०. जीवस्वरूप. ईश (परमात्मा) आणि अनीश (जीवात्मा) यांचें खरें स्वरूप तुम्हास (भेदवाद्यांस) कळत नाहीं. असें श्लोक ३९ यांत म्हटलें आहे. यास्तव या श्लोकांत, 'तें स्वरूप कसें आहे' याविषयीं विवरण आहे—अनीशत्व आणि ईशत्व या दोहींस तेथें म्हणजे शुद्ध आत्मत्वाचे ठिकाणीं ठाव (जागा) नसे. जेथें गाढनिद्रा पडे (निद्रेंत ज्याप्रमाणें परमात्मा (बिंब) आणि जीवात्मा (प्रतिबिंब) यांची भिन्नता नसते) तें अनीशत्व आणि ईशत्व स्वरूपींच (शुद्धस्वरूपाचे ठिकाणीं) असें स्थूल बुद्धीचे मनुष्य मानिती परंतु सूक्ष्मबुद्धि ज्यांची ते मनुष्य तसें मानीत नाहींत. कारण ते दोन्ही (अनीशत्व आणि ईशत्व) हे उपाधिभेद आहेत असें सूक्ष्मबुद्धीनें कळतें. ११. कल्पना करण्यास जागा. १२. निद्रेच्या वेळीं. १३. उपाधीविषयीं अध्याय ४ श्लोक २१-२५ आणि त्यांवरील टीपा पहाव्या. [पृष्ठ १४१-१४२ पहा.] १४. खोल विचार न करणारे, वरवर विचार करणारे. १५. मूढवृत्ति म्हणजे सुषुप्ति आणि मूर्च्छा या अवस्थांचा विचार केला तर अहंप्रत्ययस्फूर्ति हें आत्म्याचें स्वरूप नव्हे असें ठरतें, कारण मूढवृत्तींत आत्मा असतो (आत्माच नसतो असें भेदवादी म्हणत नाहींत, बुद्ध मात्र म्हणतात. त्याचें खंडन अध्याय ५ यांत अखेरीस केलें आहे.) परंतु त्या वेळीं अहंप्रत्ययस्फूर्ति नसते हा प्रत्यक्ष अनुभव सर्वांस आहे. ही गोष्ट या श्लोकापासून श्लोक ४४ पर्यंत सांगितली आहे. [यथार्थदीपिका–२, ओंव्या ५७७-५८१ पहा.] १६ या क्रियेचा कर्ता 'आत्मा' हा अध्याहृत आहे. आणि 'आत्मा नाशतो काय? असा प्रश्न आहे. १७. याचा कर्ता 'आत्मा' 'असेना काय?' असा प्रश्न आहे.

[1]आहे अहंस्फूर्ति तरी प्रतीती, कां हो! दिसेना पडतां सुषुप्ती? ।
[2]नाहीं म्हणावा तरि [3]तोचि कीं तो, होऊनि जागा सुख आठवीतो. ॥ ४२
आत्मा अहंस्फूर्ति नव्हेचि जेव्हां, सुषुप्तिकाळीं [4]नसतांचि तेव्हां, ।
आतां अनीशत्व म्हणा उपाधी, [5]ऐसीच ईशत्वउपाधिसिद्धी. ॥ ४३
विसरतो निजतो [7]अहमात्मता, तरि कसा [8]उरतो वद [9]तत्वता? ।
न वदवे तरि केंवि [10]अनीश [11]तो? धरुनि नीजउपाधिस भासतो. ॥ ४४
[12]आहे अहंप्रलय यासि तेव्हां, निद्रा पडे गाढ [13]अतीव जेव्हां, ।
होऊनि जागा विसरे म्हणावा, तेव्हां कसा [14]स्वप्नहि आठवावा? ॥ ४५
स्वप्नीं दिसे विश्व असेंचि यातें, याकारणें हा स्मरतो तयातें, ।
तेसें सुषुप्तींत दिसे न कांहीं, याकारणें ते स्मृति यासि नाहीं. ॥ ४६
[15]ऐसें म्हणाल तरि [16]अंधगृहांत जेव्हां, कांहीं दिसे न निजदेहहि [17]त्यांसि [18]तेव्हां, ।

---

१. सुषुप्तींत अहंस्फूर्ति आहे असें म्हणतां येत नाहीं. याचें कारण या श्लोकाचे प्रथमार्धांत आणि त्या वृत्तींत 'आत्मा' नाहीं असें म्हणतां येत नाहीं याचें कारण द्वितीयार्धांत सांगून त्या दोन्ही शंकांचें निराकरण या श्लोकांत केलें आहे. २. याचा कर्ता जीवात्मा. जीवात्मा नाहीं म्हणावा—असा अन्वय. ३. तो आत्माच, जो झोंपेचे वेळचें सुख आठवितो तो आत्मा. ४. अहंस्फूर्ति नसतांचि—असा अन्वय. सुषुप्तीकाळीं अहंस्फूर्ति ज्यापेक्षां नसते त्या अर्थी ती आत्मा नव्हे—असा अर्थ. ५. अनीशत्व (जीवत्व) हा एकप्रकारचा उपाधिभेद (जीवोपाधि) तशीच ईशत्व उपाधीची सिद्धी म्हणजे ईशत्व हाही एक उपाधीचा भेद आहे—असा अर्थ. ६. घटना. ७. अहंकार, अहंवृत्ति, मीपणा. ८. झोंपेच्या वेळीं अस्तित्वांत असतो. याविषयीं मागें अध्याय ५ श्लो० ३६-६६ पहा. ९. वस्तुतः, खरोखर. १०. ईशस्वरूपाहून भिन्न. ११. जो निज उपाधीस धरूनि भासतो तो. [कैंवी भासतो? असा प्रश्न नव्हे. कैंवी अनीश? असा प्रश्न आहे] १२. श्लो० ४५,४६ यांत भेदवाद्यांचें म्हणणें आहे. तें असें:—निद्रेंत अहंप्रलय असतोच आणि जागा झाल्यानंतर त्या अहंप्रलयाचा आठव (स्मरण) ही असतो. मात्र स्वप्नांत यास विश्व दिसतें यास्तव तें विश्व हा स्मरतो. तसें निद्रेंत याला दिसत नाहीं, यास्तव त्या वेळची यास स्मृति नाहीं. १३. पुष्कळ. १४. 'स्वप्न' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. मोरोपंतानेंही हा शब्द कोठें कोठें पुल्लिंगींच योजिला आहे:—'ऐसा स्वप्न विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा.' ॥ [काव्यसंग्रहग्रंथमाला—वनपर्व—पृष्ठ २१५, अध्याय १४ गीति १५]. १५. श्लो० ४५।४६ यांत म्हटल्याप्रमाणें तुम्ही भेदवादी म्हणाल तर त्या म्हणण्याचें या श्लोकांत खंडन केलें आहे. १६. अंधकारयुक्त घरांत. ज्या घरांत प्रकाश मुळींच नाहीं—असा काळोख आहे अशा घरांत. अर्थात् रात्रीच्या वेळीं. १७. अंधगृहांत असणारे माणसास. १८. अंधगृहांत असतांना.

आहे [1]प्रतीति दि[2]वसा स्मरतो ति[3]येतें, ऐसी सुषुप्ति नकळेचि कि[4]मर्थ [5]यातें ?॥४७
[6]बुद्धींद्रियें सकळ अंधगृहांत जागीं, सूर्योदयीं स्मरतसे जन याचिलागीं, ।
[8]बुद्धींद्रियांवरि जईं पडते सुषुप्ती, ऐसाचि हा [9]पैरि न [10]तें वदवे प्रतीती. ॥ ४८
ऐसें [11]म्हणाल तरि [12]तो जरि [13]जागताहे, निद्रिस्थ बुद्धि मन इंद्रिय कां न पाहे, ।
पाहातसे तरि किमर्थ [14]ऐसें स्फुरेना, कां जागृतींत मग तें स्फुरणें उरेना ?॥४९
[15]सुषुप्तीमधें बुद्धि जागी असेना, तियेवीण कांहींच [16]यांला कळेना, ।

---

१. अंधगृहांत असतां वेळची (रात्रीची) प्रतीति. २. सूर्योदयीं, प्रकाश पडल्यावर. ३. त्या प्रतीतीला, अंधगृहांत असल्या वेळच्या प्रतीतीला. ४. सुषुप्तीच्या वेळची प्रतीति. ५. कां? कोणत्या कारणास्तव? ६. याला, निद्रिस्ताला. ७. या श्लोकांत भेदवाद्यांचें म्हणणें आहे. ८. जागृतींत जसा अहंप्रत्यय त्याचप्रमाणें सुषुप्तीच्या वेळींही अहंप्रत्यय असतो. ९. तथापि. १०. सुषुप्तीच्या वेळची. ११. या म्हणण्याचा उल्लेख श्लो० ४८ यांत आहे. आणि त्या म्हणण्याचें खंडन या श्लोकांत केलें आहे. १२. अहंप्रत्यय. हा 'जागताहे,' 'पाहे,' 'पाहताहे' या क्रियापदांचा कर्ता. येथें एका कर्त्यांचा अनेक क्रियांशीं संबंध आहे म्हणून येथें **'कारकदीपक'** नामक अलंकार झाला आहे. १३. जागृत आहे, अस्तित्वांत आहे. १४. बुद्धि, मन, इंद्रियें हीं निद्रित असून त्यांस मी (अहंप्रत्यय) पाहतों असें. १५. श्लो० ५० पासून श्लो० ५४ पर्यंत अन्वयार्थ असा:—तुम्ही (भेदवादी) जर असें कबूल करितां (बोलतां) कीं 'सुषुप्तीमधें बुद्धि जागी असत नाहीं (असेना) आणि यामुळें म्हणजे त्या बुद्धीवांचून (तियेवीण) आत्म्याला (याला) कांहींच कळत नाहीं (कळेना)' तर या तुमच्या कबुलीनेंच वेदसिद्धांताची (अहंवृत्ती आत्मा नव्हे या गोष्टीची) सिद्धी होते. त्याची (आत्म्याची) प्रसिद्धी अहंप्रत्ययें केंवि? (अहंप्रत्यय हाच आत्मा असें, या तुमच्या कबुलीनेंच सिद्ध कसें होतें? अहंप्रत्यय हा आत्मा असें सिद्ध होऊं शकत नाहीं—असा अर्थ. (श्लो० ५०). 'बुद्धी जागी नसल्यामुळें (विनाबुद्धी) ज्या वेळीं (जेव्हां) कांहीं न जाणेचि (प्रतीती नसते) तेव्हां (त्यावेळीं) ही तेथ (झोपेंत) अहंस्फूर्तीरूपें हा असतोच (असे)' असें तुम्ही (भेदवादी) बोलतां—तरी मग अशीच (येचरीती) म्हणजे झोपेंत 'अहंस्फूर्ती' होती अशी (ते प्रतीति) जागा झाल्यावर लोकांला कां स्मरत नाहीं? (जनालागीं कां नाठवे? श्लो० ५१)—ज्यापेक्षां (जेव्हां) याला बुद्धी जागृत असल्यावांचून (विनाबुद्धी) कांहींच कळत नाहीं (कळेना) त्यापेक्षां असें स्पष्ट होतें कीं याला त्यावेळीं (तईं) 'स्वधर्मत्व, आकलन होत नाहीं (आकलेना) अहंस्फूर्ती हेंच जर आत्म्याचें स्वरूप (जेव्हां स्वरूपेंची आत्मा), तर त्यावेळीं यास 'स्वधर्मत्व' कां कळूं नये? (तेव्हां यासी ते स्थळीं कांहींच कसें कळेना? श्लो० ५२)—मूर्छेत आणि निद्रेत प्रतीती (अहंवृत्ती) नसे. ही सकलानुभूती येथें (आमचे डोळ्यांसमोर) प्रत्यक्ष आहे. तयासी अनीशत्व आणि ईशत्व हा भेद त्याचे आंगा कोणे रीति लागेल? हेंचि सांगा? (श्लो० ५३)—यासी जे बुद्धीनें प्रलय येतो (यावा) त्या बुद्धीला (तियेसी) म्हणजे उपाधीला अनीशत्व आणि ईशत्व झाला (भावा)—झोंपेच्या वेळीं तयाला स्वयें प्रतीति असती, तर भाव

असें बोलतां वेदसिद्धांत सिद्धी, अहंप्रत्ययें केंवि त्याची प्रसिद्धी? ॥ ९०
अहंस्फूर्तिरूपें असे तेथें जेव्हां, विनाबुद्धि कांहीं न जाणेचि तेव्हां, ।
असें बोलतां हो तरी येंच रीती, जनालागिं कां नाठवे ते प्रतीती? ॥ ९१
विनाबुद्धि कांहींच जेव्हां कळेना, स्वधर्मत्व याला तंई आकळेना, ।
अहंस्फूर्ति आत्मा स्वरूपेंचि जेव्हां, कळेना कसें तेस्थळीं यासि तेव्हां? ९२
प्रत्यक्ष येथें सकळानुभूती, मूर्छेत निद्रेंत नसे प्रतीती, ।
अनीशाईशत्व तयासि आंगा, लागेल कोणे रिति? हेंचि सांगा. ॥ ९३

जे बुद्धिनें प्रत्यय यासि यावा, अनीश ईशत्व तियेसि भावा, ।
स्वयें तयाला असती प्रतीती, तेव्हां खरी ही तुमचीच रीती. ॥ ९४
अनीशत्व ईशत्वही बुद्धिवृत्ती, चिदात्मा तयाला स्वयें न प्रतीती, ।
स्वतंत्रत्व वृत्तीस येईल जेव्हां, प्रतीतिप्रद स्वात्मया वृत्ति तेव्हां. ॥ ९५

---

(तेव्हां) ही तुमचीच रीति (भेदात्मक कल्पना) खरी ठरती (श्लो० ५४). १६. आत्म्याला. या अध्यायांत 'हा' आणि 'तो' हीं सर्वनामें आत्म्याच्या बद्दल योजिलीं आहेत. परंतु त्या सर्वनामांजवळ 'आत्मा' हा शब्द आलेला नसतो हें व्यंग आहेसें दिसतें परंतु तें खरोखर व्यंग नव्हे कारण या अध्यायांत 'आत्मत्व म्हणजे काय?' याचाच विचार केलेला आहे.

१. अहंवृत्ति हा आत्मा नव्हे—हा वेदाचा सिद्धांत. [या प्रकरणाच्या चौथ्या अध्यायांत आत्म्याचें स्वरूप सांगितलें आहे तें पहा]. २. प्र+सिद्धी=अत्यंत+सिद्धता. अहंप्रत्ययें (प्रत्ययानें) त्याची (आत्म्याची) प्रसिद्धी (अत्यंत सिद्धता) कशी होऊं शकते?—असा प्रश्न. अर्थात् अहंप्रत्ययें आत्मा नाहीं—हें उत्तर. ३. या क्रियेचा कर्ता 'आत्मा.' ४. झोंपेंत. ५. आत्मा. ६. पूर्वार्धांत वर्णिलेल्या रीतिप्रमाणें. ७. त्या वेळी (झोंपेच्या वेळीं) किंवा तेथें (झोंपेंत). ८. झोंपेच्या वेळीं. ९. सकलांचा अनुभव. १०. त्या बुद्धीला; उपाधीला. [यथार्थदीपिका—अध्याय ९ ओंवी ७२९ पहा. उपाधीलाच बुद्धी म्हणतात.] ११. माना, समजा. [यथार्थदीपिका—अध्याय ९ ओंवी ६०९.] १२. सत्य. ज्यापेक्षां तयाला स्वयें प्रतीति नाहीं, त्या अर्थी ही तुमची रीति सत्य नाहीं—असें तात्पर्य. प्रतीति हा धर्म वृत्तीचा आहे. वृत्ति सत्वगुणावांचून नाहीं. अर्थात् गुणातीत जें चैतन्य त्यास प्रतीति नाहीं. [हा विषय मागील अध्यायांत सांगितला आहे. अध्याय ४ श्लोक २५; अध्याय ५ श्लोक २ पहा]. १३. या श्लोकांत भेदवाद्यांचे म्हणण्याचा उल्लेख आहे. तें म्हणणें असें:—स्वयें चैतन्याला (चिदात्मा जो तयाला) प्रतीति नाहीं. अनीशत्व आणि ईशत्व ही बुद्धि (उपाधि) वृत्ति होय. असें तुम्ही (वेदांतवादी, अद्वैतवादी) म्हणतां हें म्हणणें जर सत्य मानिलें आणि स्वात्मया (आत्म्याला) वृत्तीच्या योगानें प्रतीति (वृत्तिच प्रतीतिप्रद) आहे असें ग्रहण केलें तर (तेव्हां) वृत्तीस स्वतंत्रत्व येईल आणि आत्मा परतंत्र आहे असें ठरेल. सारांश—बुद्धिवृत्ति जड तिला स्वतंत्रता आणि आत्मा चैतन्यस्वरूपी तो परतंत्र—असें ठरेल. १४. प्रतीति+प्रद=आत्मस्वरूपाचा प्रत्यय देणारी.

जरि[1] म्हणाल असें तरि आइका, नयनिं काष्टहि दाखवि पावका[2], ।
न निरुपाधिक[3] अग्नि कधीं दिसे, परि उपाधिअधीन[4] न तो असे. ॥ ५६
काष्ठादि[5] यत्किमपिवांचुनि अग्नि सृष्टी[6], कोणीतरी नयनिं देखियला न दृष्टी, ।
दाहप्रकाशक तथापिहि अग्नि जैसा, आत्मा स्वतंत्र परतंत्र उपाधि तैसा[7]. ॥ ५७
अमृत गोड असें रसनेविण[8], जरि कळे न तथापिहि तो गुण, ।
अमृतनिष्ठ[9] सुधागत[10] माधुरी[11], न रसनेंद्रियनिष्ठ[12] असे[13] परी[14]. ॥ ५८
स्वतंत्र तें केवळ जेथ सत्ता[15], सत्ता स्वरूपासि[16] तसी न चित्ता[17], ।
चित्तास[18] निद्रेंत नसे प्रतीती[19], तेव्हां[20] उठे तामस[21] मूढवृत्ती. ॥ ५९
निद्रेंत वृत्तींस नसे प्रतीती, प्रत्यक्ष तेथें जडरूप वृत्ती ।
होऊनि जागा सुख आठवीतो, प्रकाशितो वृत्तिस जागरीं तो[22]. ॥ ६०
पूर्वाध्यायीं अर्थ हा स्पष्ट आहे, वृत्तींतें तों न स्वतंत्रत्व साहे[23] ।
जो कां भोक्ता तो सुखेच्छा धरूनी, वृत्ती सर्वा नेणीवी[24] चेतवूनी[25]. ॥ ६१
वाचेविणे[26] जेरिति बोलवेना, पायांविणें जेरिति चालवेना ।
आत्मा तथापि प्रभु[27] आत्मतंत्र, जेणें प्रकाशे[28] जड[29] तत्वमात्र. ॥ ६२

---

१. श्लोक ५५ यांतील शंकेचें समाधान श्लोक ५६-६५ पर्यंत केलें आहे. २. अग्नीला. ३. उपाधीवांचून, काष्ठादि साधनाशिवाय. ४. उपाधीच्या (बुद्धीच्या) ताब्यांत. ५. काष्ठ इत्यादिक जें कांहींएक त्यावांचून. ६. सृष्टींत, जगांत. ७. अग्नि हा स्वतंत्र आणि काष्ठादि पदार्थ [प्रकाशण्याविषयीं] परतंत्र होत. त्याप्रमाणें आत्मा स्वतंत्र आणि तो ज्या उपाधीनें प्रतीतीला येतो तो उपाधी (बुद्धिवृत्ति) परतंत्र (जडस्वरूपी) होय. ८. जिव्हेवांचून, ['रसना कांचि जिव्हयोः' इति विश्वप्रकाशः]. ९. अमृताला, अमृताचे ठिकाणीं राहणारा. १०. हें 'माधुरी'चें विशेषण. ११. मधुरता, गोडी. १२. रसना+इंद्रिय+निष्ठ (राहणारा)=जिभेचे ठिकाणीं राहणारा, जिभेचा. कर्मेंद्रियें व ज्ञानेंद्रियें अशीं दोन प्रकारचीं इंद्रियें आहेत. रसना शब्दानें ज्ञानेंद्रियत्वाचा बोध होतो व तोच येथें इष्ट आहे. १३. तो गुण (सुधागत माधुरी) अमृतनिष्ठ असे. रसनेंद्रियनिष्ठ नसे–असा अन्वय. १४. परंतु. १५. हाच शब्द मागें अं० ५ श्लो० ५३ यांत आला आहे. [याच्या अर्थाविषयीं यथार्थदीपिका–अध्याय २ ओंव्या २९१, २९२, ३४०, ३४९ पहाव्या.] १६. चैतन्याला, आत्मस्वरूपाला. १७. वृत्तीला, बुद्धिवृत्तीला, सत्वाला. १८. चित्त शब्द येथें बुद्धिवृत्तीचा बोधक आहे. [यथार्थदीपिका–अध्याय ५ ओंव्या २७३, २७६, २७७ पहा.] १९. अनुभव, अनुभूति. २०. झोंपेच्या वेळीं. २१. तमोगुणयुक्त. हें मूढवृत्तीचें विशेषण. २२. चैतन्यरूपी आत्मा. २३. सोसतें, संभवतें, असतें. साहे न=असत नाहीं, संभवनीय नाहीं. २४. वागवी, प्रेरणा करी. २५. चैतन्ययुक्त करून. २६. जिव्हेवांचून, वागिंद्रियावांचून. २७. शक्तिमान्, समर्थ. हें आत्म्याचें विशेषण. २८. चेतनायुक्त होई. २९. सर्व जड तत्वें.

शक्तीविणें शक्ति नव्हे तथापी, स्वतंत्रता केवळ चित्स्वरूपीं ।
जाऊनि मारी परि राष्ट्रसेना, सत्ता नृपावांचुनियां दिसेना. ॥ ६३
सत्तेंत वृत्तीविण न प्रतीती, सत्ताविहीना जड चित्तवृत्ती ।
होतो असा चिज्जडयोग जेव्हां, जीवत्व ईशत्वहि होय तेव्हां. ॥ ६४
तथापि सत्ता न जडासि जेव्हां, स्वतंत्र त्याला म्हणवे न तेव्हां ।
आत्मत्व जेव्हां न कळे तुम्हांला, कां मोडितां हो निगमार्थ ? बोला. ॥ ६५
म्हणाल सर्वांस चिदैक्य जेव्हां, सर्वांस भोक्तृत्व समान तेव्हां ।
चैतन्य भेदेंविण एक भोगें, दुःखी सुखी सर्वहि तत्प्रसंगें. ॥ ६६
जो **'भोक्तृतत्व'** म्हणवूनि चतुर्थ येथें, अध्याय हा विशद निर्णय सर्व तेथें ।
बिंबासि भेद न घडे प्रतिबिंबभेदें, भोक्तृत्व भिन्न जळचंचळताविनोदें. ॥ ६७
येथें तुम्हीं धरुनियां स्वमताभिमाना, स्थापावया स्वमत युक्तिस यी न माना ।
हे अस्मदादिमति कल्पित तों न युक्ती, वेदश्रुती वदति ज्या जगदीशउक्ती. ॥
नानाजळीं रवि जसा बहुरूप भासे, आत्मा तसा बहुउपाधित वेद ऐसे ।
युक्ति स्वयें वदति त्यांस तुम्हीं न माना, प्रत्यक्ष दाखवितसां स्वमताभिमाना. ॥

---

१. साधनावांचून. २. सामर्थ्य. ३. चैतन्याला, चैतन्याचे ठिकाणीं. ४. शत्रूवर चाल करून जाऊन. ५. मारिते. या क्रियापदाचा कर्ता 'राष्ट्रसेना'. ६. देशाची फौज, राज्याची फौज. ७. राजाशिवाय. ८. या श्लोकाचा पूर्वार्ध व अध्याय ४ श्लोक २५ पूर्वार्ध हे समानार्थक आहेत. ९. चित्+जड+योग=चैतन्याचा आणि जडाचा योग (मिळणें). या योगानें जीवत्व होतें [अध्याय ४ श्लोक २६ उत्तरार्ध पहा] व याच योगानें ईशत्व उत्पन्न होतें [मागें अध्याय ४ श्लोक २६ प्रथमार्ध पहा]. १०. चिरपण, अस्तित्व, अविनाशीपणा. श्लोक ५९ सत्ता शब्द पहा. ११. अहंवृत्तीस चित्पण नाहीं असें वर सांगण्यांत आलें त्या अर्थी अहंवृत्ति जड होय तिला. १२. अहंवृत्तीला. १३. या श्लोकांत भेदवाद्यांच्या एका शंकेचा उल्लेख आहे. या शंकेचा स्पष्ट उल्लेख अध्याय ४ श्लोक ४७ चरण ३।४ यांत आहे. या शंकेचें निराकरण श्लोक ६७ यांत आहे. १४. सर्व जीवसृष्टीस, चैतन्यरूपांस. १५. सुखदुःखाचा संबंध. १६. स्पष्ट. १७. या निर्णयाचें तात्पर्य उत्तरार्धांत सांगितलें आहे. तें असें:— बिंबासि भेद न घडे जळचंचळताविनोदें प्रतिबिंबभेदें भोक्तृत्व भिन्न असे. १८. पाण्याची (समुद्राची) लाट ज्याप्रमाणें चंचल होते त्याप्रमाणें. १९. द्वैतमताभिमाना. २०. कल्पनेला, विचाराला. २१. वेदांतमतानें प्रतिपादिलेल्या. २२. समजा, मान्य करा. २३. मी किंवा दुसरे वेदांतमतवादी यांनीं स्वकल्पनेनें सांगितलेली. २४. हें वेदश्रुतीचें विशेषण. २५. याविषयीं श्रुति पहाः—'यथा ह्ययं ज्योतिरात्मा विवस्वानापो भिन्ना बहुधैकोऽनुगच्छन् । उपाधिना क्रियते भेदरूपो देवः क्षेत्रेष्वेवमजोऽयमात्मा. ॥' [यथार्थदीपिका—अध्याय २ ओंव्या ३२६-३३० व

एक [1]प्रभाकर अनेक जळांत जैसा, [2]क्षेत्रें अनेक परि एकचि देव तैसा, ।
[3]नाना जसे दिसति सूर्य अनेक नीरीं, देवासि जीवपण भिन्न असे शरीरीं. ॥
ऐशा श्रुती वदति ज्या जगदीशउक्ती, प्रत्यक्षही अनुभवाप्रति येति युक्ती ।
एकत्व वास्तवचि 'तत्त्वमसी'ति वेदीं, नेतां वदा तुम्हि [4]किमर्थ [5]तदर्थभेदीं ? ॥

बिंबासि प्रतिबिंबऐक्य न घडे ऐसें तुम्हीं [6]साधिता,
झालें तें प्रतिबिंब कोठुनि वदा [7]पाहोनियां [8]तत्त्वता ।
जैसें बिंब तसेंचि [9]तें उपजलें [10]ज्यांपासुनी सर्वथा,
त्याचा त्याचमधें पुन्हा लय तुम्हीं कां हो! न [11]मानां वृथा ? ॥ ७२
[12]मुख [13]अधोमुख होउनि पाहतें, उदकिं [14]ऊर्ध्वमुखें [15]मुख राहतें ।
[16]मलिननिर्मलतादिक लक्षणीं, [17]इतरता धरली [18]अविचक्षणीं. ॥ ७३

[19]आधीं [20]उपाधिविण [21]हें नव्हतेंचि जेव्हां, बिंबांत भिन्न प्रतिबिंब नसेचि तेव्हां ।
नासे उपाधि न उरे प्रतिबिंब दूजें, मिथ्याच सर्व वदतां तुम्हि [22]भेदबीजें. ॥ ७४
[23]आद्यंत [24]ऐक्य तरि हें [25]स्फुट दीसताहे, नाहीं तुम्हां न म्हणवे जरि हें [26]न साहे ।
[27]मध्येंच भेद दिसतो तरि [28]पाहिजे [29]तो, भेदें [30]करोनिच [31]सुखासुखभेद [32]होतो.॥७५

---

१. सूर्य. २. शरीरें, जीव. ३. अनेक, भिन्न, वेगवेगळे. ४. त्या श्रुतीचा अर्थ. ५. भेदाचे ठिकाणी, भेदाकडे. ६. ठरविता, सिद्ध करिता. ७. चांगला विचार करून, शुद्ध दृष्टि देऊन. ८. वस्तुतः, वास्तविकपणें. ९. प्रतिबिंब. १०. ब्रह्मस्वरूपापासून. ११. 'जें ज्यापासून उत्पन्न झालें त्याचा त्यांतच पुन्हा लय' ही गोष्ट तुम्ही आग्रहानें मान्य करीत नाहीं—असा अर्थ. १२. बिंब आणि प्रतिबिंब यांत भेद आहे असें मानण्यास जीं कांहीं लक्षणें आहेत त्यांचा या श्लोकांत उल्लेख केला आहे. १३. खालीं (उदकाकडे) दृष्टि केलेलें. १४. वर, पाहाणाऱ्याकडे तोंड करून. १५. मुखाचें प्रतिबिंब, पाण्यांतील मुख. १६. पाणी मलिन असेल तर त्यांतील प्रतिबिंब मलिन याप्रमाणें. १७. भेद, फरक, बिंब व प्रतिबिंब यांत फरक. १८. अचतुर अशा पुरुषांनीं. १९. बिंब आणि प्रतिबिंब यांत भेद कसा नाहीं यांचीं कारणें श्लोक ७४।७५ व ७६ यांत सांगितलीं आहेत. २०. ज्यांत प्रतिबिंब दिसतें तो उपाधि, उदक हा उपाधि; पाण्याशिवाय. २१. प्रतिबिंब. २२. भेदाचीं कारणें मिथ्या होत—असा भावार्थ. २३. आदि आणि अंत प्रतिबिंब पडण्यापूर्वी आणि बिंब व उपाधि यांचा योग नाहींसा झाल्यामुळें किंवा उपाधि (पाणी) मलिन झाल्यामुळें प्रतिबिंब नाहींसें झाल्यावर, आद्यंतकाळीं, आरंभीं व शेवटीं. २४. बिंब व प्रतिबिंबाचें ऐक्य. २५. स्पष्ट, उघड. २६. सोसत नाहीं, प्रिय नाहीं, कबूल नाहीं. २७. प्रतिबिंब असतांना. २८. बिंब व प्रतिबिंब यांत भेद असलाच पाहिजे, व तसा भेद आहेही. परंतु तो भेद चैतन्यरूपाचे संबंधाचा नसून सुखासुखभेद आहे—असा अर्थ. २९. भेद. ३०. भेद असल्यामुळेंच. ३१. सुख व दुःख यांचा भोग बिंबास नाहीं आणि प्रतिबिंबास आहे असा भेद. ३२. घडून येतो.

आद्यंत[1] काळीं तरि भेद नाहीं, मध्यें[2] नसे[3] हा भेद विरुद्ध कांहीं ।
हा भेद तों साधन[4] भोगभेदीं[5], याचेंचि[6] तें 'त्वंपद'ऐक्य वेदीं[7]. ॥ ७६

[9]अद्वैत 'तत्वमसि' जोंवरि भेद नाहीं, अद्वैतबोध करणें न घडेचि कांहीं ।
जीवेश शिष्य गुरु यासि न ठाव[11] जेव्हां, कोणासि कोण उपदेश करील तेव्हां?[10] ॥
भोक्तृत्व[12] भिन्न[13] दिसतें सकळांसि[14] जेव्हां, आत्मत्व ऐक्य सकळांसि घडेल[15] तेव्हां, ।
आत्मत्व एक तरि भोगविभेद कैसा हीं[16] पूर्वपक्ष[17] हरिला[18] हरिनेंच[19] ऐसें[20]. ॥ ७८

असे[21] एक जीवत्व अद्वैतवादीं, जगीं बोलती तो विरुद्धार्थ वेदीं ।
न अद्वैत हें द्वैतही तें घडेना, गुरूवांचुनी तत्व हें सांपडेना. ॥ ७९

---

१. श्लोक ७५ आद्यंत शब्दावरील टीप पहा. २. श्लोक ७५ मध्येंच शब्दावरील टीप पहा. ३. नाहीं. हा भेद अद्वैतसिद्धांताचे विरुद्ध नाहीं—असा अर्थ. ४. कारणभूत, साधनभूत. ५. सुखदुःखभोगभेदाविषयीं. ६. या भेदानेंच. ७. वेदांनीं सांगितलेलें. ८. 'तत्वमसि श्वेतकेतो' इत्यादि श्रुति पहा. [शांकरभाष्य—अध्याय १ पाद १ सूत्र ६.] या श्रुतीवर गोविंदानंदकृत भाष्य असें आहे:—श्वेतकेतो, त्वं च नासि संसारी किंतु तदेव सदबाधितं सर्वात्मकं ब्रह्मासीति श्रुत्यर्थः. या श्रुतींतील 'त्वं' शब्दानें दाखविलेलें ऐक्य. ९. श्रुतींत. 'तत्वमसि' या श्रुतींत. १०. श्लो० ७४,७५ व ७६ यांत बिंब व प्रतिबिंब यांत भेद कसा आहे तो दाखविला आहे. जीवात्मा व परमात्मा यांत उपाधिपरत्वें भेद आहे म्हणूनच जीव व ईश, शिष्य व गुरु, या गोष्टींस अस्तित्व प्राप्त झालें आहे. व 'अद्वैत' 'तत्वमसि' असा उपदेश जरूर करण्याची श्रुतींना आवश्यकता झाली—असें या श्लोकांत सांगितलें आहे. ११. अस्तित्व. १२. सुखदुःखभोग. १३. वेगवेगळे. एका जीवाला सुख तर दुसऱ्याला दुःख या भेदानें. १४. सर्व जनांला. १५. तेव्हां (तर मग) सकळांसि आत्मत्व ऐक्य घडेल काय?—असा अन्वय. सर्वांचा आत्मा एकच असें म्हणतां येईल काय? असा अर्थ. १६. या श्लोकांत सांगितलेला. १७. प्रश्न, शंका. या श्लोकाचे प्रथम तीन चरणांत वर्णिलेला पूर्वपक्ष (शंकाविषयक प्रश्न). १८. खंडन केला. या प्रकरणाच्या चौथ्या भोक्तृतत्व नामक अध्यायांत जें सांगितलें आहे त्यावरून या शंकेचा निकाल होतो—असा अर्थ. १९. ग्रंथकर्त्यानें. [अध्याय ४ श्लोक ५।६ पहा.] २०. पुढें श्लोक ७९।८० यांत सांगितलेल्या रीतीप्रमाणें. २१. या श्लोकाचा अर्थ व अन्वयः—पूर्वार्ध—अद्वैतवादी एक जीवत्व असे असें जें जगीं बोलती तो वेदीं विरुद्धार्थ होय म्हणजे सर्व जीव एकच असें अद्वैतशास्त्र (वेदांतशास्त्र) म्हणत नाहीं. शुद्ध आत्मत्व एक आहे त्यांत भेद नाहीं—असें मात्र अद्वैतवादी म्हणतात. जीवत्व म्हणजे ज्या प्रतिबिंबाला सुखदुःख भोग घडतो त्या प्रतिबिंबांत ऐक्य आहे म्हणजे एकाचें सुखदुःख तेंच दुसऱ्याचें असें अद्वैतवादांत नाहीं. उत्तरार्ध—हें (सुखदुःखभोगाविषयीं सर्व जीवांचें) अद्वैत न आणि तें (शुद्ध आत्म्याविषयीं) द्वैतही घडेना हें तत्व गुरुवांचूनी सांपडेना (सांपडत नाहीं). 'अद्वैत न' आणि 'अद्वैतही घडेना' या दोन विरुद्ध दिसणाऱ्या गोष्टींची एकता गुरुकृपेनेंच होणार.

चैतन्यभेद नसतां तरि भेद भोगीं[1], ऐसें[2] कदापि नव्हतें सुखदुःखयोगी[3] ।
हें[4] वर्णिलें विशद[5] येथेंचि[6] भोक्तृतत्वीं[7], तें[8] पाहणें[9] अनुभवीं[10] अतिशुद्धसत्वीं[11]. ८०

वेदांताश्रित[12] एकजीवमत[13] तें जेव्हां नव्हे[14] सर्वथा[15],
भेदीं बोलति आत्मता बहुमतीं[16] येथें[17] तिची[18] कां कथा? ।
तें[19] [20]श्रीमाधव उत्तरप्रकरणीं[21] दूषील जें अन्यथा[22],
आत्मत्व प्रतिपादिती सकळही भिन्नात्मवादी[23] वृथा[24]. ॥ ८१

[25]जीवेशभेद वदताति विरुद्धधर्में[26], तें[27] तों उपाधिगुण[28] हें न कळोनि वर्में ।
अद्वैत तत्व उपपादिति सर्व वेदीं, तो[29] अर्थ मोडिति अबाधित[30] भेदवादी[31]. ॥ ८२
जैयां[32] बोलती ऐक्य जीवां घडेना, तयां जीव तो पूसतां[33] सांपडेना ।

---

१. आरब्धभोगाचे ठिकाणीं. २. भोगीं भेद आढळतो असें. ३. सुखदुःखस्वरूपी. हे भोगी शब्दाचें विशेषण. ४. अद्वैत न हें. 'जीवपणें निराळीं' आहेत आणि 'तीं वेगळीं (भिन्न भिन्न) प्रगटती [अध्याय ४ श्लो० ६ पहा]. हें जीवस्वरूपांत अद्वैत नाहीं असें. ५. स्पष्ट, उघड. ६. याच ग्रंथांत. (कर्मतत्वांत.) ७. चौथ्या अध्यायांत. ८. अद्वैतानुभव 'द्वैतही घडेना तें' द्वैत खरें नाहीं ही गोष्ट. ९. पाहावें, अनुभव घ्यावा. १०. आत्मानुभवाच्या योगानें. ११. शुद्धसत्वानुभवी असा जो त्यानें, 'बिंबात्मता अनुभवीं स्थिरता जयासी' [अध्याय ४श्लो० १९ पाद १ पहा.] १२. वेदांत, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें यांनीं प्रतिपादिलेलें. १३. सर्वांचा जीव एकच असें मत. १४. नाहीं. वेदांताश्रित नव्हे—असा संबंध. १५. सर्वथैव, पूर्णपणें कांहीं अंशीं ऐक्य आहेच (श्लो० ७४), पण कांहीं अंशीं भेदही आहे (श्लोक ७७)—असा अर्थ. १६. वेदांतमताखेरीज इतर बहुमतीं. या मतामध्यें आत्मता भेदीं बोलती—असा अन्वय. १७. या अध्यायांत. १८. त्या बहुतांनीं मानिलेल्या आत्मतेची. या प्रकरणाच्या पांचव्या अध्यायांत साधारणपणें वेदांतमतानुरूप आत्म्याविषयीं विवरण केलें आहे. यासंबंधानें इतर वैदिक मतवाद्यांचे दोन प्रश्न आहेतः—(१) जीवात्मा आणि परमात्मा यांचें ऐक्य श्रुतिसंमत आहे काय? (२) जीवमत जर सर्वथैव वेदांताश्रित नाहीं तर जीवात्मा सूक्ष्म, सदा शाश्वत आणि नित्य आहे की नाहीं? पहिल्या प्रश्नाचा निकाल या सहाव्या अध्यायांत केला आहे. आणि दुसऱ्या प्रश्नाचा विचार पुढील अध्यायांत केला आहे. अशी या श्लोकांत पंडितांनीं सूचना दिली आहे. १९. इतर वैदिकांचें मत. इतरांनीं वर्णिलेलें आत्मत्व. २०. ग्रंथकर्ता श्रीभगवान् कृष्ण. [अध्याय १ श्लोक ५।६ पहा.] २१. पुढील अध्यायांत. २२. मिथ्या, असत्य. २३. भिन्नभिन्न आत्मा मानणारे. २४. व्यर्थ. २५. जीव+ईश+भेद=जीव आणि ईश यांत भेद आहे असें. २६. जीवस्वरूपाचा धर्म व ईश्वरस्वरूपाचा धर्म भिन्न असल्यामुळें. २७. धर्म. २८. उपाधीच्या योगानें प्राप्त होणारे गुण. अर्थात् ते गुण स्वरूपाला नाहींत. २९. अद्वैतपर. ३०. निर्दोष, सत्य. हें अर्थाचें विशेषण. ३१. मध्वादि. ३२. ज्यांला, 'जीवां ऐक्य घडेना'

अहंप्रत्यया बोलती आत्मता हे, अहंवृत्ति त्या केवळातें न साहे. ॥ ८३

स्वयें जीव होऊनि तो जीव कैसा? असें पूसतां सांगवेनाच तैसा ।
अहंप्रत्ययालागिं तो आकळेना, अहंप्रत्ययेंवीण यांला कळेना. ॥ ८४

स्वयें भ्रांत आत्मत्व ज्याला कळेना, म्हणोनीच वेदार्थही आकळेना ।
स्वयें भ्रांत होऊनिही भेदवादी, अहो मोडिती ऐक्य जें स्पष्ट वेदीं. ॥ ८५

प्रामाणिकार्थअवलंबित एक गोष्टी, आहे तथापि न पडेचि तयासि दृष्टी ।
ऐसें तथापि निजतत्व तया कळेना, आचार्यवर्यकरुणेविण आकळेना. ॥ ८६

अहंस्फूर्ति आत्मा नव्हे हा तथापी, स्फुरे तो अहंप्रत्ययो चित्स्वरूपीं ।
तयालागिं आत्मत्व बोलाल जेव्हां, नव्हे तो असें बोलवेनाच तेव्हां. ॥ ८७

प्रतिकूळ परंतु तो तुम्हांला, नकळूनी जरि बोलतां तयाला ।
अहमीश अनीश दोनि जेथें, उरती कैंवि विरुद्धधर्म तेथें. ॥ ८८

नव्हे अहंप्रत्ययरूप जेव्हां, अनीश ईशत्व उपाधि तेव्हां ।
आहे अहंप्रत्यय भिन्न जेथें, अनीश ईशत्वहि भिन्न तेथें. ॥ ८९

---

असें जे म्हणती त्यांला. ३३. विचारितां. 'तो जीव कसा' असा प्रश्न केला असतां. ३४. मिळत नाहीं. समाधानकारक उत्तर मिळत नाहीं.

१. सांगतात. 'अहंप्रत्यय हाच आत्मा' असें बोलती. २. भेदवादी. ३. शुद्ध आत्मत्वातें. ४. असत नाहीं, संभवत नाहीं. शुद्ध आत्मत्वाला मुळीं वृत्तीच नाहीं असा अनुभव येतो—असा अर्थ. ५. असून. 'तुम्ही स्वयें जीवरूपी असून' असा अर्थ. ६. जीव. ७. आकलन होत नाहीं, अहंप्रत्ययांत जीवाचा बोध होत नाहीं. ८. अहंप्रत्यय हाच आत्मा त्याला. ९. 'भ्रांत' म्हणण्याचें कारण श्लोक ८३।८४ यांत सांगितलें आहे. १०. वेदांताचा (उपनिषदांचा) प्रामाणिक (सत्य, खरा) जो अर्थ त्याचा अवलंब (आश्रय) आहे जिला. ११. या गोष्टीचा उल्लेख श्लोक ८७ यांत केला आहे. १२. याचें लक्षण श्लोक ८७ त दिलें आहे. १३. शुद्ध आत्मतत्व. १४. गुरुश्रेष्ठाच्या कृपेशिवाय. 'गुरू जो न सर्वत्र आत्मत्व दावी । गुरुत्वाचि सीमा कसी ते वदावी? ॥ ५३ ॥ [चरमगुरुमंजरी.] १५. चित्स्वरूपाला, ज्या चित्स्वरूपाचे ठायीं अहंप्रत्यय स्फुरे त्या चित्स्वरूपाला. १६. नाहीं. तें चित्स्वरूप हा आत्मा नव्हे असें म्हणतां येत नाहीं. १७. या श्लोकाचा अन्वय व अर्थ असा:—न कळुनी (अज्ञानानें) जरी तयाला (आत्म्याला) 'अहं' असें तुम्ही बोलता आणि आपलें अज्ञान दाखविता परंतु तो (चित्स्वरूपी आत्मा) तुम्हाला प्रतिकूळ [आहे] त्याचें खरें स्वरूप तुम्हाला कबूल नाहीं जेथें अहमीश आणि अनीश [हे] दोन्ही [धर्म] न (नाहीत) कारण तेथें परस्परविरुद्ध धर्म कैंवि उरती? एकत्र कसे राहतील?. १८. या श्लोकाचा भावार्थ:—अहंप्रत्यय हा रूप (आत्मस्वरूप) नव्हे, तेव्हां अनीशत्व आणि ईशत्व हा रूपभेद नव्हे, उपाधिभेद आहे हें उघड आहे. कारण जेथें अहंप्रत्यय भिन्न आहे, तेथेंच (उपाधीचे ठिकाणीं) भिन्न अनीशत्व आणि ईशत्वही असणार.

तथापि आत्मत्व[1] न शुद्ध तेहीं, जैसें सुषुप्तींत दिसे न कांहीं ।
यालागीं कोणासहि तें कळेना, जें श्रीगुरूवांचुनि आकळेना. ॥ ९०
विरुद्धधर्में[2] श्रुति[3] मोडितां हा, होतो महादोष[4] तुम्हांसि पाहा ।
अगम्य वेदार्थ तुम्हां कळेना, जो श्रीगुरूवांचुनि आकळेना. ॥ ९१
म्हणाल वेदांतचि भेदें[5] आहे, श्रुतीस त्या ऐक्यहि[6] हें न[7] साहे ।
हें बोलणेंही तुमचें घडेना, श्रुतीमधें द्वैतचि सांपडेना. ॥[8] ९२
जीवत्व ईशत्व उपाधिभेदें, निरूपिलींही[9] असतील वेदें ।
गीतादिशास्त्रांतहि येचरीती, तुम्हांसि तीं साधनरूप होती. ॥ ९३
तुम्हीं '[10]द्वासुपर्णा'[11] श्रुती द्वैतरूपें, पहातां तुम्हां द्वैत वाटे स्वरूपें ।

---

१. जीवस्वरूपी, प्रतिबिंबरूप. यथार्थदीपिका--अध्याय ३ श्लोक ४२ वरील टीकेंत पंचविसावें तत्व प्रतिबिंब असें म्हटलें आहे कारण सव्विसावें तत्व बिंब तें मात्र शुद्ध आत्मत्व होय--असा अर्थ. [यथार्थदीपिका--अध्याय २ ओंवी ४७० पहा]. २. श्रुतींस जो धर्म संमत नाहीं त्या धर्माचें आचरण करून. द्वैत हें श्रुतीस संमत नाहीं. ३.'प्रज्ञानं ब्रह्म' 'अहं ब्रह्मास्मि' 'तत्वमसि' 'अयमात्मा ब्रह्म' 'एतदात्म्यमिदं सर्वं' 'तत् सत्यं' 'स आत्मा' 'तत् केन कं पश्येत' इत्यादि श्रुति. ज्या स्पष्टपणें आत्म्याचें ऐक्य दर्शवितात त्या आणि 'सर्वं खल्विदं ब्रह्म' 'नेह नानास्ति किंचन' इत्यादि श्रुति. ४. महत्पाप. श्रुति अमान्य केल्यानें वेदधर्मी मनुष्यास मोठें पाप लागतें. तसेंच द्वैतबुद्धीनें ईश्वरसेवा घडत नाहीं. [ब्रह्मस्तुति--चरण १ श्लोक १३२, १३५ व १३७ पहा.] ५. जीवात्मा व परमात्मा यांत भेद. ६. जीवेश्वराचा अभेद. ७. मान्य नाहीं. ८. यथार्थदीपिका--अध्याय १५ ओंव्या १०६६-१०७१ पहा. ९. उपाधिभेदानुरूप. १०. सांगितली. ११. एदील उताऱ्यानें या श्लोकाचा चांगला खुलासा होईल:---शेवटीं 'द्वासुपर्णा श्रुती'। हें प्रमाण दाखविती। तरी तेही श्रुति येच रीती। दोहींस भेद बोलेना ॥ ७२ ॥ ॥ श्रुति ॥ **द्वासुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्न्यो अभिचाकशीति** ॥ श्रुत्यर्थ ॥ प्रपंचपिंपळावरी दोनी। पक्षी जीव ईश्वर म्हणोनी। एक भोक्ता एक प्रकाशक न भोगुनी। अर्थ ऐसा श्रुतीचा ॥ ७३ ॥ तरी जीव ईश्वर दोनी। एक ब्रह्म जालें म्हणोनी। दोघे सुपर्ण नांवें ठेवुनी। श्रुति वदे ॥ ७४ ॥ दोहींस अन्योन्यभेद। हें तों म्हणेना कोठें वेद। जेथें तेथें अभेद। ज्या दोघांस ते हे दोघे ॥ ७५ ॥ आतां दोघांत अन्य भोक्ता। आणि दोघांत अभोक्ता। भोगबद्धा अभोगमुक्ता। श्रुति म्हणे ॥ ७६ ॥ त्या अन्य शब्देंकरूनी। नाचती भेद साधिला म्हणोनी। परी पुसतांच जातो उडोनी। भेद हा ॥ ७७ ॥ श्रुति म्हणे 'तयोरन्यः'। म्हणिजे त्या दोघांत अन्य। पुन्हा म्हणे अशन न करी अन्य। दोघांचमध्यें ॥ ७८ ॥ दोघांत अन्य म्हणतां। तिसरा जाला तत्वतां। तो कोण हो म्हणूनि पुसतां। तिसरा नाहीं ॥ ७९ ॥ मग म्हणति दोघांत। अन्य म्हणिजे एक दोघां तयांत। परि तो अन्य तरी वेदवाक्यांत। दोघांत जो एक तो अन्य हें नाहीं ॥ १०८० ॥ अन्य शब्दाचा अर्थ। एक म्हणूनि जाला आतां व्यर्थ। भिन्नत्वें बोलतां अनर्थ। सिद्ध झाले ते

तयां द्वासुपर्णासही भेद ऐसे, नसोनी अहो! मानितां भेद कैसे? ॥ ९४

द्वैतें श्रुती द्विवचनें जरि मानितां हां, श्रीरामकृष्ण म्हणतां द्वय कां न पाहा? ।
वेद प्रमाणचि जसें अवतारऐक्यें, श्रुत्युक्त ऐक्य बहु तत्वमसीतिवाक्यें. ॥ ९५

तयोरन्यथा अन्यशब्दासि भेदीं, तुम्हीं मानुनी दावितां द्वैत वेदी ।
तयोरन्य दोवांत त्या ऐक्य ऐसा, असोनी तुम्हीं मानितां भेद कैसा? ॥ ९६

तयोरन्य एथें तयोभेद ऐसा, तुम्हीं बोलतां अर्थ होईल कैसा? ।
तयां दोमधें भेद तो पिप्पलातें, जई भक्षितो इष्ट आम्हांसि हो तें. ॥ ९७

---

रीती ॥ ८१ ॥ एवं दोघांत अन्य ये रीती । दोघांत एक भोक्ता म्हणे श्रुती । पुन्हा दोवांत अन्य अभोक्ता म्हणतां तेचि म्हणती । अन्य म्हणिजे अभोक्ता एक ॥८२॥ तेव्हां एक म्हणावें जेथें । अन्य म्हणे श्रुति तेथें । आतां अन्यपण येथें । अन्य शब्दें केंवि घडे ॥ ८३ ॥ आतां दोघांचें लक्षण । भोक्तेपण अभोक्तेपण । ऐसे दोघे विलक्षण । म्हणूनि भेद काढिती कोरूनी ॥ ८४ ॥ तरी कृष्ण गोपीमनमोहन । स्त्री दुसरी न भोगी रघुनंदन । आणि दोघेही एकचि जगज्जीवन । वैकुंठपती ॥ ८५ ॥ जीवेश्वरांचें एकपण । आणि विरुद्ध लक्षण । एकास विषयभक्षण । एक अभोक्ता ॥ ८६ ॥ एवं च जरी श्रुती । दोघे वेगळे म्हणती । तरी त्या मताची गणती । होती प्रामाणिकांत ॥ ८७ ॥ आतां दोनी म्हणोनी । 'द्वासुपर्णा' या श्रुतीच्या पदें करूनी । येथें भेदेमिठी घालुनी । दोनी तेव्हां द्वैत म्हणती निश्चित ॥ ८८ ॥ मिठी पडे प्राण जातां । ते न सुटे सोडवितां । तैसें त्यांचें मत मरतां । मिठी घाली द्विवचनीं ॥ ८९ ॥ तरी 'वासिष्ठयादवकृष्णौ' या द्विवचनीं । त्यांच्याच मुखींच्या वचनीं । वसिष्ठवंश यदुवंश दोनी । एक व्यास एक श्रीकृष्ण हे दोघे ॥ १०९० ॥ तैसे दोनि सुपर्ण । जैसे दोघे कृष्ण । व्यासास कृष्णास एकपण । अत्यंत संमत हें तयांसही ॥ ९१ ॥ दोनी सुपर्ण म्हणतां भेद । तेचि दोनी कृष्ण म्हणतां कां हो अभेद । जैसें द्विवचन येथें बोलतो वेद । तैसेंचि द्विवचन श्लोकीं तुमचिया ॥ ९२ ॥ वासिष्ठ कृष्ण द्वैपायन व्यास । आणि यादव कृष्ण या दोघांस । वेदीं पुराणीं अभेद म्हणतील तरी दों सुपर्णांस । अभेद सर्वत्र वेदीं पुराणीं ॥ ९३ ॥ जीवेश्वरांस भेद । वेद एकवचन बोलता वेद । तरी आपलें मत अप्रमाण हा खेद । तुम्हां न होता ॥ ९४ ॥ मग सत्य आत्मा जीव सत्य । सत्य भेद ऐसें अगत्य । वृथा कल्पूनि कां असत्य । हे श्रुति म्हणोनि बोलणें लागतें तुम्हांला ॥९५॥ एवं च 'द्वासुपर्णा' श्रुती । जरी दोवांस भेद म्हणती । तरी प्रामाणिकांत गणती । तुमचीही संत मानिते ॥९६॥ ऐसेंच जीवत्व ईश्वरत्व । सहज बोलतां भेदत्व । म्हणोनि म्हणती हें पाखंडत्व । प्रगट करिती आपलें. ॥९७॥ [यथार्थदीपिका—अध्याय १५]

१. दोन पक्ष्यांसही. २. भेद आहे असें त्या श्रुतींत सांगितलें नसतां. ३. या शब्दाचा संबंध 'मानितां' या क्रियेशीं आहे. ४. 'द्वासुपर्णा' या श्रुतींतील द्विवचनामुळें. ५. द्वैतभेद. ६. श्रुतीस मान्य. ७. अभेद, जीव ईश्वर यांचें ऐक्य. ८. हें 'ऐक्य' शब्दाचें विशेषण. ९. 'तत्त्वमसि' या वाक्याकडे लक्ष्य देऊन 'द्विवचनीं' शब्दाचा अर्थ केला तर ऐक्यच सिद्ध होतें— असा अर्थ. १०. कर्मफलातें.

तया दोंमध्यें भेद होतो उपाधी, तया भेद तो आमुचा पक्ष साधी ।
तया भेदप्रयोगेंचि श्रीकृष्ण याला, उपाधीविणें ऐक्य बिंबी जयाला. ॥ ९८

अशनअनशनत्वें भेद बोलाल जेव्हां,
तरि हरिअवतारीं व्या विरुद्धार्थ तेव्हां ।
अजपरवधुजारी एक लीलावतारी,
बहुविध विपरीतेंही न कां त्या प्रकारीं. ॥ ९९

निष्ठा तुम्हांला बहुसाल भेदीं, तो वाटतो याकारितांचि वेदीं ।
घटादिनामें व्यवहार जेव्हां, न बोलती मृन्मय तत्व तेव्हां. ॥ १००
दह्याचें, दुधाचें, जलाचें, घृताचें, असें बोलतां पात्रएकत्व कैचें? ।
असा कोटिशब्दें जरी भेद वाटे, असा भेद शब्दैकमात्रेंचि तुटे. ॥ १०१
घटादीक हें सर्वही एक माती, अशा ऐक्यशब्देंचि ते भेद जाती ।
तसें सर्वही ब्रह्म इत्यादि शब्दीं, उडे भेद तो साधिला कोटिशब्दीं.॥ १०२
असे वेद जे बोलती भेद नाना, तयांमाजि तो तत्व कांहीं असेना ।
असे तत्व थोंलागिं तत्वोपदेशें, श्रुती बोलती तत्वमस्यादिलेशें. ॥ १०३
चिदैक्यें तें तत्वमसीतिवाक्यें, 'सर्वं खलु ब्रह्म' अचेतनैक्यें ।

---

१. 'द्वा सुपर्णा' या श्रुतीनें भेदच दाखविला आहे असें समजण्यास तीन कारणें आहेत:—(१) द्विवचनप्रयोग याचें खंडन श्लो० ९५ यांत केलें आहे. [यथार्थदीपिका—अध्याय १५ ओंव्या १०८८-१०९२ पहा]. (२) 'अन्य' या शब्दावरून होणारा बोध. याचें खंडन श्लोक ९६ व ९७ पूर्वार्ध यांत केलें आहे. [यथार्थदीपिका—अध्याय १५ ओंव्या १०७८-१०८२ पहा]. (३) एक भोक्ता व एक अभोक्ता. याचें खंडन श्लोक ९९ यांत केलें आहे. [यथार्थदीपिका—अध्याय १५ ओंव्या १०८४-१०८७ पहा]. २. गोकुळांतील स्त्रियांशीं व्यभिचार करणारा. ३. अलंत. हें 'निष्ठा' शब्दाचें विशेषण. ४. भेद. ५. वेदांत. वेदांनींही भेदच सांगितला आहे असें तुम्हाला वाटतें—असा अर्थ. ६. सर्व घट मृन्मय (मातीचे) आहेत असें तत्व. ७. कोट्यावधि शब्दांनी. दह्याचें पात्र, दुधाचें पात्र, जलाचें पात्र, घृताचें पात्र असे अनेक शब्द हंडी, घरवी, घागर इत्यादि व्यवहारांत येतात त्यांच्या योगानें. ८. एका शब्दानें. तीं पात्रें मृन्मय किंवा धातुमय आहेत हें एकदां सांगितल्यानें. ९. जातो, उडतो. १०. कोट्यावधि शब्दें प्रबल करून भेद सिद्ध केला तथापि. ११. येथें, या श्रुतींत मात्र तत्वोपदेशें (तत्वोपदेश करण्याच्या उद्देशानेंच) लेशें (लेशमात्र) तत्वमस्यादि जें श्रुति बोलती तेथें मात्र तत्व असें. सर्वच श्रुति तत्वबोधक नाहींत—असा अर्थ. १२. अभेद दोन प्रकारचा आहे:—(१) चैतन्यस्वरूपांत भेद नाहीं. याला येथें 'चिदैक्य' म्हटलें आहे. (२) अचैतन्य म्हणजे चैतन्य व जड यांत भेद नाहीं. याला येथें अचेतनैक्य म्हटलें आहे. पहिला अभेद 'तत्वमसि' या

अद्वैत ऐसे उपदेश वेदीं, न दीसती हे उपदेश [1]भेदीं. ॥ १०४
'सत्यं [2]भिदा' म्हणुनि यास्तव [3]कल्पियेल्या, वेदश्रुती तुम्हि तथापिहि त्या [4]उडाल्या
प्रत्यक्ष जें दिसतसे उपदेश [5]त्याला, कां हो! [6]वृथा करुनि कष्टति वेद बोला?॥ १०५
[7]यांही [8]प्रमाणीं श्रुति [9]मानितांहा, तरी श्रुती त्या [10]पुढिल्याहि पाहा।
'[11]सत्यं भिदा' बोलति तेचि दोषी, पुढें श्रुती बोलति वाक्यलेशीं. ॥ १०६
भेदोपदेशीं[12] निगमीं [13]सहसा घडेना, सत्यं भिदादि निगमीं श्रुति सांपडेना।
[14]जीवेशलोकरचनादिक भेद वेदीं, भासे प्रमाण [15]तरि हें न [16]घडेचि भेदीं. १०७
डेरे रांझण घागरी म्हणुनि हीं नांवें स्वरूपें जसीं,
[17]नानायज्ञकलाप लोकरचना वेदामध्येंही तसी।
पात्रांचा विनियो[18]गकर्म [19]इतुक्या भेदासही [20]बाधि [21]तो,
'हे माती अवघी' म्हणोनि [22]वदनीं हा शब्द जो [23]ऊठतो. ॥ १०८
असा भेदही बोलतो वेद जेथें, तुम्हीं भेद तो मानितां [24]तत्व तेथें।

---

श्रुतीनें व दुसरा 'सर्वं खल्विदं ब्रह्म' या श्रुतीनें उपदेशिला आहे. असें या श्लोकांत सांगि[तलें] आहे. [यथार्थदीपिका–अ० १३ ओंव्या २२७-२३० पहा.]

१. भेदाविषयी, भेदप्रवर्तक, भेद उपदेश करणारे. २. ही श्रुति भेदवादी दाखवितात आ[णि] म्हणतात कीं 'तत्वमसि' ही श्रुति तत्वबोधक समजून 'द्वा सुपर्णा' ह्या श्रुतीचा अर्थ अभेदद[र्शक] करावयाचा असें वेदांतवादी म्हणतात. तें सत्य नसून 'सत्यं भिदा' ही श्रुति तत्वबोधक समज[ून] तत्वमस्यादि श्रुतीचा अर्थ 'भेदच सत्य' असा करावा. या 'सत्यं भिदा' श्रुतीसंबंधानें आप[लें] काय म्हणणें आहे हें पंडितांनीं श्लो० १०५, १०६, १०७ यांत सांगितलें आहे. ३. अ[शा] श्रुतिवचन नसतां कल्पून लिहिल्या. [यथार्थदीपिका–अ० १८ ओंव्या १४८०-१४८१, अ[०] १५ ओंव्या १०६७-१०६८ व १०९४-१०९५ पहा.] ४. प्रमाण ठरल्या नाहींत. ५. प्रत्य[क्ष] दिसणारे गोष्टीला, प्रत्यक्ष दिसणारी गोष्टच लोकांला सांगण्याचा प्रयत्न करून. ६. व्यर्थ कारणाशिवाय. ७. 'सत्यं भिदा' इत्यादि तुम्ही कल्पिलेल्या श्रुती. ८. प्रमाणभूत. ९. मा[]निती आहां, जर मान्य करितां. १०. त्या इतर श्रुति जगांत प्रसिद्ध आहेत त्याही. ११. भे[]दच सत्य असें जे म्हणतात तेच दोषी होत, असें पुढें (प्रत्यक्ष) वाक्यलेशीं (थोडक्यांत) श्रु[ती] बोलती (श्रुति सांगतात)—असा अर्थ. १२. भेदच सत्य असा उपदेश. १३. कधींही. १४. जी[]वत्व आणि ईशत्व असा भेद, लोकरचना (व्यवहार) संबंधीं शब्दरचनेवरून भासणारा भे[द] 'भासे' या क्रियापदाचा कर्ता. १५. जीवेशलोकरचनादि भेद. १६. हें प्रमाण भेदीं न घडेचि[=] हें प्रमाण भेद सिद्ध करीत नाहीं. १७. अनेक यज्ञांचा समूह. १८. योजना, उपयोग. १९. [] सगळ्या, या श्लोकापर्यंत सांगितलेल्या. २०. बाध आणितो, असत्य ठरवितो. २१. 'हे अव[घी] माती' असा शब्द तो. २२. तोंडांतून. २३. उत्पन्न होतो, निघतो. २४. तत्वतः सत्य.

[1]वेदे ऐक्य तो अर्थ मोडोनि वेदीं, [2]घडेना तरी योजिती अर्थ भेदीं.॥१०९
[3]जगत्सत्यजीवेश्वरा भिन्न जेथें, किमर्थ श्रुती पाहिजेतील तेथें ।
अशा दूषणें ग्रंथ वाढेल भारी, म्हणोनी न बोलेचि येथें [4]मुरारी. ॥ ११०
[5]हरीनेंचि या संस्कृतीं ग्रंथ केले, असे दोष हे ते स्थळीं बोलियेले ।
महाराष्ट्रभाषेंत या वेदरीती, बहु बोलतां श्रोतयां वीट येती. ॥ १११
दर्पटिजे [6]खलनासिक जेधवां, पसरितो मुख दुर्जन तेधवां, ।
[9]वदति [10]शश्वदनेकचिदात्मता, न वदवे पुसतां [11]दृढ तत्वता. ॥ ११२
[12]जीवेश्वराभेद [13]विरुद्धधर्में, हें बोलती जे नकळोनि [14]वर्में, ।
[15]ज्यांच्या बळें मोडिति जे [16]श्रुतीला, ते [17]व्यर्थ हा निर्णय येथ झाला.॥११३
कर्मे प्रशंसादि निमित्त वेदीं, जो भासतो भेद [18]अतत्ववादीं ।
प्रमाण तें मानुनि तत्व जेथें, श्रुतीमधें मोडिति अर्थ तेथें. ॥ ११४

---

१. तत्वतः ऐक्य असें जें वेद म्हणे. २. भेद सत्य असा जरी अर्थ होत नाही. ३. जगत्+सत्य+जीव+ईश्वर+भिन्न=जगत् आणि सत्य (शाश्वत नित्य) असा जीव हीं दोन्ही आहेत, ईश्वरापासून भिन्न असा प्रत्यक्ष देखावा दिसत आहे. ४. ग्रंथकर्ता भगवान् श्रीकृष्ण. ५. श्रुतिकल्पलता व संस्कृत कर्मतत्व या ग्रंथांस हें म्हणणें उद्देशून असल्यास नकळे. वरील दोन ग्रंथ पंडितांनीं लिहिले आहेत पण ते उपलब्ध नाहींत. 'श्रुतिसार' या नांवाचा एक संस्कृत ग्रंथ असून त्यांत द्वैतमतखंडन केलें आहे असें पंडितच म्हणतात. [समश्लोकी भगवद्गीता–टीका–अध्याय १२ श्लोक ८४.] कर्मतत्व प्राकृत व संस्कृत अशा दोन भाषेंत केलें त्याप्रमाणेंच त्यांनीं संस्कृत निगमसारही केला असावा. व तो ग्रंथ एका गृहस्थानें नजरेनें पाहिल्याचेंही कळतें. संस्कृत निगमसार आणि श्रुतिसार हे दोन ग्रंथ नसून एक असावा, असें वाटतें. ६. दाबलें असतां. ७. दुष्टाचें नाक. ८. 'नाक धरलें म्हणजे तोंड उघडतें' ही म्हण प्रसिद्धच आहे. ९. भेदवादी वदती–असा अर्थ. १०. शश्वत्+अनेक+चित्+आत्मता=निरंतर चैतन्यरूप आत्म्याशीं ऐक्य. ११. जोरानें, दृढ. ठासून प्रश्न केला असतां त्याच्याकडून मात्र खात्रीलायक उत्तर मिळत नाहीं–असा अर्थ. १२. जीव आणि ईश्वर यांत भेद आहे असें. १३. जीव व ईश यांचे धर्म भिन्न आहेत म्हणून. १४. खरें तत्व, खरीं कारणें. १५. विरुद्ध धर्मांमुळें. १६. धर्म. १७. ते धर्म उपाधिभेद दाखवितात. जीवात्मा व ईश्वर यांत भेद आहे असें त्यावरून होत नाहीं म्हणून व्यर्थ. १८. श्रुतीचे दोन प्रकार आहेतः–(१) अतत्ववादी म्हणजे ज्या कर्मप्रशंसादि करण्यास प्रवृत्त झाल्या आहेत त्या श्रुतींमध्यें भेद भासतो. हा अर्थ श्लोक १०८ याच्या पहिल्या तीन चरणांत दाखविला आहे. (२) तत्ववादी म्हणजे तत्वमसि इत्यादि ज्या खरें तत्व सांगतात त्या या दुसऱ्या प्रकारच्या श्रुती तत्वज्ञानाविषयीं मुख्य असून त्या पहिल्या प्रकारच्या श्रुतींच्या अर्थाचा संकोच करितात असें श्लोक १०८ याच्या चौथ्या चरणांत सांगितलें आहे. 'अतत्ववादी' हें 'वेदीं' याचें विशेषण.

अगस्त्यता भेद जीवेश्वरातें, श्रुतींवांचुनीही कळे जें जनातें ।
श्रुती बोलती तत्वता तेंचि जेव्हां, प्रमाणत्व त्याचेंचि थोरे न तेव्हां.॥ ११५

असा वेदतत्वार्थ त्यांला कळेना, विना ऐक्यसिद्धांत हा आकळेना ।
म्हणोनीच अध्याय हा वासुदेवें, असे निर्मिला 'वेदतत्वा'ख्य नामें.॥ ११६

न ऐक्यें घडे एकजीवत्व जैसें, न भेदें अनेकत्व जीवासि तैसें ।
असा उत्तराध्याय आरंभताहे, कळे ज्यास तो ब्रह्म होऊनि राहे. ॥ ११७

---

## अध्याय सातवा.

### जीवतत्व.

वेदांताविण बाह्यवैदिकमतें जीवात्मता त्या मती
सूक्ष्माहूनिहि सूक्ष्म शाश्वत सदा निर्त्यत्व ही मानिती ।

---

१. श्लोक ११० पूर्वार्ध याच अर्थाचा द्योतक आहे. २. ठरे न, ठरत नाहीं. ३. अद्वैत-बोधक. ४. वेदाचा खरा अर्थ. ५. भेदवाधास. ६. हा अध्याय निर्मिल्यावांचून–असा अर्थ. ७. कृष्णानें. ग्रंथकर्ता श्रीकृष्ण होय असें पंडितांनी पहिल्या अध्यायाच्या ५।६ श्लोकांत सांगितलें आहे. ८. अद्वैतसिद्धांतानुरूप. ९. सिद्ध होत नाहीं. १०. एकजीवत्व कसें नाहीं याविषयी या अध्यायाच्या ८० व्या श्लोकांत सांगितलें आहे. ११. जीवास अनेकत्व कसें नाहीं याविषयीं या अध्यायाच्या ६९-७६ श्लोकांत सांगितलें आहे. १२. आरंभीत आहे, सुरू करीत आहे. १३. वेदांत ज्यांस वेदांतसूत्रें किंवा ब्रह्मसूत्रें असें म्हणतात त्यांनीं प्रतिपादित जें अद्वैतमत तें वेदांतमत. या मताचा प्रसार श्रीमच्छंकराचार्यांनी केला यास्तव त्यास शांकरमतप्रसार असेंही म्हणतात. त्या मताविण बाह्य (इतर वेदांतमतविरुद्ध जीं–अद्वैततत्व ज्यांस मान्य नाहीं तीं) वैदिक (वेदांनीं सांगितलेलें सत्य मानणारीं) मतें (मध्व, रामानुज यांनीं ज्या मतांचा प्रसार केला तीं मतें) श्लोक ४१ यांत म्हटलेलीं भेदाश्रितमतें. १४. त्यांच्या मती, त्या वैदिक मतांच्या मती. 'मती' हा कर्ता, 'जीवात्मा' हें कर्म आणि 'मानिती' हें क्रियापद. १५. अत्यंत लहान, अणुरेणुप्रमाणें. १६. 'देह जन्मतां नसे उपजत । देह वाढतां नसे वाढत । म्हणोनि हा शाश्वत । कीं हृद्धिक्षय असेना ॥ ५३४ ॥' [यथार्थदीपिका–अध्याय २.] १७. सदोदित असणारा. [वामनपंडित–द्वारकाविजय–सर्ग ४ श्लोक ९६ पहा]. १८. मरण नाहीं असा. 'मरण नाहीं वास्तव । कीं हा नित्य''' ॥ ५३३ ॥' [यथार्थदीपिका–अ० २]. १९. जीवात्मा जर शाश्वत आहे असें मानिलें तर या गोष्टीनेंच भेदवादी जें जीवात्म्याचें स्वरूप सांगतात त्यांचें खंडन होतें, जेणेंकरून आपलेंच मतखंडन होतें त्याच गोष्टी हे भेदवादी मानितात असें 'ही' या शब्दानें दर्शविलें. यथार्थदीपिका–अध्याय २, पुढील ओवी पहा:–'आत्मा म्हणतां शाश्वत । मत जें जें भेदाश्रित । तें तें खंडिलें निश्चित । ''' ॥ ५३५ ॥' जीव सूक्ष्म

प्रत्यक्षीं[1] जरि सूक्ष्मता अनुभवीं जीवा न हे[2] बाधिती[3],
स्वप्रामाणिकता[4] मतासि तितुक्या सर्वांसही[5] साधिती[6]. ॥ १
नाना[7] जीवहि मानितां अणुपणें[8] नित्यत्वही[9] आणितां
वृद्धि-र्‍हास[10] नसे तयासि[11] अथवा आहे वदा तत्वता ।
वृद्धि-र्‍हास नसे म्हणाल न घडे तेव्हां अहो नित्यता[12],
वृद्धि-र्‍हास नसे तई[13] अनुभवा[14] येनाचि[15] देहात्मता[16]. ॥ २

---

आहे, त्यास वृद्धिक्षय नाहीं असें म्हटल्यानें नित्यत्वाला बाध येतो—असें विरुद्ध सांगण भेदवादी करितात असा या 'ही' शब्दयोजनेचा भावार्थ. २०. जीवात्मा 'सूक्ष्माहुनि सूक्ष्म' असा आहे असें भेदमतवादी म्हणतात. आणि तो 'शाश्वत' आणि 'नित्य' असा मानितात. शाश्वत आणि नित्य असा आहे हें अद्वैतमतवादीही मानितात. यास प्रमाण:—'अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणः' [भगवद्गीता—अध्याय २ श्लोक २०]. हें आत्मतत्व म्हणजे अध्याय ४।५ यांत सांगितलेलें 'बिंबस्वरूप' होय आणि भेदवादी ज्यास 'जीवात्मा' असें म्हणतात तो अध्याय ६ यांत वर्णिलेली जी अहंप्रत्ययस्फूर्ति त्या स्फूर्तीत असणारें आत्मतत्व ज्यास अध्याय ४।५ यांत 'प्रतिबिंब' म्हटलें आहे—ज्यास अध्याय ६ श्लोक ९० मध्यें 'तथापि आत्मतत्व न शुद्ध तें ही' असें म्हटलें आहे तें जीवत्व होय.

१. 'प्रत्यक्षीं' हें अनुभवाचें विशेषण. प्रत्यक्षीं अनुभवीं=प्रत्यक्ष अनुभवाचे अंतीं. २. ही, भेदमतवाद्यांनीं जीवलक्षण मानिलेली सूक्ष्मता. ३. जरि न बाधिती—असा अन्वय. सूक्ष्मता जर जीवास बाधक नसती; 'सूक्ष्म' हें जीवाचें लक्षण जर सत्य असतें—असा भावार्थ. ४. 'सूक्ष्म' या लक्षणाची सत्यता; 'साधिती' या क्रियापदाचा कर्ता. ५. द्वितीय पादांत वर्णिलेल्या सर्व लक्षणांस. ६. साधक झाली असती. सूक्ष्मता हें जीव-लक्षण खरें ठरेल तर द्वितीय पादांत वर्णिलेलीं लक्षणें सर्वच जीवस्वरूपास साधक होतील. अर्थात्, जीव सूक्ष्म आहे किंवा नाहीं याचा विचार केला म्हणजे झालें आणि तितकाच विचार या अध्यायांत केला आहे. ७. निरनिराळे, अनेक, जितके देह तितके जीव वेगळे. ८. जीव 'अणु' म्हणजे अत्यंत सूक्ष्म आहे असें कल्पून. 'या गोष्टीनें सूक्ष्म थोर। जें जेवढें शरीर। त्यांत आत्मा मातो हा प्रकार। सिद्ध होतो ॥५३८॥' [यथार्थदीपिका—अध्याय २]. ९. मरण न पावणें, देहाबरोबर नाश न पावणें, एक देह सोडून दुसऱ्या देहास जाणें. 'जीव' हा अणुप्रमाणें सूक्ष्म आहे असें मानिल्यानें जीवास 'नित्यत्व' असें म्हणण्यास व्यत्यय येत नाहीं—असें तात्पर्य. १०. विस्तार आणि संकोच पावणें. लहान देहांतून मोठ्या देहांत जीव जात असेल तेव्हां मोठ्या देहाएवढा तो व्हावा आणि तोच जीव मोठ्या देहांतून निघून लहान देहांत जात असेल तेव्हां त्या लहान देहांत समावेश होण्यासाठीं त्यानें लहान होणें. ११. जीवास या अध्यायांत जीवदर्शक 'हा' आणि 'तो' या सर्वनामाचा व त्यांचे रूपांचा उपयोग केला आहे. १२. पहिल्या देहाबरोबर जीव नाश न पावतां त्यानें दुसऱ्या देहांत प्रवेश केला अशा प्रकारची नित्यता. १३. त्यावेळीं, 'वृद्धि-र्‍हास' जीवाला नाहींत असें

मशक[1] तेंचि[2] तिमिंगिळ[3] जेधवां, कसि न वृद्धि तयासिहि तेधवां[4] ।
मशकदेह तिमिंगिळ पावती, उरति ते[5] अणु[6] होउनि मागुती[7]. ॥ ३
न पावे[8] जेंई[9] वृद्धि विस्तीर्ण देहीं[10], नव्हे[11] स्वल्प देहीं[12] जई ऱ्हास कांहीं ।
नव्हे[13] भोगीं[14] अत्यल्प[15] ते जीव जेव्हां, घडे भोग सर्वत्र[16] तो थोर[17] तेव्हां. ॥ ४
व्यापी[18] न हा[19] देह समस्त[20] जेव्हां, गृहांत[21] तैसी[22] तनुमाजि[23] तेव्हां ।
भितीसें[24] स्रक्चंदनभोग[25] होती, याला[26] न ते तों सुख[27]शैत्य[28] देती. ॥ ५
गृहामाजि[29] देहास[30] जों आढळेना, गृहस्थासि शीतोष्णता[31] तों कळेना ।

---

मानिलें तर. १४. प्रलयास. १५. येणार नाहींच, येऊं नये. १३. जीवानें सर्व शरीर व्यापिलें आहे, सर्व देह व्यापून त्यांत जीव आहे ही गोष्ट. ज्या देहांत जीवानें जावें त्या देहाएवढें व्हावें असें झाल्यावांचून जीवाच्या अनुभवास देहात्मता येणार नाहीं. अर्थात् जीवाला वृद्धि आणि ऱ्हास ही आहेत असें मानिलें पाहिजे—असें तात्पर्य.

१. चुरकूट, लहान माशी. २. तेंचि=मशकदेहांत वास करणारे नंतर दुसरा जन्म ज्यास तिमिंगिलाचा प्राप्त झाला ते जीव. ३. तिमि नांवाच्या माशास जो गिळितो तो तिमिंगिल. याची लांबी शतयोजनांपेक्षा जास्त असते. ४. तिमिंगिलाचा जन्म धारण केल्यावर. ५. पूर्वी मशक असून आतां तिमिंगिल झालेले. ६. सूक्ष्म, लहान. ७. मागून, मशकदेह प्राप्त झाल्यावर. ८. पावत नाहीं. वृद्धि न पावे—असा अन्वय. मोठ्या देहांत जर जीव विस्तार पावत नसेल—असा अर्थ. ९. जर. १०. मोठ्या देहामध्यें, तिमिंगिलादि मोठें शरीर धारण करणाऱ्या प्राण्यांच्या देहांत. ११. ऱ्हास नव्हे—असा अन्वय. लहान देहांत जर जीव लहान होत नसेल—असा अर्थ. १२. लहान देहामध्यें, मशकादि लहान शरीर धारण करणाऱ्यांच्या देहांत. १३. होत नाहीं, घडत नाहीं, भोग नव्हे—असा अन्वय. मोठे शरीरांत सर्व शरीर व्यापून जीव नसेल आणि तो अणु असेल तर शरीरास होणारे सुखदुःखभोग जीवास होणार नाहीत—असा अर्थ. हा अर्थ श्लोक ५।६।२०।२१।२२ यांत स्पष्ट केला आहे. १४. देहास होणारे शीतोष्णादि तसेच स्रक्चंदनादि भोग. १५. सूक्ष्माहूनही सूक्ष्म. 'अणु' हें जीवाचें विशेषण. १६. सर्व देह व्यापून राहिलेला असा. १७. मोठा सूक्ष्म नसून देहाएवढा मोठा थोर—असा अर्थ. देह जसा (जेवढा) थोर तितका जीवही थोर असे तेव्हां भोग घडे—असें तात्पर्य. १८. व्यापीत नाहीं, देहास व्यापून जीव असत नाहीं. १९. हा=जीव. २०. हें देहाचें विशेषण. सर्व—सगळा देह. २१. घरांत. २२. घरांत राहणाऱ्या गृहस्थाप्रमाणें. २३. देहामध्यें. २४. घराच्या भितीस. २५. माळा व चंदनाची उटी इत्यादि उपचार. २६. घरांत राहणाराला. २७. स्रक्चंदनादि भोगजनित आनंद. २८. चंदनाच्या लेपानें येणारी शीतळता. २९. घरांत. ३०. घरांत राहणाऱ्या गृहस्थाच्या देहास. ३१. पर्जन्यवृष्टिजनित शीत आणि सूर्यकिरणाची उष्णता.

गृहाऊपरी तापतो सूर्य जेव्हां, गृहीं[1] हा सुखी साउली[2] मानि तेव्हां. ॥ ६
शरीरास शीतोष्णता जेथजेथें, शैरीरी[3] स्वयें[4] भोगितो तेथतेथें ।
[5]कैसें[6] व्यापकत्वासि[7] नाहीं म्हणावें, कडें[8] हातिचें दर्पणीं[9] कां पहावें? ॥ ७
व्यापोनि देह सुखदुःखहि भोगिताहे, त्याला अणुत्व[10] म्हणणें सहसा[11] नसाहे[12] ।
त्याला महत्व म्हणतां मग सर्वदेहीं, तो एक भेद[13] मग जीवपणासि नाहीं. ॥ ८
नसे भेद[14] चैतन्यजीवांसि[15] जेव्हां, नव्हे भोगणें[16] वेगळें त्यासि तेव्हां ।
अणुत्वा महत्वासही हा नसाहे[17], वदा[18] हो! कसा केवढा[19] जीव आहे. ॥ ९
बहू थोर[20] हा मानिजे जीव जेव्हां, घडे[21] ऐकजीवत्वसिद्धांत[22] तेव्हां ।

---

१. गृहस्थ, घरांत राहणारा. २. छाया, सावली. ३. शरीरधारी जीव. ४. स्वतः जीव. ५. यथार्थदीपिका–अध्याय १५ ओंव्या ९२४-९२५ पहा. ६. यथार्थदीपिका–अध्याय १५ ओंव्या ९३१-९३२ पहा. ७. सर्व शरीर व्यापून शरीरांत जीव असतो या गोष्टीस. ८. 'हातच्या कांकणास आरसा नको' अशी जी म्हण प्रचारांत आहे ती या पेळीं पंडितांच्या मनांत घोळत होती असें दिसतें. ९. आरशांत. १०. अति सूक्ष्म, लहान रजःकणासारखा. ११. कधींही, केव्हांही. १२. शोभत नाहीं, योग्य नाहीं, ग्राह्य नाहीं. १३. एका देहांतील जीव वेगळा आणि दुसऱ्या देहांतील जीव वेगळा अशी भिन्नता. १४. वेगळेपणा. १५. चैतन्य आणि जीव यांला. शरीरांत चैतन्य (चेतना शक्ति) वेगळें आणि जीव वेगळा म्हणजे शरीर व्यापून चैतन्य असतें आणि जीव तसा नसतो असा भेद ज्यापेक्षां नाहीं–चैतन्य आणि जीव एकच ज्यापेक्षां आहे–असा अर्थ. चैतन्य जर सर्व देह व्यापून आहे तर जीवही सर्व देह व्यापून आहे–असें तात्पर्य. 'चैतन्यगुणेनैवास्य शरीरव्यापितावगम्यते' [शांकरभाष्य–अध्याय २ पाद ३ सूत्र २८ पहा.] १६. शरीराचे ज्या भागास चेतना आहे; त्या भागास भोग कळतो. तो भोग जीवास घडतो. या गोष्टीनें चैतन्य आणि जीव यांचें ऐक्य सिद्ध होतें–असें तात्पर्य. म्हटलें आहे:–'चंदनें चर्चिलें शव । परी भोग नेणे निर्जीव । जीव असतांही भोग विभव । त्याच देहीं.॥ १०६१ ॥' [यथार्थदीपिका–अध्याय १३.] १७. ग्राह्य नाहीं. अणुत्व किंवा महत्व यांपैकीं एकही लक्षण जीव ग्रहण करीत नाहीं; तें लक्षण जीवस्वरूपास शोभत नाहीं–असा अर्थ. १८. सांगा. १९. जीव केवढा आहे हें सांगतां येण्यासारखें नाहीं–असा तात्पर्यार्थ. म्हणजे त्यास देहाहून मोठा असेंही म्हणतां येत नाहीं. ज्या वेगळ्या वेगळ्या देहांत जीव राहतो ते समान आकाराचे नाहींत. [यथार्थदीपिका–अ० २ ओंव्या ७४४।७४५ व अ०१५ओंव्या९२६-९२८ पहा.] २०. मोठा, एका देहांतच समावेश होत नाहीं असा. २१. घडतो, सिद्ध होतो. सिद्धांत घडे–असा अन्वय. २२. एकाच देहांत एक जीव अशी गोष्ट नसून एकाहून अधिक देहांत मिळून एक जीव असतो–असा सिद्धांत.

असे दूषिला हा कुसिद्धांत पूर्वीं तैसी अल्पता हे घडेनाचि सैवीं. ॥ १०

येथें बहू मांडति भेदवादी, अणुत्व आहे म्हणताति वेदीं ।

कुयुक्तिही आणिति येथ कांहीं, तथापि ते साधक होत नाहीं. ॥ ११

उपाधियोगेंचि अणुत्व वेदीं, तें मानिती सार्थक भेदवादी ।

तये स्थळीं हे श्रुति बोलिजेते, या श्लोकवृत्तें बरि वाचिजे ते. ॥ १२

**'बुद्धेर्गुणेनात्मगुणेन चैव आराग्रमात्रो ह्यवरोऽपि दृष्टः'** ।

या वेदवाक्यें अणुतेसि जेथें, निरूपिला भाव असाचि तेथें. ॥ १३

गुणें बुद्धिच्या आत्मयाच्या गुणेंही, कधीं अल्पही होय अत्यंत देही ।

---

१. खंडन केलें. २. खोटा सिद्धांत, अनृत गोष्ट. ३. पहा जीवस्वरूप अध्याय ४ श्लोक ५ उत्तरार्ध, श्लो० ६-१०, अध्याय ५ श्लोक २४. जीव एक तनू व्यापून असतो, सर्वगत नव्हे. अध्याय ४ श्लोक ३१।४९, अध्याय ५ श्लोक २ पाद २. जीवरूपी चैतन्य सर्वत्र एक नव्हे त्यांत भेद आहे. अध्याय ६ श्लोक ७७-८० यावरून बहु थोर असा जीव आहे म्हणजे एक जीवत्व आहे—हा सिद्धांत दूषिला जातो. ४. त्याप्रमाणें. पूर्वी जें सांगण्यांत आलें त्यावरून जीव 'बहु थोर' हा सिद्धांत जसा दूषिला जातो तसीच त्या सांगण्यावरूनच जीवाचे ठिकाणी अल्पता घडेनाचि जीव सूक्ष्म आहे असें सिद्ध होत नाहीं. जीव सूक्ष्म हा सिद्धांतही दूषिला जातो. ५. जीवाचें सूक्ष्म अणुत्व. ६. सिद्ध होत नाहीं. ७. सर्वांचे ठायीं. जीव अल्पदेहांत असतां अल्प असेल आणि मोठ्या देहांत मोठा असेल. जसा उपाधी असेल तसें त्याचें प्रतिबिंब. सर्वच अल्प असेल असें नाहीं—असा भावार्थ. ८. श्रुतींत. येथें 'आराग्र' इत्यादि श्रुतीवर कटाक्ष दिसतो. [शांकरशारीरभाष्य—अध्याय २ पाद ३ सूत्र २२ श्लो० १३ पहा.] ९. कुयुक्ति. १०. जीव सूक्ष्म आहे अशा सिद्धांतास अनुकूल होत नाहीं. ११. उपाधि जसा लहानमोठा असेल तसें प्रतिबिंब लहानमोठें. जीवाला जें अणुत्व तें उपाधियोगानेंच. १२. तें—प्रथम पादांत वर्णिलेलें अणुत्व. १३. सत्य, अर्थयुक्त. १४. भेदवादी तें सार्थक मानिती—असा अन्वय. १५. श्लोक १३ यांत सांगितलेली. १६. बोलली जाते, सांगण्यांत येते. १७. वाचावी. १८. श्रुति. १९. यथार्थदीपिका—अध्याय १५ ओव्या ९३६-९४२ पहा. २०. सांगितला. २१. हेतु, अर्थ. २२. जीवाला उपाधियोगेंचि अणुत्व—असा भाव. 'बुद्धिगुणसंबंधेनैवाराग्रमात्रतास् । नास्ति न स्वेनैवात्मना' [शंकरशारीरभाष्य—अध्याय २ पाद ३ सूत्र २९]—असा भाव. २३. 'बुद्धेर्गुणे' या श्रुतींत. २४. या श्लोकांत 'बुद्धेर्गुणे' या श्रुतीचा अर्थ सांगितला आहे. २५. अल्पदेह धारण करितो तेव्हां. २६. सूक्ष्म, अणुस्वरूपी. २७. अत्यंत अल्प, फार लहान. २८. देहधारी जीव.

गुणें बुद्धिच्या शुद्धसत्वांत नीरीं, चिदात्मा दिसे चिद्गुणें त्या शरीरीं. ॥ १४
उदक अल्पबहू घट जेवढा प्रतिफळे अवकाशहि तेवढा ।
म्हणुनि अल्प उपाधि घडे जई, तदनुरूप चिदात्मकता तई. ॥ १५
म्हणुनि जीवपणें अतिसूक्ष्मता, जैसि उपाधि तसी प्रतिबिंबता ।
सहज बिंब अनंत असे स्वयें, परि अणू प्रतिबिंबचि विस्मयें. ॥ १६
'**अणोरणीयान्महतो महीयानात्मा गुहायां**' वदंति श्रुती यां ।
अणोरणीयान् प्रतिबिंबरूपें, महत्व चिद्बिंब सुखस्वरूपें. ॥ १७

अणुत्व वदवे कसें न घडतां परिच्छिन्नता,
अणूहुनि अणू जसें न वदवे महापर्वता ।
गिरींद्र अणुमात्र तो अणु जळांत भासे जसा,
उपाधि अणु त्यामधें अणु दिसे चिदात्मा तसा. ॥ १८

---

१. बुद्धिस्वरूपी शुद्धसत्व–उदकांत [अध्याय ४ श्लोक ७ पाद १ पहा]. २. अध्याय ४ श्लोक ५ द्वितीयार्ध पहा. ३. चिच्छक्तीनें. 'आत्मा ब्रह्म निर्गुण । परि चिच्छक्तीन चित्स्फुरण ॥ ९८८ ॥' [यथार्थदीपिका–अध्याय १८] चिद्गुण=मायाशक्ति. ४. बुद्धिरूप उदक. ५. थोडें किंवा पुष्कळ जसें पाणी असेल तसें. ६. ज्या पात्रांतील पाण्यांत प्रतिबिंब पडावयाचें तें पात्र, पाण्याचा घडा, देह हाच घट. ७. लहान किंवा मोठा जसा घट असेल त्याप्रमाणें. ८. प्रतिबिंबित होतो, प्रतिबिंबानें युक्त होतो. [अध्याय ५ श्लोक २३. 'प्रतिफळे' शब्द पहा.] ९. सूक्ष्म, लहान. १०. ज्यांत प्रतिबिंब पडावयाचें तो घट (शरीर) आणि त्यांतील उदक (बुद्धिरूपी शुद्धतत्व). ११. त्या देहाचा आकार जसा लहानमोठा असेल तेवढी. १२ जीवात्मता, जीवाचें स्वरूप. १३ जीवस्वरूपानें. १४ अणूत्व. १५ जेवढी, जशी उपाधीची आकृती असेल तशी. १६ उपाधीची आकृती असेल तेवढी. १७ प्रतिबिंबत्व, प्रतिबिंबपणा. १८ स्वाभाविक. १९. अध्याय ४ श्लोक ५ उत्तरार्ध पहा. २० विश्वात्मक, सर्वव्यापी. २१. परंतु. २२. अभिमानाचे योगानें, मीपणानें. [अध्याय ४ श्लोक १० पाद ३ 'व्यापोनि मीपण असे प्रतिबिंब देही' पहा.] २३. यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंव्या ४३७-४४७ पहा. २४. श्रुति वदति–असा अन्वय. २५. या जीवाला, आत्मस्वरूपाला. २६. यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंवी ४३९ पहा. २७. यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंवी ४४२ पहा. २८. मोठेपण, थोराहूनि थोरपण. [यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंव्या ४५३-४५४ पहा.] २९. मागें अध्याय ४ श्लोक ५ पाद ३ यांत वर्णिलेलें 'सुखस्वरूप' तेंच येथें वर्णिलें आहे आणि अध्याय ४ श्लोक ५ पाद ४ यांत वर्णिलेलें 'जीवपण' येथें पाद ३ यांत वर्णिलें आहे. ३०. या श्लोकाचा अर्थ यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंव्या ४४४-४४६ यांत पहावा. ३१. विभाग करणें. ३२. मोठा पर्वत. ३३. अत्यंत लहान. ३४. थोड्या पाण्यांत. ३५. दिसतो. ३६. लहान, सूक्ष्म. ३७. प्रतिफळे, प्रतिबिंबित होई. ३८. यथार्थदीपिका–अध्याय ८ ओंवी ४५५ पहा.

उपाधिविण तो स्वयें न अणुमात्र आत्मा असे,
विरुद्ध अणुमात्रता अनुभवीं समस्तां दिसे ।
म्हणाल अभिमानुनी तनुसि भोग भोगी जरी,
वदा गृहतनूंतही तदभिमानियाच्या परी. ॥ १९

गृही गृहांमाजि गृहाभिमानी, छांयेंत त्यांचे न तदुष्ण मानी ।
गृहावरी वृष्टि परंतु यांला, लागेल ते वृष्टि किमर्थ बोलों? ॥ २०

देहाभिमानी तरि उष्णशीतें, स्पर्शें कसें हो! सुख दुःख होतें? ।
शीतोष्ण वारूनि गृहांत जैसा, देहांत कां जीव असे न तैसा. ॥ २१

जैसा गृही निजगृहावरि उष्ण वृष्टी, घेऊनि आंत बसतो परि तो न कष्टी, ।
व्यापूनि जीव नसता तरि सर्व गात्रें, दुःखी सुखीहि नव्हता अभिमानमात्रें. ॥

---

१. वेदांतमताचें निरूपण श्लोक १२-१८ यांत केलें आहे. त्याचें तात्पर्य या श्लोकाच्या प्रथम पादांत सांगितलें आहे. आणि प्रत्यक्ष अनुभवानें जीव 'अणु' आहे असें ठरत नाहीं असें श्लोक २-९ यांत सांगितलें आहे. २. स्वतः, उपाधियोग नसेल त्या वेळी. ३. अत्यंत कहान. ४. असत्य, मिथ्या. ५. अणुत्व. ६. अनुभवानें, आम्हा सर्वांस जो अनुभव आहे त्यावरून पाहिलें तर. ७. श्लोक ७ यांतील प्रश्नास उत्तर तुम्ही असें द्याल कीं, 'जीव तनुसि व्यापुनी नाही तथापि तनुसि अभिमानुनी (देहाचा अभिमान जीवाला असल्यामुळें) तो (जीव) भोग भोगितो.' ८. शरीरास अभिमानून, शरीराचा अभिमान धरून, शरीर हाच आपण असें जीवानें मानून—असें तात्पर्य. ९. उष्णशैत्यादि भोग, स्रक्चंदनादि भोग. १०. जरी म्हणाल—असा अन्वय. ११. वदता, बोलता. १२. गृहरूपीशरीरांत, शरीर हेंच घर त्यांत. १३. तत् (तें) गृह (घर, ज्यांत हा राहत आहे) अभिमानी (तें घरच आपण असा अभिमान धारण करणारा जो) याच्या परि (त्या अभिमानी व्यक्तीप्रमाणें)—असा अर्थ. १४. घरांत राहणारा, गृहस्थ, घरधनी. श्लोक १९ उत्तरार्ध यांत ज्या म्हणण्याचा उल्लेख केला आहे त्याचें खंडन श्लोक २०-२३ यांत केलें आहे. १५. घरामध्यें. १६. गृह हेंच आपलें शरीर, गृह हाच आपण—असा अभिमान धरणारा. १७. घराचे छायेंत, छपराखालीं. १८. घराचे. १९. तें उष्ण, घराचे छपरावरील उन्ह. २०. न मानी, मानीत नाहीं, उन्हापासून संताप होत नाहीं—असा अर्थ. २१. पर्जन्य, पाऊस. २२. गृहाभिमान्याला. २३. सांगा. गृहाभिमानी झाला तरी त्याला गृहावरील उष्णता स्पर्श सुद्धां करीत नाहीं—असें तात्पर्य. २४. जीव देहाभिमानी असला तथापि सर्व देह व्यापून नसला तर. २५. उष्णतेच्या आणि थंडीच्या योगानें. २६. स्रक्चंदनादिकांच्या स्पर्शानें. २७. निवारण करून. २८. घरांत. २९. घरांत सुरक्षित असल्याप्रमाणें. ३०. घरवासी, घरधनी. ३१. सूर्याचें उन्ह. ३२. घरांत. ३३. गृही, घरधनी. ३४. कष्टी, उन्हानें किंवा शैत्यानें पीडित. ३५. केवळ देहाभिमानाच्या योगानें.

जैसा गृही गृहतनूवरि उष्ण वृष्टी, घेऊनि आंत नव्हता जरि जीव कष्टी ।
व्यापोनि [1]यांस्तव असे अवघ्या शरीरीं, कैसा गृहीं निजगृहांत [2]अशा प्रकारीं ? ॥

अणुत्व अत्यंत विरुद्ध ऐसें, वेदीं पुराणीं वदतील कैसें ? ।[3]
तथापिही बोलति भेद [4]जेथें, उपाधियोगें प्रतिबिंब [5]तेथें. ॥ २४
वेदीं पुराणीं प्रतिबिंबरूपी, जीवासि या वर्णिति चित्स्वरूपी ।
उपाधियोगें प्रतिबिंब जेव्हां, उपाधिकत्वें अणुरूप तेव्हां. ॥ २५
[7]अणुस्वरूपेंचि करूनि जेव्हां, एकत्र देहांत असेल तेव्हां ।
[8]अन्यत्रही भोग तयासि कैसे ? होतील कां पां न पहाचि ऐसें. ॥ २६
यानंतरें बोलति युक्ति कांहीं, कीं व्यापतो चंदनबिंदु देहीं ।
एकत्र तो बिंदु जसा असोनी, व्यापी तनू [10]शीतळते करोनी. ॥ २७
एकत्र हा जीवहि यांप्रकारें, असोनियां व्यापितसे शरीरें ।
[12]अदीर्घदर्शी [13]कुमताभिमानी, जो आइके तो [14]खरि [15]युक्ति मानी. ॥ २८
जो व्यापितो चंदनबिंदु देहीं, तें शैत्य त्याचा गुणमात्र कांहीं ।
तें नाशतें शैत्यहि अग्नितापें, तो बिंदु अंगीं असतां स्वरूपें. ॥ २९
न शैत्यनाशें जरि बिंदु नासे, [20]सर्वत्र हा भोग वदाल कैसें ? ।
शैत्यासवें बिंदुस नाश ये ना, तेव्हां [21]त्याचा गुण भिन्न [22]माना. ॥ ३०

---

१. पूर्वार्धांत वर्णिलेल्या कारणास्तव. २. शरीरांत जीव असल्याकाणानें, गृही आणि जीव तुल्य नाहीं–असें तात्पर्य. ३. वेदांत आणि पुराणांत. ४. ह्या ठिकाणीं आत्मा 'अणु' असा अर्थ घ्यावयाचा नसून उपाधियोगानुरूप आत्मस्वरूप–असा अर्थ घ्यावयाचा. ५. 'अंश प्रतिबिंबरूप । चित्स्वरूपाचा चित्स्वरूप.' [यथार्थदीपिका–अध्याय १५ ओंव्या ५५६.] ६. यथार्थदीपिका=अध्याय २ ओंव्या ५३७-५४० पहा. ७. देहाचे कोणते तरी भागांत. ८. ज्या भागांत जीवाचें वास्तव्य असेल त्या भागाखेरीज देहाचे दुसरे भागांत, ज्यांत जीवाचें वास्तव्य नाहीं त्या ठिकाणीं. ९. यथार्थदीपिका=अध्याय २ ओंव्या ५४१-५४३ व अध्याय १५ ओंव्या ९५०-९५५ पहा. १०. शीतळते करूनि तो बिंदु तनु व्यापी–असा अन्वय. ११. चंदनबिंदुप्रमाणें. १२. दूरवर नजर न पोचविणारे, अदूरदर्शी. १३. दीर्घदर्शी आहे पण आपलें खोटें मत स्थापन करणारा, आग्रही मनुष्य. १४. खरी मानी–असा अन्वय. १५. चंदनबिंदूचा दृष्टांत. १६. चंदनबिंदूनें होणारी शीतळता. १७. चंदनबिंदूचा. १८. 'अणुमात्र नाहीं' असाही पाठ आढळतो. १९. आरंभीं होता त्याप्रमाणें, शाबूत. [श्लोक ३३ चरण २ पहा.] २०. सगळ्या देहाला. २१. चंदनबिंदूचा. २२. चंदनबिंदु आणि त्यापासून उत्पन्न झालेलें 'शैत्य' हीं भिन्न होत असें माना. चंदनबिंदु देह व्यापीत नसून देह व्यापणारा 'शैत्यगुण' होय–असें तात्पर्य.

देहीं गुण व्यापक चंदनाचा, मानाल तैसा जरि सिद्ध साचा ।
देहीं जई व्यापक गंधबिंदू, शैत्यें तई व्यापक कां न [1]इंदू ? ॥ ३१

[2]दीपप्रभा व्यापक सर्वगेहीं, जैसी तसा व्यापक जीव देहीं ।
[3]यैा व्यापकत्वीं सुख दुःख जेव्हां, न व्यापकातें सुख दुःख तेव्हां. ॥ ३२

पायांत शैत्य न उरे जरि तापताहे, भाळीं यथास्थितचि चंदनबिंदु राहे ।
रौद्रीं जळे वन तयांतिल शैत्य नासे, तेव्हां [6]नभीं न [7]शशिमंडळिं दाह भासे. ॥ ३३

न तापे शिरीं पोळतां पाय [9]बिंदू, न तापे दिशा तापतां पूर्ण [10]इंदू ।
जरी सर्वदेहासि जीव प्रकाशी, न दुःखी सुखी [11]बोलवे [12]एकदेशी. ॥ ३४

न हाले घरीं दीप [13]निर्वातदेशीं, जरी [14]बाह्यवातस्थळींही [15]प्रकाशी ।
[16]तैसा जीवही एकदेशी, शरीरीं, [17]तैसा भोगें [18] [19]सर्वत्र कैसा प्रकारीं. ॥ ३५

भाळीं चंदन वाळलें परि पुन्हा ओलें [20]जळें होतसे,
पायीं व्यापक [21]तें तरी पद धुतां ओलें न जेव्हां दिसे ।
तेव्हां जीव [22]हृदंबुजीं नखशिखा व्यापोनि आहे [23]तैसा,
[24]कांतालिंगनताडनें [25]करि [26]सुखीदुःखी शरीरीं कसा ? ॥ ३६

---

१. चंद्र. चंद्र एका जागीं असून आपल्या किरणांनीं तो सर्वत्र शैत्य उत्पन्न क रितो. तसेंच चंदनबिंदूपासून सर्व देहांत शैत्य उत्पन्न होतें. चंद्रास जर व्याप क्षणतां येत नाहीं (त्याचें कारण श्लोक ३३ उत्तरार्धांत सांगितलें आहे) तर चंदनबिंदूच व्या पक कसा क्षणावयाचा?–असा अर्थ. २. दिव्याचा उजेड. या दृष्टांताविषयीं यथार्थ पिका–अध्याय २ ओंव्या ५४५-५५० व अध्याय १५ ओंव्या ९५७-९६० प ३. दीपप्रभेच्या व्यापकत्वाला, दिव्याच्या प्रकाशाला. ४. दिव्याला, दीपाला. ५. द्रप्रकाश असतां. ६ आकाशांत. ७. चंद्रमंडळांत, चंद्राला. ८ तप्त होत ना ९. चंदनबिंदु. १०. आकाशांतील चंद्र. ११. न बोलवे–असा अन्वय. एकदेशी (देहाचे ए भागांत राहणारा) जीव जरी सर्व देहासि प्रकाशी [अशी कल्पना केली तरी उष्णशीतस्प तो] सुखीदुःखी [होतो असें] बोलवे न (बोलवत नाहीं)–असें तात्पर्य. १२. देहाचे एका भागां राहणारा. १३. निर्वात (वायुरहित) देशीं, (स्थळीं)=दिव्याला वाऱ्याचा उपद्रव नाही अशा घरां १४. घराबाहेर जेथें वारा वाहत आहे, अशा जागी. १५. प्रकाशयुक्त असतो. १६. दिव्या प्रकाशाला वारा लागला तरी त्या योगानें दिवा हालत नाहीं, त्याप्रमाणें जीव शरीराचे एक भागांत असता तर दुसरे भागांत होणारा भोग त्याला घडला नसता–असें तात्पर्य. १७. त्या जीवाला. १८. शीतोष्णादिकांपासून होणारें सुखदुःख. १९. सर्व देहांत होणारा. २०. पा ण्यानें. २१. तें भाळीं लाविलेलें चंदन. २२. हृत्+अंबुज=हृदयकमळीं. २३. नखशिखा सर्व देह व्यापून हृदयांबुजींही देह असल्याप्रमाणें. २४. कांता+आलिंगन+ताडन=सुंदर स्त्रि येच्या आलिंगनानें व मारानें. २५. करितो. २६. कांतालिंगनानें सुखी आणि ताडनानें दुःखी.

ओले होतां चरण निढळीं गंधही आर्द्र होतें,

तेव्हां साम्य स्वमतिकृत हें व्यापकत्वासि येतें ।

दृष्टांतीं हा असुख सुखही भोगितो सर्वठायीं,

जैसा पाहा हृदयिं म्हणतां मस्तकीं हातपायीं. ॥ ३७

म्हणाल हे अद्भुत जीवशक्ती, शक्तीस नाहीं सुखदुःख भुक्ती ।

तथापि हा जीव असेल जेथें, देतील शक्ती सुख दुःख तेथें. ॥ ३८

हे भोग तेव्हां हृदयीं घडावे, सर्वत्र देहांत न सांपडावे ।

यांकारणें सर्वहि या कुयुक्ती, अणुत्व तेव्हां न घडेल भुक्ती. ॥ ३९

नाडिद्वारा म्हणति फिरतो जीव हा तेथतेथें,

---

१. ओलें. २. सारखेपणा. जीवाचे शरीरव्यापकत्वाबरोबर चंदनबिंदूच्या व्यापकत्वाचें साम्य. ३. भेदवाद्यांनीं स्वतः तयार केलेलें. पंडितांनीं अद्वैतमतप्रतिपादनार्थ जे दृष्टांत योजिले आहेत ते वेदश्रुतिकथित आहेत. मागें अध्याय ६ श्लो० ६८ पहा. [यथार्थदीपिका—अ० ८।८७४ व अध्याय १८।५७४-५७५ पहा.] ४. हें चंदनबिंदूचें. ५. जीवाचे व्यापकत्वाला. ६ प्रत्यक्षीं, प्रत्यक्ष जो अनुभव येईल त्यावरून. ७. दुःख. ८. सर्व देहांत. ९. ज्याप्रमाणें हृदयीं, त्याचप्रमाणें मस्तकीं, हातीं आणि पायीं ह्मणजे शरीराच्या सर्व भागांत. १०. भेदवादी ह्मणतात कीं जीव हृदयाचे ठिकाणीं राहातो. ११. 'जीव अणुरूपानें शरीरांत राहतो आणि जीवशक्ति सर्व देह व्यापून असते. त्या अद्भुत शक्तीमुळें जीवास 'भोग घडतो' असें ह्मणाल तर. या ह्मणण्याचें खंडन पाद २-४ यांत केलें आहे. १२. बुद्धिवृत्तीला. बुद्धिवृत्ति हीच 'जीवशक्ति' होय. या बुद्धिवृत्तीला 'चित्तवृत्ति' असेंही ह्मटलें आहे. [अ० ५ श्लो० ५५ पहा]. १३. जीव हें कारण आणि शक्ति हें कार्य. कार्य आणि कारण यांचें लक्षण एक नसून कारणाहून कार्य निराळें असतें. कारण अविनाशी चैतन्यरूपी असलें तरी कार्य जड असावयाचेंच. [यथार्थदीपिका—अ०२ ओवी ४११ पहा. ] अर्थात् जीव चैतन्यरूप असला तरी जीवशक्ति जड आहे. जडाला भोग कळावयाचा नाहीं, भोग कळतो चैतन्याला. वास्तव जीवशक्ति ह्मणजे बुद्धि किंवा चित्त जड आहे. त्यास भोक्तृपण नाहीं. [मागें अ० ५ श्लो० ४८-४९ पहा.] वास्तव 'शक्तीस सुखदुःख भुक्ति नाहीं' असा सिद्धांत. १४. भोग. १५. जीव देहांत असेल तेव्हां. १६. जीव अणु आहे असें सिद्ध करण्यासाठी दाखविलेलीं कारणें. १७. मिथ्याप्रतिपादन. १८. जर 'अणुत्व' सत्य असेल तर. १९. भोग. २०. शरीरांतील रक्तवाहिन्यांमधून, नाडीमार्गानें. २१. यथार्थदीपिका—अ० १५ ओव्या ९३३-३४ पहा. २२. शरीराच्या सर्व भागांत; शरीरांत सुखदुःखास कारण ज्या ज्या ठिकाणीं उत्पन्न होतें त्या त्या ठिकाणीं.

देहामध्यें असुख सुख हे कारणें होति जेथें ।
ऐके काळीं न घडति[2] तरी[3] शीतउष्णादि बाधा,
तर्कें ऐशा[4] करुनि[5] अणुता या स्वजीवासि साधा[6]. ॥ ४०
वेदाश्रितें भेदमतें समस्तें[7], झालों पहा येरिति येथ अस्तें[8] ।
सिद्धांत[9] हा भास्कररूप जेथें, भेदांधकारा बळ काय तेथें. ॥ ४१
अणुत्वा[10] महत्वा[11] न हा जीव साहे, स्वनानात्व[12] एकत्वही[13] जो न लाहे[14] ।
म्हणोनी[15] अनेका जळीं सूर्य नाना[16], तसा जीवसिद्धांत दूजा[17] घडेना[18]. ॥ ४२
म्हणउनी श्रुतिही[19] वदती असें, स्मृतिपुराणकदंब[20] वदे तसें ।
सकळ[21] बिंब हरी प्रतिबिंब[22] हा, जितुकिजे[23] तनु हा तितुका[24] पहा. ॥ ४३
सकळजीवकदंब[25] हरी स्वयें, अनुभवी प्रतिबिंबपणें[26] भयें ।

---

१. या श्लोकाचे प्रथमार्धांत भेदवाद्यांचें म्हणणें सांगितलें आहे आणि त्या म्हणण्याचें खंडन उत्तरार्धांत केलें आहे. २. शरीराच्या वेगळाल्या भागांत एके काळीं शीतोष्णादि बाधा जर जीवाला न घडती (घडत नाहींत, समजत नाहींत). ३. तर मात्र. ४. पूर्वार्धांत वर्णिलेल्या. ५. तर्कें करुनि—असा अन्वय. ६. साधूं शकता. [यथार्थदीपिका—अ० १५ ओं० ९६२-६३.] ७. सगळीं; मध्व, रामानुजादि. ८. अस्तें झालीं (लोपलीं)—असा अन्वय. ९. अद्वैतसिद्धांत. १०. जीव अणुत्वा न साहे (जीव अणु नव्हे)—असा अन्वय. [यथार्थदीपिका—अ. १५ ओंवी ९४३ पहा.] ११. जीव महत्वा न साहे (जीव थोर नव्हे)—असा अन्वय. [यथार्थदीपिका—अ० १५ ओंवी ९४०.] १२. स्व=स्वत: जीव. नानात्व=भिन्नता. जीव नानात्व न लाहे—असा अन्वय. जीव निरनिराळे—भिन्न नाहींत—असा भाव. चैतन्य एक आणि त्याचे अंश जीव (सर्व जीव) अभिन्न होत. [भगवद्गीता—अ० १३।२; अ० १५ श्लो० ७ पहा.] १३. जीव एकत्वा न लाहे (जीव तेथून सर्व वेगवेगळे)—असा भाव. 'सर्वव्यापक नसे पुरुष हा । व्यापूनि असे एकाच देहा ॥' [यथार्थदीपिका—अ० १५।९३१.] १४. ग्रहण करीत नाहीं, प्राप्त होत नाहीं. १५. यास्तव, पूर्वार्धांत वर्णिलेल्या कारणास्तव. १६. अनेकधा, भिन्नभिन्न, प्रतिबिंबरूपानें वेगवेगळा. १७. जीवस्वरूप 'प्रतिबिंब' होय या सिद्धांतावांचून अन्य सिद्धांत. १८. संभवत नाहीं. १९. वेद. २०. स्मृति=मनुस्मृति. भगवद्गीतेचाही समावेश शांकरभाष्यांत आचार्यांनी 'स्मृति' शब्दांत केला आहे. पुराण=भागवत, ब्रह्मपुराण वगैरे पुराणें. २१. सर्वात्मक, अनंत. [मागें अ० ४ श्लो० ५ पाद ३ पहा.] २२. जीव. २३. जितक्या—जेवढ्या आकाराची; लहानथोर असेल त्याप्रमाणें. २४. उपाधि असेल तेवढें प्रतिबिंब—असा अर्थ. [यथार्थदीपिका—अ० १५ ओंव्या ६४३-४४ पहा.] २५. कदंब=समूह, समुदाय. २६. प्रतिबिंबरूपानें, प्रतिबिंबरूपी चैतन्यालाच सुखदु:खभोग; मन इत्यादिकांस भोग नाहीं—असें तात्पर्य. [यथार्थदीपिका—अ० १५ श्लो० ९ वरील टीका; तसेंच अनुभूतिलेश—श्लो० २२२-२४८ पहा.]

लयसुषुप्तित नित्य तदैक्यता, हरिस कां न घडे सकळात्मता ? ॥ ४४
अनुभवी सुख दुःख पृथक्पणें, डळमळी जळिं भानु न आपणें ।
अणुमहत्वउपाधिगुणें तया, प्रकृति ईशअनीशपणें जया. ॥ ४५
अनीश मायाप्रतिबिंबरूपी, ईशत्व तें बिंब सुखस्वरूपी ।
अनीश्वरोपाधिमधें अविद्या, उपाधि जो ईशपणांत विद्या. ॥ ४६
दुःखादिभोक्तृत्व अनीश्वरासी, भोक्तृत्व नाहीं परमेश्वरासी ।
सिद्धांत ऐसा सकळश्रुतींचा, ज्या 'द्वासुपर्णा' दिक वेदवाचा. ॥ ४७
म्हणुनि 'तत्वमसी' बहुधा श्रुती, वदति ऐक्य अबाधित येरिती ।
'असि' पदें निरुपाधि चिदैक्यता, हरुनि भेद निरूपिति तत्वता. ॥ ४८
'असि' पदें जरि नित्य चिदैक्यता, वदतसां कसि चित्प्रतिबिंबता ? ।
जरि म्हणाल असें तरि तत्वता, प्रतिमुखासि निदान मुखात्मता. ॥ ४९
घडिघडी प्रतिबिंब दुजें दिसे, परि मुखाविण अन्य न तें असे ।

---

१. लय=ऐक्यता, सुषुप्तीत=झोपेंत. २. बिंबप्रतिबिंबैक्यता. ३. बिंबस्वरूपी ईश्वराला. ४. सकलात्मता हरिस कां न घडे ? (कां नसेल ?)—असा अन्वय. बिंबप्रतिबिंब वस्तुतः एकच—असें तात्पर्य. ५. प्रतिबिंबरूपानें. ६. उपाधि लहान मोठा असेल तदनुरूप. ७. चैतन्याला. ८. माया. ९. ईश (ईश्वर) आणि अनीश (जीव) अशीं रूपें. १०. चैतन्याला, ब्रह्माला. मायेच्या योगानें 'ईशपणा' आणि 'अनीशपणा' अशीं रूपें झालीं—असा अर्थ. ११. पृ० १८४ टीप ११ पहा. १२. श्रुति. १३. ही श्रुति सामवेदीय छांदोग्योपनिषद्–प्रपाठक ६–खंड ८-१६ यांत श्वेतकेतूला उद्दालकानें नऊ वेळां उपदेशिली आहे. हिला महावाक्य म्हणतात. [मागें अध्याय ६।२ पृ० १६३ पहा.] १४. वारंवार, पुनःपुनः. १५. तत्वमसी श्रुति वदती (वदते)—असा अन्वय. १६. जीवेश्वर ऐक्य आणि जडचैतन्य ऐक्य. १७. सत्य. १८. उपाधिरहित असतां, ईशोपाधि (विद्या) आणि जीवोपाधि (अविद्या) यांचा चैतन्याशीं योग नसेल तेव्हां. १९. जीवरूपी आणि ईशरूपी या दोनही चैतन्यांची ऐक्यता. २०. निरूपितें, निरूपण करितें. २१. जीव आणि ईश यांत व्यवहारिक भेद असला तथापि तात्विक भेद नाहीं—असा अर्थ. २२. शंका घ्याल. ती शंका:—'तत्' पदानें दर्शविलेलें जें सर्वव्यापी चैतन्य तें आणि 'त्वं' या पदानें दर्शविलेलें जें बुद्ध्यवच्छिन्नचैतन्य (कूटस्थ) तें; या दोहोंची चिदैक्यता 'असि' पदें आहे असें जरि वदतसां तरि त्या श्रुतीनें 'चित्प्रतिबिंबता' कशी सिद्ध होते ? चैतन्य आणि प्रतिबिंब यांचें एकत्व कसें सिद्ध होतें ? या शंकेचें निराकरण या श्लोकाच्या चतुर्थपादांत आणि श्लोक ५०।५१ यांत केलें आहे. २३. प्रतिबिंबाला. २४. निदान तत्वता तरी प्रतिमुखासि मुखात्मता हीच गोष्ट सत्य—असा अन्वय. तात्विक दृष्टीनें त्यांत भेद नाहीं—असें तात्पर्य. २५. मुखाचे प्रतिबिंबाला. [यथार्थदीपिका—अ० १३ ओव्या १००-१३७ पहा.]

गढुळ[1] नीर तेंई[2] स्वमुखीं वैसे[3], प्रतिमुखास[4] दुजें[5] वदतां कसे? ॥ ९०
प्रत्यक्ष भेद[6] न दिसे पडतां सुषुप्ती, स्वप्नांत जागृतपणीं उभय प्रतीती ।
देहामधें[7] प्रतिमुखीं[8] सुखदुःखसिद्धी, बिंबांवरी[10] फिरति[11] सर्व[12] सबाह्य[13] वृद्धी[14]. ॥ ९१
बिंबात्मतेकरुनि[15] बुद्धि जगांत धांवे, देहांत दुःख सुख हें प्रतिबिंब पावे ।
'सर्वानुभूति' परि हे नकळे जनाला[16], अल्पांचिणें[17] स्फुरण तों न घडे मनाला[18]. ॥
हें उत्तरप्रकरणीं[19] जगदेकबंधू[20], बोलेल वामनमुखें करुणैकसिंधू ।
हा 'जीवतत्त्व' म्हणऊनि अशेषनाथें, अध्याय येथ रचिला निजबोध[21] जेथें. ॥

---

## अध्याय आठवा.

### अनुभवतत्त्व[22].

चैतन्यभेद[23] अवघेचि उपाधिभेदें[24], ऐकात्मता[25] तरिच बोलिलि नित्य[26] वेदें[27] ।
तो भेद केवळ[28] दिसे सुखदुःख भोगीं, एकत्व सुप्तिलय[29] आणि समाधियोगीं[30]. ॥

---

१. मलीन, प्रतिबिंब पडण्याजोगें निर्मळ नाहीं असें. २. त्यावेळीं, उदक गढुळ होऊन त्यांत प्रतिबिंब वठत नाहीं त्यावेळीं. ३. वसतें, राहतें. मुखाचे ठिकाणीं (बिंबांत) प्रतिमुख (प्रतिबिंब) असतें त्या दोहोंत एकत्व असतें–असा भाव. ४. प्रतिबिंबास. ५. भिन्न, मुखापासून प्रतिबिंब भिन्न असतें. ६. बिंबात्मा आणि प्रतिबिंबात्मा यांत सुषुप्तीचे वेळीं भेद कसा नाहीं याचा विचार या ग्रंथाचे पांचवे अध्यायांत केला आहे. ७. झोंप. ८. परमात्मा आणि जीवात्मा यांचे भिन्नत्वाचा अनुभव. ९. प्रतिबिंबाला. [यथार्थदीपिका–अ० १५ श्लो० ९ वरील टीका आणि अनुभूतिलेश–श्लो० २२२-२४८ पहा.] १०. बिंब म्हणजे काय याविषयीं अ० ४ श्लो० ५ पहा. ११. फिरते, वर्तते. १२. हें वृद्धीचें विशेषण. १३. अंतर्बाह्य. १४. स्थावरजंगम, चडचैतन्य यांचा विस्तार. १५. चौथ्या अध्यायांत जिला 'विश्वात्मता' 'बिंबात्मता' 'ब्रह्मात्मता' 'सर्वात्मता' असें म्हटलें आहे व जीचें वर्णन या श्लोकाचे प्रथमपादांत आहे ती. १६. ज्ञानवंतावांचून इतरांस. १७. सर्वात्मक नाहीं असें एकदेही जें प्रतिबिंब (जीव) स्वरूप त्याखेरीज. १८. मन हें जड आहे त्याला स्फुरण अल्प (एकदेशी) जें जीवरूपी चैतन्य त्याचे योगानें प्राप्त होतें–असा अर्थ. १९. पुढच्या अध्यायांत. २०. सर्वांचा धनी जो ईश्वर त्यानें. २१. आत्मबोध. २२. अध्याय ७. श्लो० ५२ पाद ३ यांत उल्लेख आहे त्यावरून या अध्यायाचें नांव पंडितांनीं 'सर्वानुभूतितत्त्व' ठेविलें असावें असें वाटतें. २३. जीवात्मा आणि परमात्मा (ईश्वर) हे भेद आणि दृष्टोत्पत्तीस येणारे वेगवेगळाले जीवरूपी चैतन्यभेद. २४. वेगवेगळ्या उपाधींच्या योगानें. [मुकुंदराज–विवेकसिंधु–प्रकरण ३ ओंव्या १६-१७ पहा.] २५. आत्मैक्य. २६. सर्वदा. मागें अध्याय ६ श्लोक ७४,७५,७६ पहा. २७. श्रुतीनें. २८. केवळ सुखदुःखभोगीं मात्र तो भेद दिसे इतर प्रसंगीं तो न दिसे–असा अन्वय. जागृति, स्वप्न, सुषुप्ति (सुप्तिलययोग) व तुर्या (समाधियोग) या चार अवस्थांपैकीं पहिल्या दोन अव-

जें हालतें सकळ तें प्रतिबिंब हाले, हे [२]जों उपाधिकरितां बहु भेद झाले ।
[३]ते [४]तों जळें गढुळ होत समस्त जेन्हां [६]बिंबाविणें [७]प्रतिमुखा [८]गति काय तेन्हां? ॥
बिंबात्मताचि संकळासि समस्तकाळीं, भोगींच हे प्रतिमुखात्मपणें निराळी ।
सर्वत्र बिंब मन त्यांवरि धांवतां हे, दुःखेंसुखें प्रतिमुखासि न पाहताहे.॥ ३
ईशांनीश उपाधि दोनिहि अहो। बिंबोंमधें वर्तती
जो आकाश मठांत सर्वहिघटीं आकाश तों येरिती ।

---

त्यांस सुखदुःख भोग आहे आणि त्या अवस्थेंत मात्र चैतन्यभेद भासतो, इतरत्र भेद नाहीं, सुप्तिलययोगीं आणि समाधीयोगीं [चैतन्यास] एकत्व [आहे असेंच] दिसे—असा स्पष्टार्थ. २९. सुप्ति (निद्रावस्था)+लय (चित्ताचा नाश). ३०. समाधि=जागृति, स्वप्न, सुषुप्ति यांपलीकडे जी अवस्था ती. [यथार्थदीपिका—अ० १८।११२४ पहा.]

१. अध्याय ४ श्लोक ७-९ पहा. २. जोंपर्यंत. उपाधीच्या योगानें भेद आहे तोंपर्यंतच प्रतिबिंबाचें हालणें—असा अर्थ. ३. जीवस्वरूपी चैतन्यभेद. ४. समस्त जळें गढुळ होत तों [पर्यंतच] ते [जीवभेद]—असा अन्वय. [यथार्थदीपिका—अ० २ ओंवी ११७३ पहा.] ५. सुषुप्तींत. ६. बिंबस्वरूप जो ईश्वर त्यावांचून. ७. प्रतिबिंबाला, जीवस्वरूपाला. ८. आश्रय. तेन्हां (सुषुप्तिसमयीं) प्रतिमुखा बिंबाविणें [अन्य] गति काय?—असा प्रश्न. सुषुप्तिस्थिति म्हणजे बिंबैक्यच होय असें पंडितांचें मत आहे. [मागें अध्याय ५ श्लोक १३ पहा.] ९. बिंबैक्य. ईशोपाधि आणि जीवोपाधि यांचा म्हणजे परमात्मा आणि जीवात्मा यांचा अभेद. १०. सर्व जीवरूपी चैतन्याला. ११. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, तूर्या आणि उन्मनी (सहजावस्था) या पांचही अवस्थांमध्यें किंवा स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण आणि कैवल्य या पांच देहांमध्यें अथवा सृष्टीच्या आवर्ती आणि वर्तमानकाळीं. १२. सुखदुःखभोगप्रसंगींच. जागृति आणि स्वप्न ह्या दोन अवस्था अथवा स्थूल आणि सूक्ष्म देह यांत सुखदुःखभोग घडतो. त्यावेळीं हे (आत्मता) प्रतिमुखात्मपणें (प्रतिबिंबरूपानें) निराळी असते. १३ आत्मता. १४. प्रतिबिंबरूपानें, जीवरूपानें. १५. जीवरूपी आत्मता बिंबात्मतेपासून वेगळी—असा अर्थ. १६. सर्वव्यापक बिंबरूपी चैतन्य. १७. त्या बिंबरूपी चैतन्यावर, त्या चैतन्याचे ठिकाणीं. १८. सर्वत्र बिंब जें त्यावरी मन धांवतां—असा अन्वय. १९. हे (आत्मता) न पाहताहे—असा अन्वय. २०. दुःखाच्या किंवा सुखाच्या योगानें, सुखदुःखभोगप्रसंगीं. २१. जीवस्वरूपास. २२. पाहात नाहीं. ज्याची बिंबात्मता अनुभवी मनाची स्थिरता झाली त्याला चित्प्रतिबिंब आत्मा असें वाटत नाहीं—असा भावार्थ. [मागें अध्याय ४ श्लोक १९ पहा.] २३. ईश आणि अनीश हे दोन उपाधिभेद होत. उपाधीला या ग्रंथांत 'वृत्ति' असें म्हटलें असून पहिल्या उपाधीस 'जगदीशउपाधिवृत्ति' 'सात्विकवृत्ति' असें म्हटलें आहे. [याचें लक्षण मागें अध्याय ४ श्लोक २६ पूर्वार्ध श्लोक ३२ यांत दिलें आहे.] दुसऱ्या उपाधीस 'जीववृत्ति' असें म्हटलें आहे. [याचें लक्षण मागें अध्याय ४ श्लोक २६ उत्तरार्ध व श्लोक ३१ यांत सांगितलें आहे.] त्या भेदांसच अनुक्रमें माया आणि अविद्या अशी नांवें आहेत. २४. शुद्धचैतन्याचे ठायीं. [मुकुंदराज—विवेकसिंधु—पूर्वार्ध—प्रकरण ७ ओंवी २४ पहा.] २५. वर्ततात, राहतात. २६. महदाकाश, निरालंबगगन.

आकाश प्रतिबिंबलें घटजळीं तें तों जैळें हालतां,
ऐसे हाँलति भोगमात्र दिसती जीवा असे पाहतां. ॥ ४
भोगार्थ जीवेश्वर वेगळाले, बिंबात्मतेनें नव्हती निराळे ।
स्वप्नप्रबोधांतचि भोग यांला, सुषुप्तिकाळीं निजसौख्य त्याला. ॥ ५
बिंबेंचि ते जड उपाधि सुषुप्तिकाळीं, तेव्हां न हीं प्रतिमुखें उरती निराळीं ।
स्वप्नप्रबोधसमयांतहि याचरीती, बिंबें करोनिच सचेतन सर्व होती. ॥ ६
बिंबैक्यं सुप्तिसमयांत घडे जयाला, तो मुक्त त्यास भव केंवि म्हणाल बोला? ।

---

२७. तीं काळीं, घट आणि मठ यांची रचना होतांच. २८. आकाश हें चैतन्य आणि मठ, घट हे उपाधिभेद याप्रमाणें. [विवेकसिंधु–पूर्वार्ध–प्रकरण ७ ओंव्या २५।२८ पहा.]

१. मागें अध्याय ५ श्लोक २३।२४ पहा. [यथार्थदीपिका–अध्याय १३ ओंव्या ११३,११५ व १२३ पहा.] २. प्रतिबिंब. ३. जळाच्या योगानें. पाणी हाललें कीं त्यांतील प्रतिबिंब हालतें–असा अर्थ. ४. जळप्रतिबिंबन्यायानें. ५. सुखदुःखभोगानें जीव हालती–असा अन्वय. ६. अशा प्रकारचे. जीवा [सुखदुःख] भोग मात्र दिसती–असा अन्वय. ७. अनुभव घेतां, विचार केला असतां. ८. मुकुंदराजकृत–विवेकसिंधु–पूर्वार्ध–प्रकरण ७ ओंव्या ११, १५, २१, २७, २८, २९ व ३७ पहा. ९. भिन्नभिन्न. मुकुंदराज–विवेकसिंधु–उत्तरार्ध–प्रकरण ७ ओंव्या ४-८ पहा. १०. प्रतिबिंब (जीव) हा केवळ आभास असून खरोखर 'जीवोपाधी'ला सचेतन करणारें बिंबरूपी चैतन्यच आहे यास्तव बिंब हाच खरा आत्मा–ह्या दृष्टीनें पाहतां. ११. जागृति आणि स्वप्न या अवस्थांमध्यें. १२. सुखदुःखादिकांचा भोग. १३. जीवाला. १४. आत्मसुख. सुषुप्तींत जें सुख असतें तें इतर विषयांपासून नसून स्वसुखांतून आत्मा निमग्न असतो त्यामुळें त्यास 'निजसौख्य' असें म्हटलें आहे. १५. बिंबस्वरूपाला. जागृति आणि स्वप्न या दोन अवस्थेंत (स्थूल आणि सूक्ष्म या दोन देहांत) प्रतिबिंब असतें तें सुषुप्तींत नसतें यास्तव सुषुप्तिसुखाचा अनुभव प्रतिबिंबाला (जीवाला) नसून तो अनुभव बिंबरूप चैतन्यस्वरूपालाच असतो–असा भाव. १६. हीं (दृष्ट्योत्पत्तीस येणारीं) प्रतिमुखें (जीवरूपी स्वरूपें–प्रतिबिंबें) निराळीं (बिंबाहून वेगळीं) न उरती- (राहात नाहींत) तेव्हां सुषुप्तिकाळीं ते (जीवोपाधि) जड उपाधि बिंबेंचि (बिंबस्वरूपी चैतन्यानेंच) सर्व सचेतन [होतात] याच रीती (याच पद्धतीनें) स्वप्नप्रबोधसमयांतहि (स्वप्न आणि जागृति या दोन अवस्थांमध्ये ज्या वेळीं प्रतिबिंब अस्तित्वांत असतें त्यावेळींही) बिंबें करोनिच (बिंबरूपी चैतन्याचे योगानेंच) सर्व (जीवोपाधि) सचेतन होती (होतात). सारांश सचेतनपणा हा प्रतिबिंबाचे योगानें प्राप्त झालेला नसून बिंबाचे योगानेंच प्राप्त झाला आहे–असा अर्थ. १७. बिंबैक्य म्हणजे जीवेश्वरैक्य आणि जीवेश्वरैक्य म्हणजे मुक्ति. सुप्तिसमयांत जर बिंबैक्य घडतें तर जीवाला त्यावेळीं मुक्ति मिळते असेंच समजलें पाहिजे, असा जो प्राणी मुक्त झाला त्यास भव (संसार) कैंवि? बोला (कां घडतो? तें सांगा)–असा प्रश्न उत्पन्न होतो त्याचा उल्लेख या श्लोकार्धांत केला आहे.

[1]बुद्धीकरूनि [2]निजबिंब फळेल जेव्हां, [3]अज्ञानमूळ भवबंध [4]तुटेल तेव्हां. ॥ ७

[5]विद्या [6]अविद्या उभय [7]प्रकाशी, तें [8]बिंबचैतन्य न [9]एकदेशी ।

[10]यांकारणें '[11]तत्वमसी'ति वाक्यें, बिंबावरी [12]वर्तविती [13]चिदैक्यें. ॥ ८

'[14]असि'पदें म्हणऊनिच बोलती, [15]सदसदैक्य असेंचि बहू [16]श्रुती ।

[17]तरिच 'तत्वमसी' असि वैखरी, अनुभवी मनि मानिति हे [18]खरी. ॥ ९

वीणां[19] अहंकार न भोग होती, प्रत्यक्ष हें तों अवघे पहाती ।

दुःखी सुखी मी सुख दुःख मातें, यां प्रत्ययावीण न भोग [21]यांतें. ॥ १०

---

मुकुंदराजांनीं या प्रश्नाचा उल्लेख असा केला आहे:-'सुषुप्ति अवस्थे कल्पना । निःशेष होय लीना । तरी जीवाची संरक्षणा । कां न चुकेची ॥ ६८ ॥' [विवेकसिंधु-पूर्वार्ध-प्रकरण २.] १८. संसार. १९. या श्लोकार्धांत दर्शविलेली शंका ध्याल.

१. या श्लोकाचे पूर्वार्धांत दर्शविलेल्या शंकेचें निरसन या उत्तरार्धांत केलें आहे. [विवेकसिंधु-उत्तरार्ध-प्रकरण ३.] २. खरें आत्मत्व, अचळ आणि आत्मत्व असें चैतन्य. ३. अज्ञान. हेंच आहे मूळकारण ज्यास असा भाव (संसार) बंध. ४. बंध (बंधन) तुटेल (नाश पावेल, संपेल)—असा अर्थ. ५. ईशोपाधि, ज्ञानस्वरूप, शुद्धसत्वमायाप्रकृति. ६. जीवोपाधि, अज्ञान आणि विपरीत ज्ञानरूप, त्रिगुणात्मकप्रकृति. ७. विद्या आणि अविद्या या दोनही वृत्तींस सचेतन करितें. ८. 'बिंबस्थानीं ब्रह्म उपमिजे । प्रतिबिंब जीवेश्वर बोलिजे । हा बिंबप्रतिबिंबन्याय जाणिजे । वेदांतशास्त्रीं. ॥ ३१ ॥' [विवेकसिंधु-पूर्वार्ध-प्रकरण ७.] ९. फक्त एका भागास व्यापणारें. १०. बिंबरूपी चैतन्य एकदेशी नसून तें व्यापक असल्यामुळें. ११. 'तत्वमसि' हें वाक्य उपनिषदांत नउदां आलें आहे म्हणून येथें अनेकवचनी प्रयोग केला आहे. तत्वमसि+इति (अशीं)+वाक्यें. १२. तत्वमसीति वाक्यें चिदैक्यें बिंबावरी वर्तविती—असा अन्वय. १३. तत्वमसी हीं वाक्यें शुद्धानवच्छिन्नचैतन्याचें एकत्व सर्वगत जें त्या चैतन्याशीं आहे—असें सांगतात असा या श्लोकार्धाचा अर्थ. १४. 'तत्वमसि' या वाक्यांतील 'असि' या पदानें. श्रुति असिपदाच्या योगानें ऐक्य बोलती—असा अन्वय. १५. सत् (चैतन्य)+असत् (जड)+ऐक्य=सर्व चैतन्यभेद आणि जडपदार्थ यांचें ऐक्य. १६. बहु श्रुती (पुष्कळ श्रुती) बोलती—असा अन्वय. १७. अनेक श्रुतिसंमत असल्यामुळें. १८. खरी मानिती—असा अन्वय. श्लो० ५ पूर्वार्ध यांत जीवेश्वरैक्य सांगितलें त्याची उपपत्ति श्लोक ६-९ यांत सांगितली आहे. १९. श्लोक ५ चरण ३ यांत सांगितलें आहे कीं जागृति आणि स्वप्न या दोन अवस्थांमध्यें मात्र जीवाला सुखदुःखभोग आहे. या सिद्धांतीं उपपत्ति श्लो० १०।११ आणि १२ पूर्वार्ध यांत सांगितली आहे. ती अशीः—सुखदुःख भोगणें चिदाभास (प्रतिबिंब) आणि अहंकार (मीपणा) या दोहोंवांचून नाहीं. सुखदुःखें हीं फक्त जागृति आणि स्वप्न या अवस्थांमध्येंच असतात. २०. मीपणाच्या, अहंकृतीच्या. २१. जीवातें.

नखशिखाग्रचि दीसति मीपणें, तितुकियांत सुखासुख भोगणें ।
तितुकियांतचि चित्प्रतिबिंबता, अवघिया स्थळीं केवळ बिंबता. ॥ ११
प्रतिबिंबअहंकृतीविणें, न घडे हें सुखदुःखभोगणें ।
परि बिंब तयांतही असे, अवकाशें घट पूर्ण हे जैसे. ॥ १२
आत्मा धणी सर्व जडें प्रकाशी, तो मीपणाभीतरि एकदेशी ।
त्या मीपणें भोक्तृपणप्रतीती, यालागिं तत्वें तदधीन होती. ॥ १३
व्हावें मला सुखचि दुःख कधीं न व्हावें, बुद्धींद्रियें वश अहंपणि या स्वभावें, ।
ज्यांमाजि भोगित असे प्रतिबिंब ज्याचें, तें बिंब सर्वगत नित्य अनंत साचें. ॥
देहाहुनी मीपण बाह्य नाहीं, तसेंचि हें चित्प्रतिबिंब देहीं ।
बाहेर जाती मन चित्त बुद्धी, बिंबामधें त्यांस चिदात्मसिद्धी. ॥ १५
चित्त बुद्धि मन हीं अचेतनें, आश्रयाचकरितां सचेतनें ।

---

१. सूक्ष्म आणि स्थूलदेहांत मात्र अहंकार असतो. स्थूलदेहाबाहेर नसतो–असा भावार्थ. २. अहंकारामुळें, गर्वाच्या योगानें. ३. सुखदुःख. ४. चिदाभास. [अध्याय ५ श्लो० २४ पहा.] ५. सर्व ठिकाणीं, देहाबाहेरील स्थळींही. ६. कैवल्यरूपी चैतन्य, केवळचैतन्य. ७. घटाकाशासारखें. ८. सुखदुःखभोग चैतन्याला कळतो, जडाला कळत नाहीं. तसेंच बुद्धींद्रियें चैतन्याचे आधीन आहेत, जडाचे स्वाधीन नाहींत. आणि अहंकार तर जड आहे तेव्हां बुद्धींद्रियांस सुखदुःखभोग घडण्यास अहंकारच कारण कसा ? असा प्रश्न येतो, त्याचें उत्तर श्लो० १३।१४ यांत आहे तें असें:—त्या अहंकाराला प्रकाशविणारें त्या अहंकारांत एकदेशी चैतन्य आहे यामुळें बुद्धींद्रियांस सुखदुःखभोग घडण्यास अहंकार कारण होतो. अहंकार हें जडतत्व आहे तथापि त्यास व्यापूनही चैतन्य आहेच:—'घट जो जो निपजे । तो तो आधींच गगनें व्यापिजे । तैसें जें जें तत्व निपजे । तें तें व्यापिजे चैतन्यें ॥ ४७ ॥' [मुकुंदराज–विवेकसिंधु–पूर्वार्ध–प्रकरण २]. ९. सर्वव्यापक नव्हे असा. १०. अहंकाराचे योगानें. ११. सुखदुःखानुभव. १२. बुद्धींद्रियें. १३. अहंकाराचे आधीन. १४. त्या अहंकारामध्यें. १५. सर्वगत (सर्वव्यापी) नित्य (अविनाशी) आणि अनंत (अपार) असें जें साचें (सत्यस्वरूपी) बिंबरूपी चैतन्य त्याचें. १६. एका अंतःकरणाचे चार भेद–चित्त, बुद्धि, मन आणि अहंकार. यांपैकीं फक्त अहंकार सुखदुःखभोगास कारण असें सांगितलें आणि बाकीचे तीन भेद कां वगळिले असा प्रश्न पुढें येतो त्याचें उत्तर असें:–फक्त देहांत जसें चित्प्रतिबिंब (चिदाभास, जीवस्वरूप) असतें, बाहेर नसतें त्याप्रमाणें अहंकार (मीपणा) देहाबाहेर नाहीं. तसा प्रकार चित्त, बुद्धि व मन यांचा नाहीं. यांची व्याप्ति देहाबाहेर सुद्धां आहे–असा या श्लोकाचा भावार्थ. १७. देहाबाहेर, देहबाह्य. १८. मन, चित्त, बुद्धि जाती–असा अन्वय. १९. सचेतनता. २०. जड. २१. सर्वगत नित्य अनंत असें जें बिंबरूपी चैतन्य त्याचे योगानें. २२. जागृत, चेतनायुक्त.

[1]जीव तो नखशिखेपुढें असे, तत्प्रकाशक न बाह्य तो दिसे. ॥ १६
ब्रह्मांडसांडी मन बुद्धि धांवे[2], हें [3]जीवचैतन्य न तेथें पावे ।
[5]चिदात्मयावांचुनि या [6]जडाला, [7]बिंबाविणें प्रत्यय कैंवि बोला? ॥ १७
जिये दृष्टिनें हा स्वदेहासि पाहे, तिणें [9]बाह्यरूपासिही पाहताहे ।
स्वदेहीं असे जीव चैतन्य तेणें[11], पहातां पुढें[12] यासि चैतन्यकेणें[13]. ॥ १८
[14]शरीरांतुनी [15]त्यांसवें धांवताहे, म्हणावें तरी [16]र्‍हास वृद्धी [17]नसाहे ।
मनें धांव घ्यावी तसें थोर व्हावें, न धांवे तई अल्परूपें असावें. ॥ १९
[18]म्हणाल कीं नेत्र असे शरीरीं, तथापि हे पाहति रूप दूरी ।

---

१. तो बाह्य दिसे (उघड उघड नजरेस येतो) तो जीव (चिदाभास, चित्प्रतिबिंब) नखशिखेपुढें (देहाचे बाहेर) चित्प्रकाशक (चित्त, बुद्धि, मन यांचा प्रकाशक) न असे (नाहीं). तात्पर्य–देहाचे बाहेरील त्याची धांव शुद्ध चैतन्याचे योगानें असते. २. चित्तबुद्धिमन यांस जी सचेतनता असते ती सर्वगत आणि अनंत असें जें चैतन्य त्यापासून असल्यामुळें त्या चैतन्याची जितकी व्याप्ति तितकी यांची धांव असावयाची. ब्रह्मांड व्यापून पलीकडे चैतन्याचा विस्तार आहे. यास्तव ब्रह्मांडसांडी (ब्रह्मांड उल्लंघून) मनबुद्धि ही चैतन्याची जितकी व्याप्ति आहे तेथपर्यंत धांवूं शकतात. ३. चिदाभास, चित्प्रतिबिंब. ४. देहाबाहेर. ५. सर्वगत चैतन्यावांचून. ६. चित्तबुद्धिमन यांला. ७. चिदात्मक अशा बिंबरूपी चैतन्यावांचून. ८. देहाबाहेर जीवचैतन्य नाहीं तेथें जर मनबुद्धि यांला प्रत्यय आहे तर तो प्रत्यय बिंबचैतन्याचा कसा नाहीं?=असा प्रश्न. अर्थात् हो प्रत्यय बिंबचैतन्याचाच असतो. ९. देही, देह धारण करणारा. १०. देहाखेरीज जी सृष्टि तिलाही- ११. जीवचैतन्य स्वदेहीं असे तेणें हा स्वदेहासि पाहे–असा संबंध. १२. स्वदेहाबाहेर. पुढें पाहतां (स्वदेहाबाहेर पाहतां, बाह्यरूपासि पाहतां असा अन्वयार्थ.) १३. केणें=वस्तु, पदार्थ. चैतन्यकेणें म्हणजे केवलचैतन्य. या श्लोकांत तृतीयपादाचा प्रथम पादाशीं व चतुर्थ पादाचा द्वितीय पादाशीं संबंध आहे. श्लो० १५ पाद ४ यांत बिंबामध्यें त्यांस (मनबुद्धि यांस) चिदात्मसिद्धि असते असें सांगितलें आहे त्या गोष्टीचें स्पष्टीकरण श्लोक १६-१८ यांत केलें आहे. १४. चित्त, बुद्धि, मन यांस देहाचे बाहेर जो प्रत्यय (प्रतीति, अनुभव) तो बिंबस्वरूपी चैतन्याचे योगानें प्राप्त होतो असें कां न म्हणावें? त्यांस स्वदेहीं जसा जीवचैतन्याचे (चिदाभासाचे) योगानें प्रत्यय येतो तसा देहाबाहेरही जीवचैतन्याचेच योगानें प्रत्यय येतो असें कां मानूं नये? या प्रश्नास उत्तररूप हा श्लोक आहे. तें उत्तर असें:–मनानें धांव घेतली कीं जीवानें थोर व्हावें आणि जेव्हां मन बाहेर संचार न करील तेव्हां लहान असावें. असा वृद्धिऱ्हासधर्म जीवांचे ठायीं नाहीं यास्तव मनाबरोबर शरीरांतून बाहेर जीवचैतन्य धांवताहे असें म्हणतां येत नाहीं. १५. चित्त, मन, बुद्धि यांबरोबर. १६. देहाएवढें होणें आणि देहाहून मोठें होणें. १७. शक्य नाहीं, संभवत नाहीं. १८. म्हणाल=शंका घ्याल, प्रश्न कराल. या प्रश्नाचा उद्देश या श्लोकांत आहे तो असा:–शरीरांतून चित्तबुद्धिमन यांचे बरोबर जीव

हा जीव तैसा मन इंद्रियेंहीं, दुरील जाणे परि याचि देहीं. ॥ २०

डोळे यथास्थित असोनिहि अंध होती, दृष्टीविणें किमपि रूप न ते पहाती ।
यालागिं नेत्रयुग दोनि जळीं शरीरीं, हे पूर्ण दोनिहि दृगिंद्रियदृष्टि नीरीं.॥ २१

जों उंच भूमि जळ तोंवरि धांवताहे, जों आड ये किमपि तोंवरि दृष्टि पाहे
उंचस्थळीं परततें जळ आदळोनी, पाहोन दृष्टि नयनाप्रति ये फिरोनी. ॥ २२

श्रोत्रांत तों पडति येउनि शब्द जेव्हां, जीवात्मया वरुनि ते कळताति तेव्हां ।
घ्राणासि गंध रसनेसहि येच रीती, जीवात्मया वरुनि भोग समस्त होती. ॥२३

तैसें दृगिंद्रिय जरी अति दूर जातें, तें दुःख आणि सुख याचि तनूस देतें ।
ऐसें तथापिहि दृगिंद्रिय जों स्वरूपें, पावे न दूरिवरि तों दिसती न रूपें. २४

हे नेत्र गोलकचि केवळ दृष्टि होती, देहीं असोनिहि तरी दुरुनी पहाती ।

---

धांवत असला पाहिजे असें नाहीं. जीव देहांत राहून मनाचे आणि नेत्रादि इंद्रियांचे योगानें देहाबाहेरील दूरचे रूपादि विषय जाणूं शकतो तर देहाबाहेर चित्तबुद्धिमन यांचा प्रकाशक जीव कां असूं शकणार नाहीं—असा प्रश्न. १९. नेत्र (नेत्रयुग) शरीरीं असे—असा अन्वय.

१. 'कीं इंद्रियें जैशीं तैसेंच मन । चिदंशास भोगसाधन ॥ ५०३ ॥' [यथार्थदीपिका—अध्याय १५.] २. येथें इंद्रिय शब्दानें 'श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च' [भगवद्गीता—अ० १५।९] यांत दर्शविलेलीं पांच ज्ञानेंद्रियें घ्यावयाचीं. ३. जाणूं शकतो. रूप शब्द, गंध हे विषय दूर असतांही ते जीवास कळतात—असा भाव. ४. श्लोक २० यांतील प्रश्नास श्लोक २१-२७ यांत उत्तर आहे. श्लोक २१-२४ यांचा भावार्थ असाः—स्थूलदेहास डोळे (गोलक) आकृतीनें चांगले असून आणि लिंगदेहांत दृगेंद्रिय आहे असें असतांही आंधळ्यास दृष्टि नसते (दिसत नाही) यावरून स्पष्ट होतें कीं शरीरांत जें नेत्रयुग्म आहे तें दोन जळांनी म्हणजे दृगिंद्रिय व दृष्टि यांनीं युक्त असें आहे. अर्थात् हे डोळे (गोलक) जेव्हां पूर्ण स्थितींत असतात तेव्हां ते दृगिंद्रिय व दृष्टि या दोहोंनींही युक्त असतात. ॥ २१ ॥ उंच भूमीवर आदळेपर्यंत पाणी धांव घेतें आणि तेथून मागें परततें त्याप्रमाणें कांहीं तरी आड येईपर्यंत दृष्टि दूर जाते आणि रूप पाहून परत शरीरांत येतें ॥ २२ ॥ कर्णेंद्रियांत शब्द येऊन पडतो, घ्राणेंद्रियास वास येतो, रसनेंद्रियास रस (गोडी) कळतो, तेव्हां त्या त्या विषयाचा भोग जीवास होतो ॥ २३ ॥ त्याचप्रमाणें दृगिंद्रिय जरी दूरचे विषय ग्रहण करितें तरी या शरीरासच तो भोग होतो. वर सांगितल्याप्रमाणें जर दृष्टिरूपी उदक पसरणार नाहीं तर रूपविषय जीवास कळणार नाहीं ॥ २४ ॥ सारांश देहाचे बाहेर चित्तबुद्धिमन यांस सचेतनता जीव चैतन्याचे योगानें प्राप्त होते असें सिद्ध करण्यास नेत्रांचें उदाहरण योग्य नाहीं. ५. दोन्ही डोळे. ६. दृगिंद्रिय व दृष्टि या दोन जळांनीं. ७. अव्यंग, परिपूर्ण. ८. दोन्ही डोळ्यांनीं. ९. श्लो० २२ यांत सांगितल्याप्रमाणें. १०. स्थूलदेहांत गोलकें नसतील

संकोचते पसरते जलरूप दृष्टी, तैसे न हे नयन जेंवि तडागसृष्टी. ॥ २५
दूरील आत्म्याविण बाह्य सृष्टी, दीसेल कैसी बहुरूप दृष्टी ।
हें ऊफराटें घडलें तुम्हांला, चैतन्य तें कोठिल तेथ बोला? ॥ २६
हा जीव तो सकळसंमत याचि देहीं, दृष्टीस दूरिगतहा तरि तेथ नाहीं ।
चैतन्य कोण तरि दृष्टिस या प्रकाशी, ऐसेंच चित्तमनबुद्धिस दूरदेशी. ॥ २७
आतां म्हणाल रविमंडळ एकदेशी, एवं तरी त्रिभुवनांत जसें प्रकाशी ।
तैसाचि जीव तरि भास्करतेज जैसें, हें जीवतेजहि म्हणा त्रिजगांत तैसें. ॥२८

---

तर लिंगदेहांत इंद्रियें आहेत त्यांना विषयज्ञान होणार नाहीं. म्हणजे गोलकेंच विषय ग्रहण करितात असें होईल; वास्तव डोळे (गोलक) हेच स्वतः केवळ दृष्टि आहेत. तेच दूरचे पदार्थ पाहतात. ११. स्थूलदेहांतील नेत्र व कान यांस गोलकें म्हणतात. [यथार्थदीपिका–अ० ५ ओंवी ५७३ 'इंद्रियें अवघीं लिंगदेहीं । स्थूलदेहीं इंद्रियें नसती कांहीं । नेत्रकर्णादि अवयींही । गोलकें स्थूलदेहीं म्हणावीं ॥' व 'स्थूलदेही नेत्रकर्णादिकें । हीं जों इंद्रियांचीं गोलकें । जैशीं पात्रांत उदकें । इंद्रियें गोलकीं ये रीती ॥ ८२४ ॥' अ० ३ पहा.]

१. श्लो० २२।२४ पहा. २. तडागसृष्टीप्रमाणें, तळ्यांतील पाणी संकोचतें किंवा पसरतें त्याप्रमाणें. ३. तळ्याची रचना. ४. श्लोक २५ यांतील आक्षेपास श्लोक २६।२७ यांत उत्तर आहे तें असें:—हें (श्लोक २५ यांतील कारण) तुम्हांलाच उलटें बाधक होतें. दूरील बाह्यसृष्टी चैतन्यावांचून (आत्म्याविण) कशी दिसेल? जीवचैतन्य देहाबाहेर नाहीं. तेथें बिंबरूपी सर्वगत चैतन्यावांचून कोठील कोण चैतन्य असणार? असें जर आहे तर त्याप्रमाणेंच चित्तबुद्धिमन यांस दूरदेशीं प्रकाशक तें सर्वगत चैतन्यच आहे. ५. चैतन्यावांचून. बिंबरूपी आणि प्रतिबिंबरूपी या दोहोंतून कोणा तरी एका चैतन्यावांचून. ६. अनेकविध. ७. श्लोक २५ यांतील कारण. ८. बाह्यसृष्टीचे जागीं. ९. देहाचे बाहेरील ठिकाणीं. १०. अशी शंका घ्याल कीं रविमंडळ (सूर्य) एकदेशी आहे (सर्वत्र नाही) एवं (असा आहे) तरी त्रिभुवनांत जसें प्रकाशी (प्रकाशयुक्त असतो) तैसाचि जीव देहांत [एकदेशी] असेल तथापि देहाबाहेर त्याचा प्रकाश आहे. या शंकेचें खंडन श्लोक २८-३२ यांत केलें आहे तें असें:—(१) चित्तबुद्धिमन हीं बाह्यदेशीं संचार करून परत जागच्या जागीं येतात. त्यांबरोबर जीवप्रकाश बाह्यदेशीं जातो—आणि परत येतो—असें म्हणत असाल तर जीवप्रकाशास सूर्यप्रकाशाची उपमा नाहीं. (२) सूर्याचा प्रकाश त्रिभुवनांत पसरलेला असतो त्यांत दृष्टि संचार करिते तशी जीवप्रभा ब्रह्मांडप्रभा व्यापून आहे. इतकेंच नाहीं तर मन ब्रह्मांडाबाहेर जाऊं शकतें त्या जागींही जीवप्रभा सर्वत्र पहिलीच व्यापून आहे. असें म्हणाल तर जीवप्रभेस 'अनंतत्व' आणि 'सर्वगतत्व' येतें. परंतु हे धर्म ईश्वराचे आहेत. जीवाचे किंवा जीवप्रभेचे नव्हेत. ११. सूर्यबिंब.

हीं बुद्धिचित्तमन धांवुनि येति मार्गें, जीवप्रकाशहि फिरे जरि त्याच मार्गें ।
सूर्यप्रकाश उपमा नघडे तयाला, हीं व्यापुनी त्रिभुवनीं रवितुल्य बोला. ॥ २९

ब्रह्मांडखर्पर विभेदुनि चित्त जातें, जीवप्रभे करुनि तेस्थळिं तें पहातें ।
त्याहूनिही मन पुढें ढकलेल जेव्हां, हें तेज तेथ पहिलेंचि असेल तेव्हां. ३०

तेव्हां अनंतपण सर्वगतत्व आलें, जीवप्रभेस तुमच्या इतुक्याच बोलें ।
ते जीव तों अमित आणिक एकदेशी, व्यापूनि ईश्वरहि येचरिती प्रकाशी. ।
हें व्यापिलें सकळ विश्व जसें परेशें, जीवें तसेंचि अवघें निजचित्प्रकाशें, ।
ऐसी अनेकविध बोधक युक्ति जेथें, इत्यादि हे मिरवती न कुतर्क तेथें. ॥ ३१

स्वयंप्रकाशें मन बुद्धि चेष्टी, चिदंश तेव्हां फिरतांचि सृष्टीं, ।
असा जरी व्यापक जीव जेव्हां, सर्वत्र त्या भोगहि होय तेव्हां. ॥ ३२

---

१. देहाचे बाह्यप्रदेशीं वेगानें संचार करून. २. पुन्हा देहांत. ३. जीवप्रभा, जीवतेज ४. योग्य नव्हे, शोभत नाहीं. ५. जीवप्रकाशाला. ६. जीवप्रकाश. ७. रविप्रभातुल्य ८. म्हणा. जीवप्रकाश फिरता नाहीं, सूर्यप्रकाशाप्रमाणें तो पहिलाच व्यापून त्रिभुवनां आहे—असेंच तुमचें म्हणणें असलें तरच 'सूर्यप्रकाशउपमा' घडेल—असा अर्थ. ९. ब्रह्मकटाह, ब्रह्मांडखंड. १०. आक्रमून. ११. या श्लोकांत 'चित्त' शब्द योजिला आहे त्या अर्थानें तृतीय पादांत 'मन' शब्द योजिला आहे. १२. जीवप्रभा. १३. ब्रह्मांडांत आणि त्यापुढें, जेथें मन जाईल तेथें. १४. मन जाण्यापूर्वी. १५. अमर्याद. १६. सर्वव्यापक. १७. अनेक, असंख्य. १८. प्रत्येक देहांत निरनिराळा. १९. एकदेशी जो जीव तो व सर्वव्यापक ईश्वर तो या दोहोंचाही प्रकाश सारखाच व्यापक !!! २०. सचेतन करितो. २१. बिंबरूपी चैतन्यानें. २२. प्रतिबिंबानें, चिदाभासानें. २३. सकळ विश्व. २४. दूषित. २५. अशा प्रकारचे. २६. न मिरवती=शोभत नाहींत, टिकत नाहींत. २७. आपल्या प्रकाशानें, जीवाच्या प्रकाशानें. २८. बिंब (ईश्वर)रूपी चैतन्य व्यापक आहे, तसें प्रतिबिंब (जीव) व्यापक आहे. तसेंच सृष्टीं (विश्वांत) मनबुद्धि फिरतांचि (संचार करीत असतां) तेव्हां त्याला स्वयंप्रकाशें (आपल्या सामर्थ्यानें) चिदंश (जीव) चेष्टी (सचेतन करितो) असें कोणी म्हणेल. या म्हणण्याचा उल्लेख या श्लोकाचे पूर्वार्धांत असून असा जर व्यापक जीव असता तर देहाबाहेर सर्वत्र त्याला सुखदुःखभोग झाला असता—हें कारण या श्लोकाचे उत्तरार्धांत दर्शवून या म्हणण्याचा निषेध केला आहे. चिदंश (जीव) चेष्टी (चेतवी)—असा भावार्थ. २९. जीव. ३०. मनबुद्धि सृष्टींत फिरत असतां. ३१. संचार करीत असतां. येथें 'फिरतोचि' असा अन्य पाठ आढळतो, पण तो अपपाठ असावा. ३२. विश्वांत. ३३. जीवास देहाबाहेर सुखदुःखभोग नाहीं—असा अनुभव आहे. जीव जर व्यापक असता तर त्यास सर्वत्र सुखदुःखभोग घडता—असा भावार्थ.

[2]स्वयें जडां [3]चेतनता असेना, [4]प्रकाश [5]यांवीण [6]तया दिसेना।
संकोच विस्तार घडे न [7]थाला, बाह्यप्रकाशें मन कैंवि बोलों. ॥ २४
हा जीव तों केवळ [8]एकदेशी, [9]चिद्बिंब तें [10]सर्व मन [11]प्रकाशी।
चैतन्यतुल्य [12]प्रतिबिंबबिंबीं, सिद्धांत हा [13]वेदमतावलंबी. ॥ २५
[14]सर्वत्र नाहीं प्रतिबिंब [15]जेव्हां, अणुत्ववातींहि [16]घडेल तेव्हां।
अणुत्ववादी तितुके [17]बुडाले, सिद्धांत [19]तेथें अवघे [18]उडाले. ॥ २६
उडाले [20]तसे [21]एकजीवत्ववादी, न जीवत्व बिंबात्मतेलागिं वेदीं।
[22]चिदात्मा हरी हे [24]चिदाभास भोक्ते[25], असें जाणती तेचि [26]वेदांतवक्ते. ॥ २७
[27]ऐशांसिही [28]श्रुति [29]अगम्यचि हें रहस्य, श्रीकांत ज्यास त [30]अनन्यपणें [31]उपास्य।

---

१. श्लोक १६।१७ यांतील सिद्धांताचाच या श्लोकांत उल्लेख आहे. ते श्लोक आणि हा श्लोक यांचा भावार्थ एकच आहे. श्लोक १६-१७ यांत जो सिद्धांत सांगितला त्याविरुद्ध शंकांचें समाधान श्लोक १९-२३ यांत केलें आहे, म्हणून अखेरीस त्या सिद्धांताचा या श्लोकांत पुन्हा उल्लेख आहे. म्हणून येथें पुनरुक्ति दोष झाला आहे असें वाटेल, परंतु काव्यग्रंथ, तत्वविचारसंबंधी ग्रंथांस पुनरुक्ति दोष नाहीं—असें विद्वानांचें मत आहे. [ यथार्थदीपिका—अध्याय ४ ओंवी ११८१ पहा. ] २. मनबुद्धिचित्त हीं जड आहेत त्यांला. ३. चेतना, चैतन्य. ४. बिंब आणि प्रतिबिंब या दोहोंतून कोणा एकावांचून. ५. जडाला. ६. प्रतिबिंबाला, जीवाला. ७. हाच प्रश्न श्लोक १७ उत्तरार्धांत आहे. ८. एक देहांत मात्र. ९. बिंबरूपी चैतन्य. १०. सर्वत्र देहाबाहेर. ११. सचेतन करी. १२. जीव (चिदाभास) आणि सर्वगत जें बिंब (ईश्वर) या दोहोंतही. १३. वेदांस मान्य. कोणतेही गोष्टीचे सिद्धतेस प्रमाण पाहिजे. हीं प्रमाणें:—प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शाब्द, अर्थापत्ति, अनुपलब्धि, संभव, ऐतिह्य आणि चेष्टा अशीं आहेत परंतु यांतून कोणतेंच निर्दोष नाहीं. वेदवचन मात्र निर्दोष प्रमाण, यासाठीं येथें पंडितांनीं हा सिद्धांत वेदमान्य आहे असें विशेषेंकरून सांगितलें आहे. [मुकुंदराज—विवेकसिंधु—उत्तरार्ध—प्रकरण ९ ओंव्या ९४-९८ पहा.] १४. जीव जर एकदेशी आहे तर तो सूक्ष्म असेल—अशी शंका येईल. म्हणून पंडित सांगतात कीं—या ग्रंथाच्या सातव्या अध्यायांत अणुत्ववादी तितुके बुडाले (खंडित झाले) तेथें (सप्तमाध्यायांत) हे अवघे (अणुत्ववाद्यांचे) सिद्धांत उडाले (खंडन झाले). १५. हा जीव केवळ एकदेशी असेल तर. १६. जीव अणु (सूक्ष्म) आहे असें ठरेल तर. १७. खोटे ठरले. १८. अणुत्ववादी (जीव अणु आहे असें म्हणणारे) जे त्यांनीं मानिलेले सिद्धांत. १९. त्या स्थळीं, सप्तमाध्यायांत, जेथें अणुत्ववाद्यांचें मतखंडन केलें त्या स्थळीं. २०. खोटे ठरले. २१. अणुत्ववाद्यांप्रमाणेंच. २२. अनेक देहांत जीव (प्रतिबिंब, चिदाभास) भिन्न आहे असें न म्हणणारे; जीवत्व तेथून सर्व एकच असें म्हणणारे. २३. बिंबात्मा. २४. चैतन्यप्रतिबिंब. २५. सुखदुःख भोगणारे. हे भोक्ते चिदाभास होत. चिदात्मा नव्हेत—असा भाव. २६. आचार्यांचें पदवीला योग्य. २७. श्रीविष्णूची उपासना ज्यानें अनन्यपणें केली असेल त्यालाच श्रुतींचें रहस्य कळेल—असें तात्पर्य. २८. श्रुति-

[1]भिंतीवरी [2]मतिसवें [3]निजतेज [4]तैसें, तें [5]बोलती [6]प्रतिमुखांतिल तेज जैसें. ॥ ३८

सूर्यप्रभा [7]प्रतिफळे जरि [8]कांस्यपात्रीं, तेथूनि भिंतिवरि तेज दिसेचि नेत्रीं ।

ऐसें मन त्रिभुवनांतहि जेथजेथें, जीव प्रकाशक तयांसहि तेथतेथें. ॥ ३९

दृष्टांत योग्य परि येविषयीं नेपावे, [11]एकत्र [12]तें चहुंकडे न कदापि धांवे ।

[13]भिंतीवरी [14]प्रतिमुखांतिल [15]एकदेशी, सर्वत्र [16]धांवन करूनि न [17]तें प्रकाशी. ॥ ४०

जसी एकदेशी [18]तसी जीवज्योती, [19]जेंगीं ती बरी धांवते चित्तवृत्ती ।

[20]असें मानितां वस्ति देहींच राहे, तरी ते प्रभा काय विश्रांत राहे? ॥ ४१

[21]तें तेज तों नपुरतें [22]प्रतिबिंब [23]जेथें, भिंती प्रकाशित असेल अखंड तेथें ।

---

रहस्य=वेदांचा गूढार्थ. २९. कळण्यास कठीण. ३०. आपण आणि ईश्वर एकच अशा बुद्धीनें. [ब्रह्मस्तुति–चरण १ श्लोक १३२ पहा.] ३१. ज्याची उपासना करावयाची तें दैवत.

१. देहाचे बाहेर जीवाचें जाणें येणें नाहीं, जीवाची किंवा जीवप्रभेची सूर्यप्रकाशाप्रमाणें व्याप्ति नाहीं, जीव केवळ एकदेशी आहे–असें सिद्ध झालें तरी जसें सूर्याचें प्रतिबिंब भांड्यांत पडून नंतर त्या प्रतिबिंबाचें तेज भिंतीवर पडतें तसें जीवाचें (प्रतिबिंबाचें) तेज बुद्धीसवें स्थूलदेहावर पडतें त्याच रीतीनें चित्तबुद्धिमन बाह्यप्रदेशीं सचेतन होतात–असें म्हणतां येईल या शंकेचा उल्लेख श्लोक ३८ उत्तरार्ध आणि ३९ यांत करून त्यास उत्तर श्लोक ४०-४१ (पूर्वार्ध) यांत दिलें आहे. २. बुद्धीबरोबर. जीवप्रभा स्थूलदेहावर पडते तशीच बुद्धीबरोबर जीवप्रभा बाह्यप्रदेशीं गमन करिते–अशी कल्पना. ३. आत्मप्रकाश, चित्प्रकाश, चैतन्यप्रकाश. ४. प्रतिमुखांतील तेज भिंतीवर पडतें त्याप्रमाणें. ५. प्रतिमुखांतील तेज जैसें तैसें तें निजतेज मतिसवें भिंतीवरी–असा अन्वय. ६. प्रतिबिंबांतील. ७. प्रतिबिंबतें. ८. कांशाचे भांड्यांत. येथें 'कांस्य' या शब्दाची विशेष अपेक्षा नाहीं. कसलें तरी भांडें–असा अर्थ. ९. श्लोक ३८ उत्तरार्ध आणि श्लोक ३९ पूर्वार्ध यांत सांगितलेली गोष्ट म्हणजे श्लोक ४४ यांत म्हटल्याप्रमाणें जीवप्रभेनें स्थूलदेहीं बोध घडे–हा दृष्टांत. १०. श्लोक ३८ पूर्वार्ध आणि श्लोक ३९ पूर्वार्ध यांतील कथन सत्य आहे परंतु त्यावरून काढलेला सिद्धांत म्हणजे श्लोक ३९ यांतील गोष्ट सत्य नव्हे–असें तात्पर्य. ११. एको देहांत मात्र एकदेशी. १२. जीवप्रभा, जीवतेज. १३. स्थूलदेहावर. १४. प्रतिबिंबांतील, जीवाचें. १५. सर्वत्र नाहीं असें. १६. संचार. १७. स्थूलदेहास सचेतन करणारें जीवस्वरूप चैतन्याचें तेज तें. १८ एकदेशी. १९. ती चित्तवृत्ति जगीं बरी धांवते–असा अन्वय. २०. जीवज्योतीची वस्ती (स्थान) देहींच राहे; असें मानिलें तर ते (जीवज्योतीची) प्रभा विश्रांत (सर्वत्र) राहे काय? (असेल काय?). सारांश–जीवप्रभा देहाबाहेर नाहीं. २१. जीवप्रभारूपी तेज २२. जीव. २३. जेथें प्रतिबिंब भिंती प्रकाशित असेल (जीव स्थूलदेह धारण करीत असेल) तेथें ते तेज (जीवप्रभा) तों पुरतें [आणि] अखंडित न (स्थूलदेह तरी जीवप्रभें

तेथूनि[1] तें[2] न[3] परते तरि ऐकदेशी[4], होऊनि[5] जीव भुवनत्रय हा प्रकाशी[6]. ॥ ४२

असे जीव हे सर्वही एकदेशी, जगद्व्याप्त तेव्हां न याच्या[7] प्रकाशीं ।

स्वरूपीं जसें व्यापिलें हें मुकुंदें, प्रकाशें तसीं व्यापिलीं जीववृंदें[8]. ॥ ४३

म्हणोनीच दृष्टांत हा स्थूळदेहीं, घडे बोध हा येस्थळीं येत नाहीं ।

चिदर्कप्रभा[9] सूक्ष्मदेहीं[10] तथापी, पडे तेज तें सर्वदा स्थूलरूपीं[11]. ॥ ४४

दिसे स्वप्नकाळीं दुजें[12] स्थूल जेव्हां, पडे आड[13] या स्थूळदेहासि तेव्हां ।

न भिंतीवरी कांस्यपात्रार्कज्योती, दिसे[14] त्यावरी जे मधें आड येती. ॥ ४५

न निद्रेंत[15] हें[16] आठवे स्थूल जेव्हां, दिसे कल्पनेचेंच तें[17] स्थूल तेव्हां ।

---

पुरतेपणें आणि अखंडित प्रकाशित असतो असें नाहीं)=असा अन्वयार्थ. याचें स्पष्टीकरण पुढें श्लोक ४४ (उत्तरार्ध) पासून ४८ (पूर्वार्ध)पर्यंत केलें आहे.

१. स्थूलदेहापासून. २. तेज, जीवप्रभा. ३. मागें फिरलें नसतें तर; स्थूलदेह भिंतीपर्यंत मतिसंवें जीवतेज जाऊं शकतें त्यापुढें तें तेज गेलें असतें तर. ४. एक शरीर व्यापून राहणारा. ५. असा असेल तथापि. ६. सचेतन करील. तेथून (स्थूलदेहापासून) तें (तेज) जरी न परते (फिरलें नसतें) तरी हा जीव एकदेशी होउनी (एका देहांत असला तथापि) भुवनत्रय प्रकाशी (सचेतन करील)—असा अन्वय. ती जीवप्रभा स्थूलदेहाबाहेर जात नाहीं या गोष्टीचें स्पष्टीकरण श्लोक ४८ उत्तरार्धापासून श्लोक ५० पर्यंत केलें आहे. ७. येथें 'तयाच्या' असा पाठ आढळतो, पण तो लेखकप्रमाद असावा. 'तयाच्या' हा पाठ ग्रहण केल्यास 'तयाच्या'=मुकुंदाच्या—असा अर्थ समजावा. ८. जीवसमूह. ९. चित् (चैतन्य)+अर्क (सूर्यबिंब)+(प्रभा.) [येथें 'प्रभा' शब्दानें प्रतिबिंब समजावयाचें. अध्याय ५ श्लोक २३, अध्याय ६ श्लोक ७०, अध्याय ८ श्लोक ३९ पहा.] जीवस्वरूप स्थूलदेह होय तथापि जीवप्रभेनें अखंड प्रकाशित नसतो—असें श्लोक ४२ पूर्वार्धांत सांगितलें त्याचें स्पष्टीकरण करण्यास येथून आरंभ केला आहे. १०. लिंगदेहांत. [लिंगदेह सोळा तत्वांचा असतोः—'भूतांचे गुण पांच एक मन हें कीं इंद्रियें जीं दहा' [तत्वमाला—श्लोक १३ मागें पृ० ५१.] ११. स्थूलदेहांत. हा देह पंचतत्वांचा असतोः—'स्थूलीं हे नभ आदि पंचक दिसे' [तत्वमाला—श्लोक १३ पृ० ५१.] १२. खरा स्थूलदेह (जागृतींतला देह) बिछान्यावर पडलेला असतो आणि दुसरा स्थूलदेह कल्पून स्वप्नकाळचे सृष्टींत त्या कल्पित देहानें मनुष्य संचार करितो. त्या स्वप्नसृष्टीतील देहास येथें 'दुजें स्थूल' असें म्हटलें आहे. श्लोक ४६ यांत 'कल्पनेचें स्थूल' असें म्हटलें आहे. १३. सूक्ष्मदेह आणि स्थूलदेहांमध्यें. स्वप्नकाळीं या (जागृतीच्या) स्थूलदेहीं तेज पडत नाहीं याचें कारण त्या तेजाचे आड 'दुजें स्थूल' येतें—असा भावार्थ. १४. मधें जे आड येती त्यांवरी कांस्यपात्रार्कज्योती दिसे. [त्यावेळीं] कांस्यपात्रार्क ज्योती भिंतीवरी न दिसे—असा अन्वय. १५. स्वप्नकाळीं. १६. जागृतीं तील शरीर. १७. स्वप्नांत कल्पिलेलें शरीर.

घरी तें मनांतील चैतन्य त्याला, नदेहास्ति यातें पडे आड याला. ॥ ४६
भितीवरी प्रतिमुखांतिल तेज जेथें, दोहींमधें किमपि ये जरि आड तेथें ।
तें तेज त्याचिवरि ते समयीं प्रकाशी, भिंतीवरी मग न यास्तव एकदेशी.॥४७
हे दीप्ति तों प्रतिमुखांतिल एकदेशी, त्यांमाजि येति तितुक्यांसहि ते प्रकाशी ।
ज्यालागिं आवरण मीपण लिंगदेहीं, स्थूळावरी तदभिमान पुढे न कांहीं.॥ ४८

दुःखी मी अथवा सुखी चतुर मी अज्ञान मी मी सुधी
तो हा प्रत्यय मीपणाहुनि दुजा हा जीव नेणें कधीं ।
चैतन्यप्रतिबिंब यास्तव नसे स्थूळापुढें सर्वथा
हें प्रत्यक्ष पुढें तयास न दिसे दुःखासुखाची कथा. ॥ ४९
तें अंतःकरणीं अहंपण तया सूक्ष्मामधें राहणें
किंवा हे प्रतिबिंबज्योति पडते स्थूळीं तया पाहणें ।
या स्थूळाकरितां अहंपणि जिवा दुःखेंसुखें भोगणें
दृष्टीला न दिसे मनें त्रिभुवनीं जे जे स्थळीं हिंडणें. ॥ ५०
ध्रुवपद शशि तारा दीसती याच दृष्टी,
मन तरि फिरताहे जोंवरी ब्रह्मसृष्टी ।

---

१. जागृतीतील शरीरातें. २. आड पडलेल्याला, जागृताचे शरीराला. ३. प्रतिबिंबांतील. ४. भिंत आणि प्रतिबिंब यांमध्यें. ५. आड येणाऱ्या वस्तूवर. ६. भिंतीचे आड दुसरें कांहीं आल्यामुळें. ७. एका जागीं राहणारें तेज. ८. जीवप्रभा, प्रतिमुखांतील दीप्ति. ९. सर्वत्र जीचा प्रसार नाहीं अशी. १० स्थूल आणि सूक्ष्मदेह यांमध्यें. ११. स्वप्नसृष्टीत जितके देह कल्पिले असतील तितक्यांना. १२. प्रतिमुखांतील दीप्तीला, जीवप्रभेला. श्लोक ४२ उत्तरार्ध यांत तेथूनि (स्थूलदेहापासून) तें (जीवतेज) परतें (मागें फिरतें) अशी गोष्ट दर्शविली. त्याचे स्पष्टीकरणास येथून आरंभ आहे. १३. वेष्टन, झांकण. १४. मीपण (अहंकार) हें जीवप्रभेस आवरण आहे—असा अर्थ. १५. मीपणाचा अभिमान, अहंवृत्ति. १६ स्थूलदेहाचे बाहेर. [यथार्थदीपिका—अध्याय ३ ओंव्या ७४३-७४६ पहा.) १७. प्रतीति, अनुभव. १८. अहंपणाविरहित. अहंपणाची जितकी व्याप्ति तितकीच प्रतिबिंबाची व्याप्ति. अहंकार नाहीं तर जीवस्वरूपही नाहीं—असा भाव. १९. पुढें (स्थूलदेहाबाहेर) तयास (जीवास) सुखदुःखाची कथा (अनुभव) न दिसे—ही गोष्ट. २० प्रत्यक्ष अनुभवास येते—असा अर्थ. २१. मीपणानें युक्त होऊन. अहंपणाशिवाय जीवास सुखदुःखभोग नाहीं—असा भावार्थ. २२. त्रिभुवनीं जे जे स्थळीं मनें हिंडणें (मनानें फिरावें) आणि त्रिभुवनीं जे जे स्थळीं दृष्टीला हिंडणें (दृष्टीनें फिरावें) [तें स्थळीं] दुःखेंसुखें भोगणें न दिसे—असा अन्वय. देहाबाहेर त्रिभुवनांत अनेक स्थळीं दृष्टि आणि मन संचार करितात. त्या स्थळीं सुखदुःखभोग जीवास होत नाहींत, फक्त देहांत मात्र होतात—असा अर्थ. २३. ध्रुवपद (ध्रुवनक्षत्र) शशि (चंद्र) तारा (नक्षत्रसमुदाय) इत्यादि स्पर्शातीत आहेत परंतु दृश्यवस्तु मात्र

अति जड मन दृष्टी चित्प्रकाशत्व त्याला,
प्रतिमुख तरि देहीं ते स्थळीं कोण ? बोला. ॥ ५१
[1]मना बुद्धिदृष्टीसही [2]बाह्यदेशी, [3]स्वयें [4]बिंबें विश्वप्रकाशें प्रकाशी ।
[5]ऐसी सूर्यतेजावरी दृष्टि धांवे, असे तेज [6]जेथें जरी हे न पावे. ॥ ५२
असें [7]बिंबचैतन्य हें सर्व आहे, म्हणोनीच चंद्रादिकां दृष्टि पाहे ।
मनोवृत्तिही [8]त्यावरी दूरि धांवे, प्रकाशी [9]तिला तेंचि [10]ते जेथ पावे. ॥ ५३
[11]स्वदेहासही [12]तोचि आत्मा प्रकाशी, असे [13]भोगमात्रार्थ हा एकदेशी ।
घटीं [14]व्यापकाकाश तो [15]तो न [16]हाले, [17]जळीं [18]दूसरा दीसतो [19]तोचि डोले. ॥ ५४

---

दृष्टीनें दिसती. तसेंच दृष्टीपलीकडील स्थळीं जोंवरी नक्षत्रसृष्टी असे, तोंवरी तरि मन फिरताहे. ती दृष्टी आणि मन हीं अति जड आहेत आणि प्रतिमुख (जीवचैतन्य) फक्त देहीं आहे तरि (तर मग) ते स्थळीं (देहाचे बाहेरील स्थळीं) त्याला (दृष्टीला आणि मनाला) चित्प्रकाशत्व (प्रकाशविणारें चैतन्य) कोण ? बोला (सांगा)–असा प्रश्न या श्लोकांत आहे.

१. श्लोक ५१ यांतील प्रश्नास उत्तर श्लोक ५२-५३ यांत आहे. २. देहाचे बाहेर. ३. सर्वगत अनंत जें चैतन्य तें. ४. विश्वास व्यापून राहणारा जो चैतन्यप्रकाश त्याचे योगानें. चैतन्यप्रकाशांत भेद दोन आहेत:–१ विश्वप्रकाश (सर्वव्यापी), २ एकदेशी (देहप्रकाशक). ५. त्याप्रमाणें, उदाहरणार्थ. पूर्वार्धांत वर्णिलेल्या गोष्टीस 'सूर्यतेजावरि दृष्टि धांवे'–हें उदाहरण. ६. जेथें हे (दृष्टि) जरी न पावे [तरि तेथें पहिलेंच] तेज असे–असा अन्वय. ७. बिंबचैतन्यावर. ८. मनोवृत्तीला. ९. तें बिंबचैतन्यच. १०. ते (मनोवृत्ति) जेथ पावे (जेथें जाते)–असा अन्वय. ११. आपल्या शरीराला सुद्धां. १२. बिंबचैतन्यस्वरूपी. १३. सुखदुःखभोगासाठीं. १४. चैतन्य चतुर्विध आहे:–ब्रह्म, ईश्वर, कूटस्थ आणि जीव. त्यास दृष्टांतः–महदाकाश, अभ्राकाश, घटाकाश, जलाकाश. [पंचदशी–प्रकरण ६ श्लोक १८.] कोणी चैतन्य त्रिविध मानितात. ब्रह्म आणि ईश्वर यांस एकच समजून त्यास महदाकाशाचा दृष्टांत योजितात. अभ्राकाश दृष्टांतांत घेत नाहींत. [यथार्थदीपिका–अध्याय १३ ओंव्या ११३-१२२ पहा.] जीवास चिदाभास किंवा आभास असेंही म्हणतात. चैतन्य चतुर्विध मानणारे ईश्वर आणि जीव यांस प्रतिबिंब म्हणतात. [पंचदशी–प्रकरण ६ श्लोक २०-२१, विवेकसिंधु-पूर्वार्ध–प्रकरण ७ ओंव्या २-३१ पहा.] त्रिविध मानणारे ईश्वरास बिंब आणि जीवाला प्रतिबिंब म्हणतात. पंडित त्रिविध चैतन्य मानणारे असून त्यांनीं येथें महदाकाश या अर्थी 'व्यापकाकाश' शब्द योजिला आहे. १५. घटाकाश, व्यापकाकाशाचा घटांत राहणारा भाग, घटांतील पोकळी म्हणजे कूटस्थ बुद्ध्यवच्छिन्न चैतन्य–असा अर्थ. १६. चंचल होत नाहीं. कूटस्थास सुखदुःखभोग नाहीं–असा अर्थ. १७. बुद्धिरूप उदकांत, जीवोपाधींत. १८ जलाकाश, चिदाभास, जीव. १९. हाले, चंचल होतो. दुसरा (जीव) त्याला मात्र सुखदुःखभोग आहे–असा अर्थ.

असीं सर्व चोवीसंही जीवतत्वें, तया व्यापकें वर्तती चेतनत्वें ।
तयां जीव होऊनियां जीवभोगीं, पैहाती प्रकाशत्व बिंबींच योगी. ॥ ५५
विनारज्जु तो सर्प दृष्टीं दिसेना, विनारज्जु तो सर्प कांहीं असेना ।
दिसेना जसें ज्याविणें विश्व दृष्टी, असे सर्व मिथ्या तयाधीण सृष्टी. ॥ ५६
दिसे रज्जुनें सर्प ऐशा प्रकारें, चिदात्मप्रकाशेंचि दोन्ही शरीरें ।
दिसे दोंप्रकारें चिदात्मत्व तेंही, असे भोग एकां दुज्या भोग नाहीं. ॥ ५७
भोक्ता परिच्छिन्न न सर्वठायीं, देहींच जो व्यापक हातपायीं ।
हा जीव आणीक जडे प्रकाशीं, तें बिंब सर्वत्र चिदंबुराशी. ॥ ५८
घेऊनि सूक्ष्मतनुतें प्रतिबिंब जातें, हें स्थूल रज्जुवरि सर्प तसें रहातें ।
बिंबें प्रकाशक असे शिव जेंवि दृष्टीं, बिंबेंच येचरिति सूक्ष्मशरीरसृष्टी. ॥ ५९
बिंबैक्य चित्प्रतिमुखासि सुषुप्ति जेव्हां, बिंबात्मतेकरुनि दोनिहि देह तेव्हां ।

१ या प्रकारें, बिंबचैतन्य सर्वत्र असून त्या चित्प्रकाशानें सर्व सृष्टि वर्तते त्या प्रकारानें. २. यथार्थदीपिका–अध्याय ३ ओंव्या २८६-२८८ पहा. ३ व्यापकाकाशस्वरूपी जें बिंबचैतन्य त्याचे योगानें. ४. जीवभोगीं (जीवाच्या सुखदुःखप्रसंगीं) जीव होऊनियां (योगी जीवस्वरूप पावला तथापि) तयां (चोवीस जीवतत्वांना) बिंबच (बिंबचैतन्यानेंच) प्रकाशत्व असे; असें योगी (ज्ञानी) पहाती–असा अन्वय. ५. यथार्थदीपिका–अध्याय ४ ओंव्या ११३०-११३९ पहा. ६. आत्मचैतन्यावांचून. ७. बिंबचैतन्याचेच योगानें. ८. स्थूलदेह आणि लिंगदेह हीं दोन शरीरें. दोन शरीरें मिळून जीवतत्वें चोवीस आहेत. स्थूलदेहांत पंचमहाभूतें आणि बाकीचीं लिंगदेहांत. लिंगदेहांत १६ तत्वें असतात असें पंडितांनीं म्हटलें आहे. [तत्वमाला–श्लोक १३ पृ० ५१.] परंतु 'मन' या शब्दानें, चित्त, बुद्धि, अहंकार आणि मन या चार तत्वांचा बोध होतो यास्तव लिंगदेहांत १९ तत्वें असतात असें समजावयाचें. ९. चैतन्य, आत्मत्व. १०. दोन चिदात्मतत्वांतून एकाला, प्रतिबिंबाला, चिदाभासाला, जीवाला सुखदुःखभोग आहे. ११. दोन चिदात्मत्वांतून दुसऱ्याला. बिंबाला, कूटस्थाला, ईश्वरस्वरूपाला सुखदुःखभोग नाहीं. १२. सुखदुःख भोगणारा, प्रारब्धभोग ज्यास आहे असा. १३. सर्व ठायीं व्यापक नव्हे. १४. चैतन्यसमुद्र. चैतन्य आणि जड यांस उपमा अनुक्रमें मृत्तिका–घट, तंतु–पट, सुवर्ण–अलंकार ह्या देतात. त्याप्रमाणेंच समुद्र आणि लहरी ह्या उपमा आहेत यास्तव 'चिदंबुराशी' शब्दानें जडप्रकाशक जें चैतन्य तें–असा बोध होतो. १५. या श्लोकाशीं समानार्थक श्लोक ब्रह्मस्तुति–चरण ३ श्लोक २३-२६ हे आहेत. १६. प्रतिबिंब (जीव) चैतन्य लिंग (सूक्ष्म) शरीरासहित एक स्थूलशरीर सोडून अन्य शरीरांत जातें. १७. स्थूलदेह, जीव निघून गेल्यानंतरचें शरीर. १८. दुसऱ्या पादांत म्हटलेलें 'स्थूल' शरीर. १९. पंचमहाभूतांखेरीज एकोणीस तत्वें, ज्यांपासून सूक्ष्मशरीर बनलें आहे तीं. २०. सुषुप्तिकाळीं प्रतिमुख म्हणजे जीवपण असतें. बिंबचैतन्य आणि जीवचैतन्य यांचें ऐक्य असतें. त्या काळीं स्थूल आणि

बिंब प्रकाशकचि चित्प्रतिबिंब नाना, ते जीव जीवपण त्यांप्रति बोलवेना. ॥ ६०
बिंबांत त्या प्रकृतिच्या अतिशुद्ध विद्या, हे दूसरी प्रतिमुखात्मपणें अविद्या ।
बिंबप्रकाशक उपाधियुगीं तथापी, येना उपाधिगुण अन्यउपाधिरूपीं. ॥ ६१
विविध इंद्रिय एक चिंदात्मता, परि न घे रस नासिक तत्वता ।
न रसनेसहि गंध कधीं कळे, प्रकृति शुद्ध तसी रस नाकळे. ॥ ६२
चक्षुःश्रवा सर्प म्हणाल कैसा? हा आइका येथ विचार ऐसा ।
दों[12] इंद्रियां[13] गोलक एक जैसें, जिव्हेंत[14] वागिंद्रियकार्य[15] तैसें[16]. ॥ ६३

---

सूक्ष्मदेह असतातच. प्रतिबिंबच नाहीं तेव्हां तें त्या काळीं देहप्रकाशकच आहे असें म्हणतां यावयाचें नाहीं. अर्थात् ते दोन्ही देह बिंबात्मतेच्याच योगानें प्रकाशतात आणि तें बिंबप्रकाशच होय-असा भाव. २१. चित् (चैतन्य)+प्रतिमुख (प्रतिबिंब)=जीवात्मा. २२. अध्याय ४ श्लोक ६ पहा. २३. स्थूल आणि सूक्ष्म.

१. त्या दोन देहांला. २. त्यांप्रति जीवपण प्रकाशचि बोलवेना (म्हणवेना)-असा अन्वय. ३. श्लोक ५३ यांत बिंबचैतन्याचें वर्णन श्लोक ५४-६० यांत केलें आहे. त्यांत 'असे भोगमात्रार्थ हा एकदेशी' 'जळीं दूसरा दीसतो तोचि डोळे' (श्लोक ५४) 'असे भोग एका' (श्लोक ५७) 'भोक्ता हा जीव' (श्लोक ५८) 'प्रतिबिंब आतें' (श्लोक ५९) या सिद्धांतांच्या योगानें बिंबप्रतिबिंबांत भोग दाखविला परंतु चैतन्य बिंबच जर जडाचें ईशोपाधीचें आणि जीवोपाधीचें प्रकाशक आहे तर असा बिंबप्रतिबिंबांत भेद कां असावा? या प्रश्नाचें उत्तर श्लोक ६१-६२ यांत आहे तें असें:—त्या प्रकृतीच्या अति शुद्धबिंबांत (ईशोपाधींत) विद्या (ज्ञान) आहे आणि प्रतिमुखात्मपणें दुसरी हे (जीवोपाधींत) अविद्या आहे. या उपाधियुगीं बिंबचैतन्यच प्रकाशक आहे. तथापि एका उपाधीचा गुण दुसरे उपाधीच्या रूपीं नाहीं. उदाहरणार्थ-इंद्रियांस एक चैतन्यच प्रकाशक आहे तथापि एका इंद्रियाचा गुण दुसरे इंद्रियाचे ठायीं नसतो. घ्राणेंद्रियास चव कळत नाहीं. आणि जिभेस वास येत नाहीं. त्याप्रमाणेंच शुद्धप्रकृति (ईशोपाधि) रस. (विषयांची गोडी) ना कळे (ग्रहण करीत नाहीं) आणि जीवोपाधि विषयरसाचे ग्रहणाविषयीं चंचल होतो. ४. चैतन्यात्मा, इंद्रियांचा प्रकाशक. ५. चव, गोडी, रसनेंद्रियाचा विषय. ६. नाक, घ्राणेंद्रिय. ७. वास, चंदनादिक सुगंध. ८. येथें 'रस'शब्दानें सर्व विषय मानावे, जीवास कळणारे सर्व विषयरस. ९. ग्रहण करीत नाहीं. शुद्धसत्त्ववृत्ति जो ईशोपाधी त्याला सुखदुःखभोग (विषयरस आकलन) नाहीं-असा अर्थ. १०. सर्व सर्पास कान नसतात, तो डोळ्यांनीं ऐकतो-अशी समजूत आहे. ११. एक इंद्रिय दुसरे इंद्रियाचा विषय ग्रहण करूं शकत नाहीं असें म्हणाल तर चक्षुःश्रवा कसा? या शंकेचें उत्तर श्लोक ६३-६४ यांत आहे. १२. दोहोंस; मनुष्यास वाक्‌इंद्रिय आहे आणि रसनेंद्रियही आहे पण त्या दोहोंस जीभ हें एकच गोलक असतें म्हणजे जिव्हेंत (रसनेंत) वागिंद्रियकार्यंही असतें त्याप्रमाणें सर्पास चक्षुरिंद्रिय आणि श्रवणेंद्रिय या दोहोंस डोळे

[1]इंद्रियें दशहि [2]लिंगशरीरीं, [3]गोळकें दिसति [4]भोगविकारीं ।
[5]स्थूलजीव [6]उभयेंद्रियभोगी, [7]श्रोत्रकर्म नयनेंद्रिय भोगी. ॥ ६४
जसीं इंद्रियें वेगळीं लिंगदेहीं, [8]तयां [9]शक्ति [10]अन्योन्य तों होत नाहीं ।
[11]तैशा जीववृंदीं [12]उपाधी अविद्या, तयां ईश्वराची तयालागिं विद्या. ॥ ६५
[13]एवं [14]प्रकाशक [15]जडें अवघींच [16]बिंबीं, हे जीव तों सफळ [17]दुःखसुखावलंबी ।
[18]बिंबात्मतेकरुनि [19]वर्तति [20]वृत्ति नाना, [21]जीवेश्वरात्मपण भिन्न जसें असेना. ॥ ६६
[22]म्हणुनि '[23]तत्त्वमसी'ति मुखें श्रुति, [24]जडनिषेधचिदैक्यचि बोलती ।
[25]असदुपाधि तथा [26]सदुपाधि तो, परि निषेधें[27] [28]अभेदचि साधतो. ॥ ६७
[29]जरि अभेदविलक्षणता कसी? [30]तरि उपाधिविलक्षणता असी ।

---

हें एकच गोळक असतें—असें तात्पर्य. १३. स्थूलदेहांत इंद्रियें नाहींत, सूक्ष्मदेहांत असतात तीं इंद्रियें. १४. सूक्ष्मदेहांत इंद्रियें असतात व त्यांचीं स्थूलदेहांत गोळकें असतात. १५. बोलण्याचें सामर्थ्य. १६. सर्प चक्षुःश्रवा असल्याप्रमाणें.

१. दश इंद्रियें—पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें. २. स्थूलदेहांत. ३. स्थूलदेहास जे इंद्रियांचे आकार दिसतात त्यांस गोळकें म्हणतात. ४. स्थूलदेहांत. भोग्य जे विषय त्यांचें भोगायतन (स्थान) स्थूलशरीर आहे. [पंचदशी—प्रकरण १ श्लोक २७.] 'कर्मानुरूपें स्थूलीं फलभोग ॥ १३४ ॥ [यथार्थदीपिका—अध्याय १५.] या कारणामुळें येथें स्थूलशरीरास 'भोगविकारीं' म्हटलें आहे. ५. स्थूलदेहधारणकर्ता जीव. ६. सर्प. ७. इंद्रियभोगी. (इंद्रियभोगप्रसंगीं भोगी (सर्प) श्रोत्रकर्मनयन (श्रोत्रकार्य=श्रवणकार्य नयन गोलकानें करणारा)—असा अर्थ.) ८. इंद्रियांस. ९. विषय ग्रहण करण्याची शक्ति. १०. एका इंद्रियाची शक्ति दुसरे इंद्रियाला. ११. तशा अविद्या आणि विद्या—असा अन्वय. १२. जीववृंदीं अविद्या हा उपाधि आणि तयालागिं (ईश्वरस्वरूपी) तया ईश्वराची विद्या हा उपाधि—असा अन्वय. येथें उपाधि या शब्दाचा विद्या आणि अविद्या या दोन शब्दांशीं काकाक्षिगोलकन्यायानें संबंध लाविला पाहिजे. १३. श्लोक ५४-६० यांतील तात्पर्य या श्लोकांत पंडितांनीं सांगितलें आहे. १४. चैतन्याचे ठायीं भासणारीं. १५. सर्व जडतत्त्वें. १६. बिंबरूपी चैतन्याचे ठायीं. १७. सुखदुःखभोक्ते. १८. बिंबस्वरूपी चैतन्याचे योगानें. १९. प्रकाशतात, भासतात. २०. चित्त, बुद्धि, मन, अहंकार ह्या भिन्नभिन्न वृत्ति. २१. जीवात्मा आणि परमात्मा. २२. जीवेश्वरात्मपण भिन्न नाहीं वास्तव. २३. तें तूं आहेस—असें. २४. जड म्हणजे उपाधि त्याचा निरास केल्यावर जें चैतन्य उरतें त्याचें ऐक्य. [मुकुंदराज—विवेकसिंधु—उत्तरार्ध—प्रकरण ७ ओव्या ३८-३९ पहा.] २५. अविद्यारूपी जीवोपाधि. २६. विद्यारूपी ईशोपाधि. २७. निरास. २८. जीवेश्वरांचें ऐक्य. २९. जरि अभेद (चिदैक्य) [आहे तर] विलक्षणता कशी? (जीव आणि ईश्वर यांचें लक्षण भिन्न कसें?)—असा प्रश्न. ३०. प्रथमपादांतील शंकेचें निराकरण या पादांत केलें आहे तें असें:—अशी (जीवेश्वरांत जी विलक्षणता ती) उपाधिविलक्षणता आहे.

वदति दोन सुपर्ण जेथ श्रुती, जड उपाधि विलक्षण बोलती. ॥ ६८

भोगार्थ जीव प्रतिबिंब झाला, अद्वैतही द्वैतहि त्यासि बोलों ।
अभेद तो वास्तव भेद[12] भोगीं, बिंबात्मता जाणति आत्मयोगी. ॥ ६९

[15]प्रकाशे सदा सत्व हें[16] चित्त बिंबें,[17] तथा सर्वही स्फूर्ति बिंबावलंबें ।
प्रकाशे जसी सूर्यतेजेंचि दृष्टी, दिसे तीस त्याऊपरी सर्व सृष्टी. ॥ ७०

प्रकाशे तशी सूर्यतेजेंचि दृष्टी, प्रकाशे तसी सूर्यतेजेंचि सृष्टी ।
[20]तंई सृष्टिचें ज्ञान दृष्टीस होतें, असें चित्त चैतन्ययोगें पहातें. ॥ ७१

[21]जंई दृष्टि हे [22]सूर्यमात्रासि पाहे, न कांहीं [23]तयामाजि हे सृष्टि आहे ।
असें चित्त [24]चैतन्यमात्रासि लक्षी, [25]तदाकार होऊनि [26]वृत्तीस भक्षी. ॥ ७२

[27]तदाकारता होय चित्तास जेव्हां, दिसेना चिदाभास त्यामाजि तेव्हां ।
नदीनें जंई पांवतें नीर तीरीं, न तेव्हां दिसे दूसरें तीर नीरीं.[32] ॥ ७३

[33]दरडिचें प्रतिबिंब नीरीं दिसे, जळ चढे दरडीस तंई [34]नसे ।

---

चित्स्वरूपांत विलक्षणता नाहीं. श्रुति जथा दोन सुपर्ण वदति ती श्रुति जडउपाधीला विलक्षण बोलती. (जीवचैतन्य आणि ईशचैतन्य या दोहोंस विलक्षण म्हणत नाहींत.)

१. पक्षी. २. चैतन्याला. ३. 'द्वा सुपर्णा' इत्यादि श्रुति. [पृ० १८३ टीप २१ पहा.] ४. चैतन्यव्यतिरिक्त. ५. भिन्न भिन्न लक्षणांनीं युक्त. ६. श्रुति बोलती (बोलते)–असा भाव. ७. आरब्धभोगासाठीं. ८. चिदैक्य. ९. जीव आणि ईश्वर यांमध्यें भेद. १०. जीवाला अद्वैत आणि द्वैत हीं दोन्हीं लक्षणें लावतां येतात–असें तात्पर्य. ['भोगार्थ जीवेश्वर वेगळाले । बिंबात्मतेनें नव्हती निराळे ॥' मागें श्लो० ५ पहा.] ११. वास्तव (खरोखर) तो अभेद [आहे आणि] भोगीं (भोगार्थ) भेद [आहे]. आत्मयोगी (ज्ञानी) बिंबात्मता (बिंबैक्य) जाणति. [हि बिंबात्मता इतरांस कळत नाहीं]–असा अर्थ. १२. जीवेश्वरात्मपण, भिन्नता. १३. चिदैक्य. १४. आत्मानुभवी, ज्ञानी. १५. प्रकाशित होतें, स्फुरण पावतें. १६. सत्ववृत्ति जें चित्त तें. १७. बिंबचैतन्याचे योगानें. १८. चित्तास. १९. बिंबचैतन्याचे आधारानें. २०. दृष्टि आणि सृष्टि प्रकाशित झाल्यानंतर. २१. श्लो० ७२-७५ यांत निर्विकल्प समाधीचें वर्णन आहे. या समाधीनें चित्तवृत्तींचा निरोध होतो. २२. सूर्यास मात्र. २३. त्या सूर्यामध्यें. २४ केवळ चैतन्याला मात्र, २५. चैतन्याकार. २६. बुद्धि, अहंकार इत्यादि वृत्तींचा लय होतो–असा भाव. २७. चित्ताचा बिंबचैतन्याचे ठायीं लय. २८. जीवस्वरूप, चित्प्रतिबिंब. २९. चित्तामध्यें, बुद्धीमध्यें. ३०. दरडीवर चढतें. ३१. दरडीचें प्रतिबिंब. ३२. नदीतील पाण्यांत. ३३. अध्याय ४ श्लो० ३९–४२ पहा. ३४. त्या वेळीं प्रतिबिंब नसे (असत नाहीं).

मन अनंतसुखांत मुरे जंई, अनुभवीं प्रतिबिंब तुरे तंई. ॥ ७४

जों मीपणस्फुरण तों प्रतिबिंब तथें, आपादमस्तक अहंकृतिवृत्ति जेथें ।
वृत्तीस अंत न कळोनि मुरेल जेव्हां, तेव्हां अहंपण न वा प्रतिबिंब तेव्हां.॥७५

हां निर्विकल्पकसमाधि निवृत्ति जेथें, दूजा समाधि सविकल्पकवृत्ति तेथें, ।
नाना घटादि विकृती तरि एक माती; मथ्यें मृषा विकृति मातिच आदि अंतीं॥

समाधींत या वृत्तिही ब्रह्म होती, घटादि प्रपंचीं जसी एक माती. ।
दिसेनों असे तीविणें कुंभ जैसा, विना ब्रह्मचैतन्य हा भाव तैसा. ॥ ७७

हरीनेंच जो 'चित्सुधा' ग्रंथ केला, असे तेथ विस्तार हा वर्णियेला ।
स्थिती या समाधीमधें योगियासी, दिसे केवळ ब्रह्म हें विश्व त्यांसी. ॥७८

घडे येथही ऐक्य जीवासि बिंबीं, जंई सत्व विश्वात्मकत्वावलंबीं ।
चिदाभास भोगार्थ त्या सत्वनीरीं अहंकारऊर्मीत हाले शरीरीं. ॥ ७९

---

१. आत्मानंदांत. २. लीन होईल. [ब्रह्मस्तुति–चरण ३ श्लो० २९–३२ पहा.] ३. आत्मानुभवांत. ४. जीवस्वरूपी चिदाभास. ५. अहंकार तेथें प्रतिबिंब (जितका अहंकार तितकें प्रतिबिंब)–असा भाव. ६. नखशिखांत स्थूलदेहांत, स्थूलदेहाबाहेर नाहीं. ७. विलेक्य पावेल. ८. ब्रह्मस्तुति–चरण ३ श्लोक २९-३२ पहा. ९. श्लोक ७२-७५ यांत वर्णिलेला. १०. यथार्थदीपिका–अध्याय ४ ओंव्या ८७७-८८२ यांत या समाधीचें लक्षण दिलें आहे तें पहावें. ११. चित्तचैतन्ययोग, वृत्तीचा लय. १२. सविकल्पसमाधि. १३. या समाधीचें वर्णन या अध्यायाच्या ७७–८० या श्लोकांत केलें आहे. या समाधीला 'सविकल्पसमाधि' असेंही म्हणतात. [यथार्थदीपिका–अध्याय ४ ओंव्या ११२६-११२९ व भगवद्गीता–अध्याय ६ श्लोक २९ पहा.] १४. विकार, घटादिक हे मृत्तिकेचे विकार (विकृति) होत. १५. विकृति मिथ्या आणि मृत्तिका सत्य–असा भाव. १६. सविकल्पसमाधींत. १७. चित्त, बुद्धि, अहंपणा, मन आणि इंद्रियें ह्या वृत्ति. १८. भिन्न भिन्न आकृतींत. १९. 'दिसेना' या क्रियापदाचा संबंध काकाक्षिगोलकन्यायानें 'कुंभ' आणि 'ब्रह्मचैतन्य' या पदांशीं लाविला पाहिजे. २०. मृत्तिकेविणें. २१. जग, सृष्टि (भू=होणें). २२. मागें पृष्ठें ४२-४६ यांत हें प्रकरण छापलें आहे. २३. सविकल्पसमाधीचा विस्तार. २४. ब्रह्म हें केवळ त्यांसी विश्व दिसे–अशी स्थिति. २५. निर्विकल्पसमाधीप्रमाणेंच. २६. प्रतिबिंबास. २७. सर्वव्यापक चैतन्याचे ठायीं. २८. सत्व (चित्त, बुद्धि, मन) विश्वात्मकावलंबी असे त्या वेळीं. २९. चित्सुधा–श्लोक ३५ मागें पृ० ४६ पहा. ३०. चैतन्यप्रतिबिंब, जीव. [अध्याय ४ श्लोक ७-१३ पहा.] ३१. सत्व(बुद्धि) रूप उदकांत. ३२ अहंकार (मीपण)+ऊर्मी (लहरी). [अध्याय ४ श्लोक १४-१८ पहा.] ३३. चंचल होतो, दुःख पावतो.

असें बोलिलें स्पष्ट हें 'भोक्तृतत्वीं', चिदाभास भोगीं दिसे मिश्रसत्वीं ।
घडे नित्य अभ्यास विश्वात्मयोगीं, गुणीं भोग भोगूनिही तो न भोगी. ॥ ८०
ज्ञानाभिमान कितिएक धरोनि चित्तीं, अभ्यासवर्जितमुखें वदती कुयुक्ती ।
विप्रत्वविस्मृति पडे तरि तो द्विजाती, येणें रितीच सधवा विधवा न होती. ॥ ८१
हे बोल फोल परि मानुनि खोल लोकीं, अभ्यास टाकुनि दिल्हे चिदचिद्विवेकीं ।
बुद्धीस हे स्मरणविस्मरणादि धर्म, ब्रह्म प्रकाशक असें न कळेचि वर्म. ॥ ८२
विप्रत्व विप्र विसरोनि न शूद्र होती, तैशाचि नापितगृहा सधवा न जाती ।
ब्रह्मत्वभाव विसरेलचि बुद्धि जेव्हां, देहात्मभाव सहजें तिस सिद्ध तेव्हां. ॥ ८३
अभ्यास यास्तव सदा करिताति योगी, ब्रह्मात्मभाव दृढ पावति वीतरागी ।
अभ्यासती सगुण निर्गुण विश्वरूपी, ब्रह्मात्मभाव निजचित्सुखसत्वरूपीं. ॥ ८४

---

१. या प्रकरणाच्या 'भोक्तृतत्व' नामक चतुर्थ अध्यायांत. २. जीव, प्रतिबिंबचैतन्य. ३. प्रारब्धभोगप्रसंगीं. ४. रज, तम या दोन गुणांनीं युक्त अशा सत्वाचे ठायीं. [अध्याय ४ श्लोक ३०-३१ पहा.] 'विश्वसत्वीं' असाही पाठ आहे. ५. आत्मा कळला तरी अभ्यास पाहिजे. [यथार्थदीपिका—अ० ४ ओव्या १२७३-१२७७ पहा.] ६. विश्वात्मकचैतन्याचे ठायीं, विश्वात्मकत्वावलंबीं. ७. सत्व, रज, तम या तीन गुणांनीं युक्त. ८. सुखदुःखभोग. ९. न भोगी=भोगीत नाहीं. [अध्याय ४ श्लोक १९-४५ पहा.] १०. याच अर्थाचे श्लोक वामनपंडितकृत 'ब्रह्मस्तुति' नामक प्रकरणांत आढळतात. [चरण १ श्लोक १५२-१५६ पहा.] ११. मिथ्या कल्पना. या कल्पनेचा उल्लेख या श्लोकाचे उत्तरार्धांत आहे:—विप्राला विप्रत्वविस्मृति पडे तरी तो द्विजातीच होय. सौभाग्यवती स्त्रीला आपण सधवा आहों असें स्मरण नसलें तरी ती सधवाच होय, विधवा नव्हे. त्याप्रमाणेंच आपण जर ब्रह्मचैतन्य आहों तर ब्रह्मस्वरूपप्राप्त्यर्थ यत्न करण्याची काय गरज—असा भाव. १२. आपण ब्राह्मण आहों याचा विसर. १३. ब्राह्मण. १४. सौभाग्यवती स्त्री. १५. श्लोक ८१ यांतील कुयुक्ति. १६. व्यर्थ, असार. १७. महत्वाचे. १८. लोकांनीं, लोकांत. चिदचिद्विवेकी लोकीं—असा अन्वय. १९. खुबी, रहस्य. बुद्धीस ब्रह्मप्रकाश आहे तथापि बुद्धीस स्मरणविस्मरणादि धर्म आहेत—हें वर्म. २० हजामाचे गृहीं. २१. चैतन्याचे ठायीं बुद्धि तदाकार होणें. [चित्सुधा—श्लोक ३७ पृष्ठ ४६ पहा.] २२. देह म्हणजे स्थूल किंवा सूक्ष्म हाच आत्मा, देहाच्या आश्रयानें राहणारा अहंकार किंवा जीव (प्रतिबिंब) हाच आत्मा—अशी भावना तो 'देहात्मभाव.' २३. ब्रह्मात्मभावाची देहास विस्मृति न पडावी म्हणून. २४. अभ्याससाधनानेंच ब्रह्मात्मभाव दृढ व्हावयाचा—असा अर्थ. याविषयीं मुकुंदराजकृत विवेकसिंधु—पूर्वार्ध—प्रकरण २ पहा. [ओव्या २१, ४८-६१, ७९-८८.] २५. विरक्त. २६. निर्गुण [जें] विश्वरूपी सगुण [त्या] निजचित्सुखसत्वरूपीं ब्रह्मात्मभाव अभ्यासती—असा अन्वय. सगुण ब्रह्माची उपासना करणें अवश्य आहे—असा भाव. [यथार्थदीपिका—अध्याय १२ ओवी ७४ पहा.] २७. गुणधर्मरहित जें चैतन्य तें.

## उपसंहार.

(श्लोक.)

जो ग्रंथ वामनमुखें जगदात्मदेवें[1], केला असे 'निगमसार'[2] यथार्थ[3] नांवें ।
अभ्यास तेथ कथिले हरिभक्तिभावें[4], ते मानसीं धरुनि जीतचि मुक्त[5] व्हावें. ८५
अध्याय हे सकळ आठहि अष्टसिद्धी[6], ओव्यांस येथ निजलाभ सुधासमृद्धी[7] ।
कर्में समर्पुनि हरीप्रति शुद्धसत्वीं[9], व्हावें विमुक्त इतुकें फळ[10] 'कर्मतत्वीं[11]'. ॥८६
हा[12] 'कर्मतत्व' हरिनें[13] रचिला प्रबंध[13], श्रुत्यर्थसार[14] हरि[15] जो जनकर्मबंध[16] ।
जो श्रीत्रिविक्रम[17] जनीं जगदात्मबंधू[18], तो वामनप्रभु[19] कृपामृतपूर्णसिंधू[20]. ॥ ८७
स्फूर्ति[21] त्रिविक्रमपणें[22] श्रुतिसार तत्वीं, संक्षेप तें दिसतसे स्मृति वामनत्वीं ।
तोचि त्रिविक्रम असा पसरे त्रिलोकीं, ग्रंथार्थ संतहृदयीं स्वसुखावलोकीं[23]. ॥ ८८

---

याचें वर्णन मुकुंदराजकृत विवेकसिंधु–पूर्वार्ध–प्रकरण ३ ओंव्या ६-२३ यांत आहे. २८. चित्सुधा–श्लोक ४ पहा. २९. विठ्ठयाशी आत्मैक्य. ३०. निज (आत्मा)+चित (चैतन्य)+सुख (आनंद)+सत्व (शुद्धसत्व)+रूप (स्वरूप) त्याचे ठायीं.

१. ईश्वरानें. २. पंडितकृत ग्रंथाचें नांव. ३. सत्य अर्थाचें ज्यांत कथन आहे तो. ४. ईश्वराचे सगुणस्वरूपाचे ठिकाणीं भक्तिभाव ठेऊन. ५. जीवन्मुक्त. [मुकुंदराज–विवेकसिंधु–पूर्वार्ध–प्रकरण १ ओव्या २९-३६ पहा.] ६. अणिमा, गरिमा इत्यादि अष्टसिद्धी. ७ आत्मस्वरूपाची प्राप्ति हेंच अमृत त्याची विपुलता. ८. अध्याय १ श्लो० २७ पृ० ११३ पहा. ९ रजतमविरहित शुद्ध स्वरूपीं. १०. अध्याय १ श्लो० १६ पृ० ११२ पहा. ११. कर्मांचे तत्वामध्यें, कर्ममार्गांत. १२. अ० १ श्लो० ५।६ पहा. १३. ग्रंथ. १४. श्रुतींचें तात्पर्य. १५. हरण करितो. १६. जनांस प्राप्त होणारें पापपुण्यजनित बंधन. १७. वामनावतारीं बळीनें दानोदक सोडल्यावर जें वामनानें विशालरूप धरिलें तें त्रिविक्रमरूप. १८. जगाचा आत्मा आणि कल्याणकर्ता. १९ वामनावतारीं; (पक्षीं) वामनपंडितांचा प्रभु (ईश). २०. कृपा हेंच अमृत त्यानें भरलेला समुद्र. २१. सारतत्वीं (सारभूत आणि तत्वविचाराविषयीं) श्रुति (वेद) त्रिविक्रमपणें (विस्तारानें) स्फूर्ति (स्फुरण पावतात) तें (तत्व) स्मृति वामनत्वीं (स्मृतिग्रंथांत–वामनरूपांत) संक्षेप दिसतसे. तोचि (जो अर्थ) संतहृदयीं स्वसुखावलोकीं [वामनरूपानें असे. णि] त्रिलोकीं त्रिविक्रम असा पसरे तोचि ग्रंथार्थ (या कर्मतत्व ग्रंथाचा अर्थ) होय–असा अन्वय. असेंत ज्या श्रुतींत आणि स्मृतींत तसेंच त्रिलोकांत, साधूंच्या अंतःकरणांत स्फुरणारें जें तत्व तें 'कर्मतत्व' ग्रंथार्थ होय–असा भाव. २२. आकृतीनें लहान असें जें विष्णूचें रूप तें 'वामनत्व' आणि नंतर मोठें रूप दाखविलें तें 'त्रिविक्रमत्व.' हीं दोन्ही रूपें ईश्वराचींच (एकच) त्याप्रमाणेंच श्रुतिप्रतिपाद्य आणि स्मृतिप्रतिपाद्य व त्रिलोकीं आणि संतहृदयीं तत्व एकच–असा भाव. २३. आत्मानंदानुभवांत.

ज्याच्या[1] स्मृतीकरुनि[2] आणिक नाम घेतां, दान क्रिया तप मखादिकही[3] करीतां ।
जें न्यून तें सकळही परिपूर्ण होतें, ऐसें स्मृती वदति तो स्मणार यातें. ॥ ८९
ग्रंथास्ति या करुनि आपण आपणातें, तो अर्पितो नवल केवळ येथ होतें. ।
ऐसी समुद्रलहरी पडने समुद्रीं, तैसीच वृत्तिलहरी असि चित्समुद्रीं[4]. ॥ ९०

---

## उपादान[5].

(श्लोक.)

उपादान[6] मातीच जैशी घटातें, उपादान[7] तंतूच तैसा पटातें ।
विना ब्रह्म येना जगीं प्राणियातें, उपादान तैसें मिळे सत्य यातें. ॥ १
नगाचे[8] सबाह्यांतरीं भाव दावी, नगातें उपादान सत्ता वदावी ।
सबाह्यांतरीं ब्रह्म जैसें जगातें, सबाह्यांतरीं हेम तैसें नगातें. ॥ २

नगीं[9] दृष्टी मुष्टी कनक नुसतें सांपडतसे
उपादानें येतें म्हणउनि च ठायीं पडतसे ।
असे सर्वीं पात्रीं प्रतीतिहि[10] अधिष्ठान[11] गवसे[12]
म्हणोनी ब्रह्मीं हें जग म्हणति हेमीं नग वसे. ॥ ३
स्फुरे[13] ज्ञानें आणी स्फुरणचि जयावीण न घडे ।
असें अंतर्बाह्य प्रगट दिसतां तत्व नुघडे ।
जडीं आत्मा ऐसा परि विरळ ऐसा अनुभवी
जडद्रष्टा मात्र स्फुट वदति भेदज्ञहि भवी. ४
दसोडी[14] जे देखे तिसच वळखे बाळक पटीं[15]
कळोनीही स्वात्मा अकळ नकळे विश्वकपटीं ।
दसोडी पासोडी त्यजुनि उरली प्रौढ सम जे
जडीं आत्मा ऐसा अनुभवित सर्वज्ञ समजे. ॥ ५

---

१. विष्णूच्या. २. पृ० ११३ त दिलेली 'यस्य स्मृत्या' इत्यादि श्रुति पहा. ३. यज्ञादिक. ४. 'वृत्ती नखें हे पदीं सुखसिंधुचंद्रीं' असा अन्य पाठ. ५. या प्रकरणांतील कांहीं श्लोक 'चरमगुरुमंजरींत' आले आहेत. ६. कारणें दोन प्रकारचीं आहेत. माती हें घटाचें कारण आहे. कुंभार हेंही घटाचें कारण आहे. त्यांपैकीं पहिल्यास 'उपादान' म्हणतात. त्यासच इंग्रजींत Material Cause म्हणतात. ७. चरमगुरुमंजरी-श्लोक १३ पहा. ८. दागिन्याचे आंतबाहेर. ९. चरमगुरुमंजरी-श्लोक १५ पहा. १०. अनुभव. ११. स्थान, आधार. 'चिदधिष्ठान' असा अन्य पाठ आहे. १२. सांपडे, मिळे. १३. चरमगुरुमंजरी-श्लोक १६ पहा. १४. चरमगुरुमंजरी-श्लोक १७ पहा. १५. वस्त्रांत.

प्रतीति[1] अशि आपुली तनुमधेंचि जैं सांपडे
सचेतन अचेतनीं जरि तसाचि ऐसा पडे ।
जडोर्मि[2] मग ते दिसे निजचिदंबुसत्ता[3] खरी
जडैक्य न दिसे अशी मग दिसेल कां वैखरी[4] ? ॥ ६

मग व्यापकें[5] ब्रह्म होतांचि ठावें[6], जडद्वैत येणें समूळीं उठावें ।
दिसे सर्व पाणी असें त्या तरंगीं, उरे द्वैत कैसें तरी अंतरंगीं[7]. ॥ ७

जो खरें जड म्हणेल असाधू, द्वैत तो श्रुतिविरुद्धहि साधू[8] ।
ब्रह्म सर्वहि गणोनि जडाला, जो म्हणे अमृत तोचि उडाला. ॥ ८

जया सर्वत्वाचा निगम न तया स्वानुभव दे
असें सर्वी हेंही विदित असतां कल्पुनि वदे ।
जडोर्मि[9] व्यापी जो सकळहि चिदंब्धीच[10] समजे
स्वसर्व ब्रह्मत्वीं पुरुष मग तो कां न उमजे ? ॥ ९

दिवांधींचे[11] दृष्टीं दिसति न रवीरश्मि उघडे
न सर्व ब्रह्मत्वीं तशि उघडिही दृष्टि नुघडे ।
अपूर्ते पूर्णत्वीं म्हणति सकळ ब्रह्म न घडे[12]
विना सर्वात्मत्वस्फुरण परिपूर्णत्व न घडे. ॥ १०

आत्मा जडांस सकळांस अतर्क्य वाटे
श्रुत्यर्थता करुनि लाविति अन्य वाटे ।
त्यांचे नसे नकळते कुमताभिमानी
तैसेंचि हे वदति अद्वयबोध मानी. ॥ ११

असें सर्वांचा मी म्हणुनि म्हणती सर्वहि असे
जडब्रह्माद्वैत श्रुतिविहित मोडीतहि असे ।
अशांच्या शिष्यांला कशि अजडअद्वैतरचना
कळे साक्षात्काराविण विकळ तो वेदवचना. ॥ १२

---

१. अनुभव. २. जडपदार्थरूपी लाट (ऊर्मी). ३. चैतन्यरूप पाण्याचें अस्तित्व. ४. वाणी. ५. व्यापून राहणारें ब्रह्म. ६. माहीत होतां. ७. मनांत, अंतःकरणांत. ८. प्राप्त करून घेणें. ९. 'जडोर्मि व्यापी जो चिदुदधि निजात्माच समजे' असा अन्य पाठ आहे. १०. चैतन्यरूपी समुद्र. ११. पृष्ठ ९५ टीप ३ पहा. १२. चरमगुरुमंजरी–श्लोक ७८ पहा.

[1]नगा एकाचे ते दिसति तुटतां चार तुकडे
न भेद स्वर्णत्वीं समचि सिरवे जें चहुंकडे ।
[2]नै तें चारि स्वर्णें विगणविति चारीहि शकलें
घडेना मोडेना कनकपण इत्यादि उकलें. ॥ १३

न सर्वत्र ठायीं न सर्वत्र ठावें, जडद्वैतठाणें कसें हो उठावें ।
जडावेगळा जो स्वदेहींच पाहे, अपूर्णा गुरूची तयातें कृपा हे. ॥ १४

तरंगीं जळ व्यापकत्वें कळावें, तपीं ऊर्मिमिथ्यत्व तें [3]आकळावें. ।
मग व्यापकत्वास मिथ्या म्हणावें वृथा शब्दपांडित्य तें तों गणावें. ॥ १५

'[4]ममैवांशो जीव' प्रभु म्हणतसे पांडुतनया
चिदंशज्ञानी तो करित निज देहीं जतन या ।
जसे नाना [5]भानु प्रति जळवटीं भिन्न दिसती
अहंशब्दें तैसें प्रतितनु चिदात्मे [6]गवसती. ॥ १६

[7]सचेतन तनूमधें वसति चित्प्रकाशद्वया
स्वरूप सचराचरीं सकळ वर्जितां अद्वया ।
तदंशचि चिदंश तो जळ तरूफळें भक्षिती
तया जड निषेधुनी जन अपूर्ण ते लक्षिती. ॥ १७

[8]तया जो या देहीं जड तनुनिषेधा समजला
गमे त्याला झालें [9]अधिगत परब्रह्म मजला ।
पुसेना कीं ब्रह्म श्रुति म्हणति सर्वत्र वसतें
मला कां हो ऐसें निज तनुचमध्यें गवसतें. ॥ १८

[10]द्विधा चैतन्याचा अनुभव असे तो न समजे
पहाती सर्वज्ञ स्थिरचरजगामाजि सम जे ।
स्वकर्माचें भोगी कृतफळ गुणी तोंवरि वसे
अशेषात्मा ज्ञानीं सुतरपण त्याचेंचि गवसे. ॥ १९

[11]न भोक्तृत्व ब्रह्मीं प्रकृति जड सर्वांस न घडे
चिदंशातें भोक्ता म्हणउनि म्हणा तत्व उघडे ।

---

१. चरमगुरुमंजरी—श्लोक ७४ पहा. २. 'न ती चारी स्वर्णें नग न म्हणवे चारि शकलें' असाही पाठ आहे. ३. समजावें. ४. गी० १०० टीप ६ पहा. ५. सूर्य. ६. चरमगुरुमंजरी—श्लो० १२१ पहा. ७. चरमगुरुमंजरी—श्लो० १२३ पहा. ८. चरमगुरुमंजरी—श्लो० १२४ पहा. ९. प्राप्त. १०. चरमगुरुमंजरी—श्लो० १२६ पहा. ११. चरमगुरुमंजरी—श्लो० १३२ पहा.

'ममैवांशो जीव' प्रभु म्हणतसे वेदहि असें
मनातें मानावें तरि जड गुणा मोक्ष न दिसे. ॥ २०
जैया बद्धमोक्षत्व ही त्या भवार्ता, तयाची न मोक्षाचिही लाभवार्ता ।
जया योग्य आरोप त्याला प्रसिद्ध, श्रुतिप्रोक्त सिद्धांत हा क्षिप्र सिद्ध.॥ २१
[2]म्हणे श्रुति शरीर हें रथ चिदंश आत्मा रथी
हय द्विविधें[3] इंद्रियें फिरवि बुद्धि हे सारथी ।
हयासि मन दोर ते विषय ज्यामध्यें लोळती
तयासहित भोक्तृता कुशल आत्मया बोलती. ॥ २
चिदंशेंश सर्वत्र नेणे कदापी, स्वअज्ञानशौर्यें तरी येक दीपी ।
म्हणे इंद्रियातीत आत्मा स्वरूपी, न देखो जगद्रूप कांहीं अरूपी. ॥ २३
स्वरूपीं त्या आहे जग सकळ आकाशसुमनें
प्रतीतीमध्यें त्या बुडवुनि असें नित्य सुमनें ।
अविद्या ते गेली अजड निजसत्ताच उरली
वदे गोष्टी ऐशा चतुर परविद्या न कळली. ॥ २
नसोनी सर्वत्र स्वसुख जरि देहींच असतें
तुझें तें सज्ञान स्वतनुभरि बोधें निरसतें ।
स्वदेहीं देहाचा सुकृतफळभोक्ताचि फळला
अगा ब्रह्मज्ञानें भ्रम अजुनि नाहीं समजला. ॥ २
गुरू दावी देहीं स्मरण तनुमध्येंच समजे
न देखे चित्सत्ता स्थिरचरजगामाजि सम जे ।
कृतार्था ज्ञानें त्या म्हणवि गुरु सर्वज्ञ न करी
धनाचे आशेनें अधम अघन स्थान उकरी. ॥ २
[12]वंदे जो गायत्री प्रथम गुरु तो एक असतां
नव्हे द्रोही ज्ञानें गुरु करुनि अद्वैत पुसतां ।
अपुर्ता तोही जो जगनग 'उपादान' नुघडे
न दावी कां तेव्हां गुरु न करणें पूर्ण सुघडे. ॥ २

---

१. चरमगुरुमंजरी–श्लो० १३७ पहा. २. चरमगुरुमंजरी–श्लो० १३९ पहा. ३. दो
प्रकारचीं. (ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें.) ४. चरमगुरुमंजरी–श्लो० १४७ पहा. ५. दावी, दट
रागावे. ६. चरमगुरुमंजरी–श्लो० १४८ पहा. ७. पृ० १०३ टीप ६ पहा. ८. अ
९. विद्या=ज्ञान. १०. चरमगुरुमंजरी–श्लोक १५० पहा. ११. चरमगुरुमंजरी–श्लोक १
पहा. १२. चरमगुरुमंजरी–श्लोक १६० पहा.

## पाठभेद.

| श्लोक. | चरण. | पाठ. | पाठांतर. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| | | **४. नौकाक्रीडा.** | | |
| १ | १ | घेऊनि | खेळूनि | २९ |
| ,, | २ | रविनंदिनीतिरतटा | रविनंदिनीनिरतटा | ,, |
| ,, | ४ | जावें | जाऊं | ३० |
| ,, | ,, | नौकेंत | नावेंत | ,, |
| २ | १ | बोलतसे धवाप्रवि | बोलत माधवाप्रति | ,, |
| ,, | ३ | सकळिका | सकळही | ,, |
| ,, | ,, | बैसोनियां | बैसूं नये | ,, |
| ,, | ४ | कान्हा | कान्हो | ,, |
| ,, | ,, | निर्भया | निर्भयें | ,, |
| ३ | ३ | पहुडली | प्रविशली | ,, |
| ,, | ,, | नौकाय केली असे | तों काय झालें असे | ,, |
| ४ | ३ | रचिजे | करिजे | ,, |
| ,, | ४ | नांव | नीर | ,, |
| ,, | ४ | कर्सी | कसें | ,, |
| ५ | २ | सुचविलें | म्हणितलें | ,, |
| ,, | ३ | इंद्रा तद्गत वंश भूषण | इंद्रातें यदुवंशभूषण | ,, |
| ,, | ४ | ऐसें करी | ऐशारिती | ,, |
| ६ | २ | झुंझाटा मग | झुंझा मारुत | ३१ |
| ,, | ,, | मेघोदरीं | मेघोदकें | ,, |
| ७ | १ | आकांतल्या | आक्रंदल्या | ,, |
| ,, | ३ | वाऱ्यानें | वायूच्या | ,, |
| ,, | ,, | उडेत | उडोनि | ,, |
| ८ | २ | (सबंध चरण) | मृत्यूलागुनि भीत कीं मजप्रती | ,, |
| | | | या रक्षिती सुंदरा | ,, |
| ९ | १ | यदुपती | यदुविरा | ,, |
| ,, | २ | नाना | नांवें | ,, |
| ,, | ,, | पडोनि दरि भरलें | पडोनियां जळभरें. | ,, |
| ,, | ३ | व्रजपाळ | यदुपाळ | ,, |

| श्लोक. | चरण. | | पाठांतर. | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| ९ | ३ | आहे तया | आहेत या | ३१ |
| १० | १ | हें | तें | ,, |
| ,, | ,, | मानल्या | मानलें | ,, |
| ,, | २ | चोळ्या तिहीं फेडिल्या | चोळ्यांसही फेडिलें | ,, |
| ,, | ३ | नावे छिद्रबिळें | नौका छिद्रबिळीं | ,, |
| ,, | ४ | तेणें तों | तों तों तें | ,, |
| १२ | ४ | त्या | तीं | ३२ |
| १३ | २ | उगडा | उदकें | ,, |
| ,, | ३ | जळा | जळें | ,, |
| १४ | ३ | कोणे स्थळीं | कोठें तरी | ,, |
| ,, | ४ | त्या | तू | ,, |
| १५ | १ | ऐशीया | ऐशीही | ,, |
| ,, | ,, | करुणोत्तरां | करुणोत्तरें | ,, |
| ,, | ३ | पैं | तें | ,, |
| १६ | १ | अभ्र | मेघ | ,, |
| ,, | ४ | कौशल्य केलें | कृष्णेचि केलीं | ,, |

श्लोक. ११ याचें पाठांतर.

बाळा त्या सकळा मिळूनि वदती वारा कसा आवरे  
एकें दों घटिकेंतही भरूनियां पाहे बुडे नांव रे ।  
श्रीकृष्णाप्रति रक्ष रक्ष गिरिजाकांता त्वरें धांव रे !  
सर्वांचो करुणानिधी तुजप्रती कैशी नये कींवरें. ॥

# अधिक पद्यें.

## नौकाक्रीडा.

हर्षें निर्भर होउनी व्रजवधू कृष्णा कडे घेतसे
जाती त्या हरिमंदिरासिं जननी जेथें यशोदा असे. ।
घेओनी कथिती वृतांत वनिता जें जें असें जाहलें
संकष्टीं सकळांप्रती तव सुतें या माधवें रक्षिलें. ॥ १७ ॥
ऐकोनी जननी हरीस हृदयीं घेऊनि दे चुंबना
बा रे तूं बहु कष्टलासि म्हणुनी घालीतसे भोजना ।
शय्या घालुनि मंचकीं निजविलें त्या वासुदेवाप्रती
सद्भावें करि विश्वनाथ हृदयीं अत्यंत त्यांची प्रिती. ॥ १८ ॥